CMYK

४२ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT



सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २४९ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आहार, निद्रा, भय आणि मैथुन सगळ्या प्राणिजगतात विद्यमान असतात आणि हे विकार मन व शरीराला रोगांची शिकार होण्यास कारणीभूत ठरतात. यावरचा उपाय 'धर्म' म्हणजे 'सदाचार' हाच आहे.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## मजबूत अर्थव्यवस्था; सेन्सेक्स वधारला

**मुंबई** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व्याजदरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय बुधवारी घेतला. तसेच जागतिक आव्हानांच्या काळात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत किरकोळ महागाई वाढली असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर बुधवारी शेअर बाजाराचे दोन्ही मुख्य निर्देशांक जवळपास स्थिर पातळीवर बंद झाले. मुंबई शेअर बाजाराचा ३० समभागांचा 'सेन्सेक्स' १५२ अंकांनी वाढून ७८,५८१ वर बंद झाला.



# अखेर झुकरबर्ग झुकला

- पंतप्रधान मोदी यांचा व्हिडीओ हटविल्याबद्दल मागितली माफी
- मजकुराला बळ देण्यासाठी पैसे घेतल्याची कबुली



**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ काही काळासाठी हटविल्याबद्दल इन्स्टाग्राम, फेसबुक आणि व्हॉट्सॲपची मालक कंपनी मेटाचा प्रमुख मार्क झुकरबर्ग अखेर झुकला असून, त्याने या प्रकाराबद्दल माफी मागितली. हा एक तांत्रिक बिघाड होता, असे स्पष्ट केले. बाल लैंगिक शोषण आणि डीपफेक सामग्री हटवण्यात अपयश आले. अशा प्रकारच्या सामग्रीला बळ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा देण्यात आला होता, अशी कबुली कंपनीने दिल्याची माहिती बुधवारी सूत्रांनी दिली.

फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपची मालकी असलेल्या मेटाच्या जागतिक व्यवहार विभागाचे प्रमुख जोएल कॅप्लान यांच्या नेतृत्वाखालील जागतिक चमूने माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव वैष्णव यांची भेटल्यावर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मेटाने आपल्या मंचांच्या कामकाजात त्रुटी राहिल्याचे मान्य केले आहे. वैष्णव यांची भेट घेण्यापूर्वी कॅप्लान यांनी आणि त्यांच्या टीमने माहिती तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन् यांच्याशी स्वतंत्र चर्चा केली. २०११ मध्ये फेसबुकमध्ये रुजू होण्यापूर्वी त्यांनी जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या प्रशासनात 'व्हाईट हाऊस डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ फॉर पॉलिसी'या पदावर काम केले आहे.

मागील महिन्यात नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ काही काळ हटविण्यात आल्याच्या घटनेनंतर सरकारने कंपनीच्या नेतृत्वाला चर्चेसाठी हजर राहण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर या बैठका झाल्या. तांत्रिक बिघाड असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. मेटाच्या अधिकाऱ्यांनी या बैठकीबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, मेटाच्या टीमने या घटनेबद्दल तसेच आशय नियंत्रणातील इतर त्रुटींबद्दल माफी मागितली आणि खेद व्यक्त केला, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. मात्र, याची तपशीलवार माहिती दिली नाही. (वृत्तसंस्था)

### बेकायदेशीर सामग्रीचा प्रचार

सरकारने मेटाकडे बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मजकूर, डीपफेक्स, व्हेरीफाईड आणि प्रतिष्ठित खात्यांसाठीची उपाययोजना, अल्गोरिदममधील पूर्वग्रह आणि भारतीय कायद्यांच्या पालनाबाबत काही प्रश्न उपस्थित केले. मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर सामग्रीचा प्रचार करण्यात आला आणि विशिष्ट प्रेक्षकांसाठी पैसे देऊन जाहिरातबाजी करण्यात आली, हे मेटाने मान्य केले, असे सूत्रांनी सांगितले. मेटाला पुन्हा बोलवले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

### कंपनी तटस्थतेचा दावा करू शकत नाही

कंपनी भारताच्या माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत तटस्थ 'मध्यस्थ' असल्याचा दावा करू शकत नाही. कारण, केवळ त्रयस्थ पक्षाची सामग्री होस्ट करण्याऐवजी कंपनीचे अल्गोरिदम्स सक्रियपणे सामग्रीची निवड आणि शिफारस करतात तसेच कोणत्या वापरकर्त्यांना कोणती सामग्री मिळेल, हे निश्चित करतात, असे केंद्राने मेटाला कळवले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. कायद्याचे पालन करण्याच्या अधीन राहून वापरकर्त्यांनी तयार केलेल्या सामग्रीसाठी मंचाला वाचवत असल्याने मेटा मध्यस्थांसाठी उपलब्ध असलेल्या 'सेफ हार्बर' संरक्षणास पात्र नाही, असा युक्तिवाद सरकारने या आधारावर केला.

# परिसीमन, महिला आरक्षण विधेयकासाठी विशेष सत्र?

## विरोधकांचे मन वळविण्याचे प्रयत्न; पाठिंब्यास राहुल गांधींचा नकार

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात महिला आरक्षण आणि परिसीमन विधेयक आणणे शक्य होणार नसल्याचे दिसत असल्यामुळे ही दोन विधेयके पारित करण्यासाठी सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या विचारात असल्याचे समजते.

संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्टला संपणार आहे. संसदेच्या अधिवेशनाचे सहा दिवसांचे कामकाज बाकी आहे, काही मुद्यावरून सरकार आणि विरोधक यांच्यात कोंडी निर्माण झाली आहे. पण महिला आरक्षण आणि मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे विधेयक अशा परिस्थितीत पारित करणे शक्य नाही, त्यामुळे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर १६ ऑगस्टपासून सरकार तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

पावसाळी अधिवेशनात निर्माण झालेली कामकाजाची कोंडी फोडण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला असून बुधवारी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा झाली. काँग्रेसच्या प्रियांका वढेराही यावेळी उपस्थित होत्या. पण, राहुल गांधी यांनी पाठिंब्यास नकार दिल्याची चर्चा आहे.

संसदेतील कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन रिजिजू यांनी यावेळी राहुल गांधी यांना केले. (तभा वृत्तसेवा)



संसद परिसरात आंदोलन करताना इंडिया आघाडीचे नेते

### रिजिजू-अमित शाह यांची भेट

राहुल गांधीसोबत झालेल्या भेटीची आणि चर्चेची माहिती किरेन रिजिजू यांनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन त्यांना दिली. रिजिजू यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचीही भेट घेतल्याचे समजते. मतदारसंघ परिसीमन घटनादुरुस्ती विधेयकात देशातील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवण्याची तरतूद आहे.

## विमा नसेल तर इंधनच देऊ नका : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

देशात थर्ड-पार्टी विम्याशिवाय रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेत मंगळवारी एका महत्त्वपूर्ण निर्णयात अशा वाहनांच्या मोठ्या संख्येवर गंभीर चिंता व्यक्त केली. विमा नसलेल्या वाहनांना इंधनच देऊ नका, असा एक प्रायोगिक प्रकल्प विकसित करा, असे निर्देशही न्यायालयाने केंद्र सरकारला दिले.

न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या पीठाने मोटार वाहन कायद्यातील तरतुदी, ज्या सर्व वाहनांसाठी थर्ड-पार्टी जोखमींचा समावेश असलेला वैध विमा अनिवार्य करतात, त्यांची पुरेशी अंमलबजावणी होत नाही, असे निरीक्षण नोंदवले. तसेच वित्तविषयक स्थायी समितीच्या २०२४-२५ च्या अहवालानुसार भारतीय रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांपैकी सुमारे ५६ टक्के वाहनांचा विमा उतरवलेला नाही, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे, असेही न्यायालयाने नमूद केले. देशातील ३०.४८ कोटी वाहनांपैकी १६.५४ कोटी वाहनांचा विमा काढलेला नाही. न्यायासनाने पुढे म्हटले की, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या सल्ल्याने एक प्रायोगिक प्रकल्प विकसित करावा. ज्यामध्ये वाहनांना होणारा इंधन पुरवठा त्यांच्या वैध विमाच्या स्थितीशी जोडला जाईल. जर एखाद्या वाहनाचा विमा वैध नसेल, तर त्या वाहनास पेट्रोल पंपावर इंधन पुरवले जाणार नाही. असे केल्यास विमा किंवा नोंदणी नसलेली वाहने ओळखण्यास मदत होईल आणि वाहन मालकांना वैध विमा काढण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असेही न्यायालयाने नमूद केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### सौरव दासला हायकोर्टाची नोटीस

**नवी दिल्ली:** न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांच्याविरोधात समाज माध्यमावर बदनामीकारक मोहीम चालवल्याप्रकरणी कॉकरोच पार्टीचा प्रवक्ता सौरव दास याच्याविरोधात फौजदारी अवमानना याचिका दाखल करण्यात आली असून, या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने त्याला नोटीस बजावली आहे. याशिवाय, या प्रकरणाशी संबंधित इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट करण्याचा आरोपही त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी दिल्ली मद्यधोरण प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजय सिंह आणि इतरांविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी स्वतःहून दखल घेत कारवाई सुरू केली होती.

### चंदीगडमध्ये शस्त्र तस्कराला अटक

**चंदीगड:** बीएसएफ आणि तरनतारन पोलिसांनी संयुक्त कारवाईत एका तस्कराला अटक केली.पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातू एक रायफल आणि सात अत्याधुनिक पिस्तुले जप्त केली. आरोपी या शस्त्रांची खेप समाजविघातक लोकांना पुरवण्याच्या प्रयत्नात होता.पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, या शस्त्रास्त्रांची खेप सीमेपलीकडे कार्यरत देशद्रोही घटकांकडून गुंडांच्या नेटवर्कच्या संगनमताने लक्ष्यित हत्येसाठी आणि पंजाबमधील शांतता आणि जातीय सलोखा बिघडवण्यासाठी पाठवल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या संयुक्त कारवाईत एक एमपी-०९ रायफल आणि सात अत्याधुनिक पिस्तूल जप्त करण्यात आले. याप्रकरणी एफआयआर नोंदवण्यात आला असून बॅकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेज स्थापित करण्यासाठी व नेटवर्कमधील इतर सदस्यांची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

### विशाखा राठोडचे अमिरातमधून प्रत्यार्पण

**नवी दिल्ली:** केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) परराष्ट्र मंत्रालय आणि गृह मंत्रालयाच्या समन्वयाने ८८ कोटी रुपयांच्या गुंतवणूक घोटाळा प्रकरणात फरार



असलेल्या विशाखा राठोडला संयुक्त अरब अमिरातीमधून भारतात यशस्वीरित्या परत आणले आहे. विशाखा एका मोठ्या आर्थिक घोटाळा प्रकरणात फरार होती. विशाखाने आपल्या सहकाऱ्यांसोबत मिळून गुन्हेगारी कट रचत गुंतवणूकदारांना दरमहा निश्चित परताव्याचे खोटे आश्वासन देऊन अनेक योजनांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात इंटरपोलमार्फत तिच्याविरुद्ध रेड नोटीस जारी करण्यात आली होती. ■

# तरुणांची समजूत काढणे गरजेचे

## कॉक्रोच पार्टीच्या निदर्शनांवर सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

२० जुलैच्या 'संसद चलो' मोर्चाच्या आयोजकांनी कथितरीत्या हिंसाचार भडकवल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाईची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी सहमती दर्शवली. यावेळी न्यायालयाने निदर्शनांदरम्यान कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी संयम बाळगण्याच्या गरजेवर भर दिला. जर काही भरकटलेले घटक दगडफेक करीत असले, तरी तरुणांची समजूत काढून त्यांना शांत केले पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

वायुदलाच्या एका निवृत्त अधिकाऱ्याने दाखल केलेली याचिका सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमाल्या बागची व न्या. व्ही. मोहना यांचाही समावेश असलेल्या न्यायासनाने एका तत्सम



याचिकेसोबत जोडली. १५ दिवस उलटून गेले आहेत. आयोजकांच्या जबाबदारीचे काय? ते एका वाहिनीवरून दुसऱ्या वाहिनीवर जाऊन प्रक्षोभक विधाने करीत आहेत आणि ही आग शमविण्यास नकार देत आहेत, असे याचिकाकर्ते मनीषकुमार सोलंकी यांच्या वतीने बाजू मांडताना वकील रिझवान अहमद म्हणाले. आंदोलकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकारांनी अतिनम्रता दाखवू नये किंवा अवास्तव तडजोड करू नये, असे त्यांनी राजस्थानातील कायदा व सुव्यवस्थेच्या अलिकडील एका घटनेचा संदर्भ देताना सांगितले.

एका तरुणाचा मृत्यू झाला. राष्ट्रीय राजधानीच्या बाबतीत सरकारने मागे हटले, तर राजस्थानमध्ये त्याचा आदर्श निर्माण होणार नाही का? तिथेही सरकार विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी झुकणार आहे. उद्या लखनौमधील पदवी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी काही मागणी केली आणि बसेसवर दगडफेक केली, तर उत्तरप्रदेशातील सरकारही झुकणार का, असा युक्तिवाद रिझवान अहमद यांनी केला. जर काही गैरमार्गाला लागलेले घटक दगडफेक करीत असले, तरी तरुणांची समजूत काढणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे, असे या युक्तिवादाला प्रतिसाद देताना सरन्यायाधीशांनी सांगितले.

◂ (वृत्तसंस्था)

### निदर्शक लोकशाहीच्या मंदिराकडे जात होते

संसद हे 'लोकशाहीचे मंदिर' आहे. ५०० लोक त्या परिसरात घुसले असतील, तर त्यांच्याकडे गावठी बंदूक होती की नाही, हे कोणाला माहीत? समजा त्यांनी गोळीबार केला असता तर? ते काही राष्ट्रीय महामार्गावरून किंवा रेल्वेमार्गावरून चालले नव्हते. ते लोकशाहीच्या मंदिराच्या दिशेने चालले होते. प्रत्येकालाच यासाठी जबाबदार धरले पाहिजे, असे ते म्हणाले. ■

### उद्या अल्फा, बिटा, डेल्टा येतील

केवळ सरकारची भूमिका 'चुकीची' होती म्हणून दगडफेकीत सहभागी असलेल्यांना कोणत्याही परिणामाविना मोकाट सोडून दिले जाऊ नये, असा युक्तिवाद रिझवान यांनी त्यावर केला. हा अत्यंत धोकादायक पायंडा आहे. तीन वर्षांपूर्वी शेतकरी सिंघू सीमेवर होते. उद्या जनरेशन अल्फा, बिटा, डेल्टा येतील, असे ते म्हणाले. ■

# 'ॲनालॉग' पनीरवर एक वर्षाची बंदी

### राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई, ५ ऑगस्ट**

सार्वजनिक आरोग्याबाबतच्या चिंता आणि अन्नसुरक्षा नियमांचे मोठ्या प्रमाणावर होणारे उल्लंघन लक्षात घेऊन, महाराष्ट्र सरकारने 'ॲनालॉग' किंवा गैर-दुग्धजन्य पनीरच्या निर्मिती आणि विक्रीवर एक वर्षाची बंदी घातली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली.

बेकायदेशीर निर्मिती किंवा विक्री केल्यास गुन्हेगारांना जन्मठेप किंवा १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते, असे राज्य सरकारने अलिकडेच जारी केलेल्या आदेशावरून स्पष्ट झाले आहे. अशा प्रकारची बंदी घालणारे महाराष्ट्र हे छत्तीसगडनंतरचे दुसरे राज्य आहे. अनेक हॉटेल्स,रेस्टॉरन्ट्स, केटरर्स आणि इतर खाद्यपदार्थ विक्रीच्या आस्थापनांकडून पारंपरिक पनीरऐवजी ॲनालॉग पनीरचा वापर केला जात होता. मात्र, मेनुकार्ड, बिल किंवा डिस्प्लेमध्ये या बदलाबाबत कोणतीही माहिती दिली जात नव्हती, असे अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) निदर्शनास आणून दिले आहे. ॲनालॉग पनीर हा दुधातील स्निग्धतेऐवजी वनस्पती तेल, स्टार्च, इमल्सिफायर आणि इतर पदार्थ वापरून बनवलेला दुग्धजन्य पदार्थांना पर्याय आहे. पारंपरिक पनीरपेक्षा याचे उत्पादन स्वस्त असते आणि सामान्यतः त्यात प्रथिनांचे प्रमाण कमी असते. महाराष्ट्र अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांनी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्यात 'ॲनालॉग पनीर'चे उत्पादन, प्रक्रिया, निर्मिती, पॅकिंग, साठवणूक, वितरण, घाऊक व किरकोळ विक्री, तसेच विक्रीसाठी उपलब्ध करून देणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

◂ (वृत्तसंस्था)

# भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

## प्रदेश उपाध्यक्षपदी नागपूरचे वीरेंद्रशहा उईके यांची निवड

**मुंबई, ५ ऑगस्ट**

भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जमाती (एसटी) मोर्चाची नवीन प्रदेश कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या नव्या कार्यकारिणीत विदर्भातील पदाधिकाऱ्यांचा दबदबा पाहायला मिळत असून, अनेक निष्ठावंत आणि सक्रिय नेत्यांना महत्त्वाच्या पदांची धुरा सोपवण्यात आली आहे. नागपूरचे विरेंद्रशहा उईके, अकोल्याचे उमेश पवार आणि यवतमाळचे राहुल आत्राम यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, तर नागपूरचे आकाश मडावी यांच्याकडे प्रदेश सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर गडचिरोलीचे सुरज दयाराम मुडावी यांच्याकडे सोशल मीडिया प्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

कार्यकारिणीत विदर्भातील चार जणांना प्रदेश सचिव पदावर काम करण्याची संधी मिळाली असून नागपूरचे विवेक नागभिरे यांची प्रदेश कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार एसटी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव होळी आणि प्रभारी तथा प्रदेश महामंत्री आमदार योगेश सागर यांनी या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा केली.

अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. यामध्ये केवल बाबाराव झामरकर, बंडू चांदेकर, राघोजी शंकर गेडाम, राहत कुमरे, ललित मडावी, राजू नारायण मडावी, सुचिता रमेश मडावी, विजय चव्हाण, शशिकला झाडे, आनंदा जियालाल वाढीवा, धर्मराज रामचंद्र भलावी, लक्ष्मीकांत ताराचंद सलामे, धनराज पूनम कोव, नाजुक गांडोजी पुरीम, सतीश पारटेत, सदानंद गाते, ललोत पवार मरस्कोले, राशन टेकाम, अर्जुन आत्राम आणि अविनाश पोरटी यांचा समावेश आहे. यासोबतच पक्षाने विशेष निमंत्रित सदस्य म्हणून विदर्भातील ज्येष्ठ नेत्यांना स्थान दिले आहे. यामध्ये नागपूरच्या खासदार मायाताई इवनाते, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके (यवतमाळ), गोंदियाचे आमदार संजय पुराम, यवतमाळचे आमदार राजू तोडसाम, अमरावतीचे आमदार केवलराम काळे आणि गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलींद नरोटे यांचा समावेश आहे.

◂ (तभा वृत्तसेवा)

### माजी लोकप्रतिनिधींना कार्यकारिणीत स्थान

**माजी लोकप्रतिनिधींमध्ये गडचिरोलीचे माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार राजे अंब्रीशराव आत्राम, माजी आमदार क्रिष्णा गजबे, माजी आमदार डॉ. नामदेवराव उसेंडी, यवतमाळचे माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे, वर्धा येथील नितीन मडावी, अमरावतीचे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर आणि यवतमाळचे माजी आमदार उत्तमराव इंगळे यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून कार्यकारिणीत स्थान मिळाले आहे.** ■



केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर पंजाबमध्येही शिक्षणमंत्री हरज्योत सिंग बैंस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर पाण्याचे फवारे मारल्या जात आहे

# पारधी विकास परिषदेच्या युवक अभ्यास वर्गाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विदर्भातील २२० ठिकाणांहून २४० युवक-कार्यकर्त्यांचा सहभाग




दोन दिवसीय पारधी समाज युवक अभ्यास वर्गाला उपस्थित मान्यवर

**नागपूर, ५ ऑगस्ट**

पारधी विकास परिषद, विदर्भ प्रांताच्या वतीने दिनांक १ व २ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय पारधी समाज युवक अभ्यास वर्गाला विदर्भातील विविध जिल्ह्यांतील सुमारे २२० ठिकाणांहून २४० युवक-कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समाजामध्ये सक्षम, सुशिक्षित, संघटित आणि संविधानिक मूल्यांवर आधारित युवक नेतृत्व निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार, रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम कार्यकर्ते घडविणे, हा या अभ्यास वर्गाचा प्रमुख उद्देश होता.

अभ्यास वर्गाच्या उद्घाटन सत्रात संदीप पाटील (पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र) यांनी युवकांना शिक्षणाचे महत्त्व, स्पर्धा परीक्षांची तयारी, व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, नेतृत्व आणि संघटनात्मक पद्धतीने समाजासाठी कार्य करण्याची आवश्यकता याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

प्रमुख वक्ते श्रीधरराव गाडगे यांनी पारधी समाजाचा इतिहास, संघर्ष, सामाजिक प्रवास, समाजासमोरील आव्हाने आणि परिवर्तनाची दिशा या विषयांवर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. यावेळी सोमदत्त करंजीकर (संस्थापक अध्यक्ष, वैनगंगा कॉलेज), अमरसिंग भोसले (उपाध्यक्ष, पारधी विकास परिषद), प्रदीप वडनेरकर (मार्गदर्शक, पारधी विकास परिषद) तसेच आशिष कावडे (संयोजक, पारधी विकास परिषद) यांनीही युवकांना मार्गदर्शन केले.

उद्घाटन सत्रानंतर महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी अभ्यास वर्गाला भेट देऊन युवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती, शासनाच्या विविध योजनांचा लाभ, युवकांचे नेतृत्व आणि संघटित समाजनिर्मिती यांचे महत्त्व अधोरेखित करत समाजातील युवकांनी विकास प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. विशेष सत्रात अतुल मोघे यांनी 'पारधी समाजाचा इतिहास, संघर्ष, सामाजिक ओळख आणि भविष्याची दिशा' या विषयावर अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत प्रचारक गणेश शेटे यांनी शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या युवकांशी संवाद साधत उच्च शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रभावना आणि समाजाप्रती जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. तर पारधी विकास परिषदेचे संयोजक आशिष कावडे यांनी मार्गदर्शन करत पुढील काळातील संघटनात्मक नियोजन, जिल्हानिहाय कृती आराखडा, गावपातळीवरील उपक्रम आणि युवकांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. समारोपीय सत्रामध्ये पारधी विकास परिषदेचे मार्गदर्शक प्रदीप वडनेरकर यांनी समाजाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षण, संघटन, शिस्त आणि जबाबदार नेतृत्व यांचे महत्त्व अधोरेखित केले.

◂ (तभा वृत्तसेवा)

### युवकांनी समाजहितासाठी केला सामूहिक संकल्प

या अभ्यास वर्गामध्ये उपस्थित सर्व युवकांनी भारतीय संविधानावर निष्ठा ठेवून शिक्षणाचा प्रसार, शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू कुटुंबापर्यंत पोहोचविणे, समाजाला संघटित करणे, सामाजिक समरसता वाढविणे आणि पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर कार्य करण्याचा सामूहिक संकल्प केला. कार्यक्रमादरम्यान पारधी विकास परिषदेच्या अध्यक्षपदी कैलास पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ■

# पक्षाची घटना तपासण्याचा अधिकार आयोगाला नाही

## शिवसेना पक्ष-चिन्ह प्रकरणावर सिब्बल यांचा युक्तिवाद

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

परिच्छेद १५ अंतर्गत पक्षाची घटना लोकशाही मार्गाची आहे की नाही हे तपासण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही. पक्षाची घटना वैध आहे की लोकशाहीवादी आहे, हे ठरवण्याचा अधिकार परिच्छेद १५ अंतर्गत निवडणूक आयोगाला नाही. तो त्यांच्या अधिकारक्षेत्राचा भागच नाही. २०१८ मध्ये पक्ष संघटनेच्या रचनेची तपासणी न करता आयोगाने निर्णय दिला. त्यांनी विधिमंडळ पक्षाच्या संख्याबळावर हा वाद सोडवला, हा प्रकार सादिक अली प्रकरणातील निर्णयाच्या पूर्णपणे विरोधात आहे, परिच्छेद १५ चा मूळ पायाच राजकीय पक्षातील वाद असून, यावर न्यायालयाला निर्णय घ्यावा लागेल, असा युक्तिवाद उबाठाचे वकील कपिल सिब्बल यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात केला.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेत शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह कुणाचे या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. उबाठाची बाजू मांडताना सिब्बल यांनी शिवसेनेत पडलेली फूट आणि पुढील घटनाक्रम यामधील महत्त्वाचे मुद्दे न्यायासनासमोर मांडले. आयोगाने घेतलेले निर्णय लोकशाहीच्या चौकटीत घेण्यात आले का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. अशा निर्णयाचे देशाच्या राजकीय व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होणार आहेत. बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे प्रमुख होते. पुढे उद्धव ठाकरे हे पक्षप्रमुख बनले. २०१८ मध्ये त्यांची पुन्हा पक्षप्रमुख पदी निवड झाली. त्यांनीच एकनाथ शिंदे यांना नेते म्हणून नियुक्त केले होते. एका राजकीय पक्षात दोन परस्परविरोधी गट किंवा घटक आहेत. याचा विधिमंडळ पक्षाशी काहीही संबंध नाही.

◂ (वृत्तसंस्था)

### पक्षप्रमुख गटनेत्याला हटवू शकतो

शिवसेनेत फूट पडल्यानंतर काही आमदार हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांना गटनेतेपदावरून हटवून अजय चौधरी यांची गटनेतेपदी नियुक्ती केली. तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे वेगवेगळे आहेत. राजकीय पक्षाचा प्रमुख हाच गटनेत्याला हटवू शकतो, असा युक्तिवादही सिब्बल यांनी केला. आता गुरुवारी दुपारी २ वाजता पुन्हा याप्रकरणी सुनावणी होणार आहे. ■

# डॉ. डी. वाय. पाटील यांना अखेरचा निरोप

**कोल्हापूर, ५ ऑगस्ट**

ज्येष्ठ शिक्षणमहर्षी, पद्मश्री आणि बिहार, पश्चिम बंगाल व त्रिपुराचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांचे ४ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, ५ ऑगस्ट रोजी



सायंकाळी कोल्हापुरातील कसबा बावडा येथील पॅव्हेलियन मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी यशवंत निवास येथे ठेवण्यात आले होते.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निवासस्थान असलेल्या कसबा बावड्यात कालपासून दुकाने बंद ठेवून डॉ. पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचे कसबा बावड्याशी ऋणानुबंध होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, वनमंत्री गणेश नाईक, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, निवृत्त न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, अभिनेते भरत जाधव, माजी खासदार संभाजी राजे छत्रपती, आमदार अमित देशमुख, जयंत पाटील, अमल महाडिक, शिवाजीराव पाटील यांनी अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

◂ (तभा वृत्तसेवा)

# वंदे मातरम् गायल्याने आभाळ कोसळणार नाही

## मदरशांमध्ये गाण्याविरोधात याचिका; कोलकाता उच्च न्यायालयाने फटकारले

**कोलकाता, ५ ऑगस्ट**

मदरशांमध्ये वंदे मातरम् ची सहाही कडवी गायली तर आभाळ कोसळणार नाही, अशा स्पष्ट शब्दांत कोलकाता उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला फटकारले. केंद्र सरकारच्या आदेशाविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या मागणीवरच आक्षेप घेतला.



प्रभारी मुख्य न्यायमूर्ती तपव्रत चक्रवर्ती यांच्यासमोर जनहित याचिकेवर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी ख्रिश्चन शाळांचे उदाहरण देत विचारले की, देशात हजारो ख्रिश्चन शाळा आहेत, जिथे सर्वधर्मीय विद्यार्थी ईश्वराची प्रार्थना करतात. मग तिथे एका विशिष्ट धर्माचे विद्यार्थी आम्हाला ख्रिश्चन धर्मातील गोष्टी का सांगता, असा आक्षेप घेतात का, जर आज मला माझ्या धर्मात नसलेले एखादे वाक्य किंवा विधान उच्चारायला सांगितले, तर मी माझ्या धर्माचा राहत नाही का, त्यामुळे मदरशांमध्ये वंदे मातरम् गायल्यास कोणाचाही धर्म धोक्यात येणार नाही. न्यायमूर्तींच्या टिप्पणीनंतर याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना वकील विकास रंजन भट्टाचार्य यांनी सांगितले की, राज्यघटना स्वीकारताना अत्यंत सखोल चर्चेनंतर केवळ पहिली दोनच कडवी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारली गेली होती. जर कोणाला स्वखुशीने संपूर्ण गीत गायचे असेल तर त्याला कोणाचाच विरोध नाही, परंतु हे कोणावरही जबरदस्तीने लादता कामा नये. अशा सक्तीमुळे सामाजिक व धार्मिक सौहार्द बिघडू शकते.

◂ (वृत्तसंस्था)

### कारवाई झाल्याची माहिती द्या

सक्ती असूनही गीत गाण्यास नकार दिला आणि त्यांना कारावासाची शिक्षा झाली, तर ते कायदेशीर दाद कशी मागू शकतील, असा प्रश्न भट्टाचार्य यांनी उपस्थित केला. यावर न्यायमूर्ती म्हणाले, वंदे मातरम् न गायल्यामुळे अद्याप कोणावरही कोणतीही दंडात्मक किंवा कठोर कारवाई झाली असल्यास त्यासंदर्भातील माहिती सादर करावी. अतिरिक्त महान्यायअभिकर्ता धीरज कुमार त्रिवेदी यांनी अधिसूचनेला स्थगिती देण्याच्या मागणीला विरोध करत म्हटले, दुर्दैवाने, अशा जनहित याचिका दाखल केल्या जात आहेत ज्यांचा उद्देश केवळ प्रसिद्धी मिळवणे हाच आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १६ सप्टेंबर निश्चित करण्यात आली. ■

### सात वर्षांत २७४ गुन्हेगारांचे प्रत्यार्पण

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

केंद्र सरकारच्या 'ऑपरेशन त्रिशूल' अंतर्गत, गेल्या सात वर्षांत ३६ देशांमधून २७४ फरार गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात आले. या कालावधीत १७,८७४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती केंद्रीय गृह मंत्रालयाने दिली आहे. हे गुन्हेगार विविध देशांमध्ये बनावट नावे आणि ओळख लपून बसले होते.

तपास यंत्रणांनी उपग्रह आणि डिजिटल पुराव्याचा वापर करून या गुन्हेगारांच्या भौगोलिक स्थानाचा मागोवा घेतला आणि त्यांना शोधून काढले. प्रत्यार्पण करण्यात आलेल्यामध्ये दहशतवादी, कुख्यात गुन्हेगार, आर्थिक आणि अमली पदार्थ तस्कर, तसेच खून, बलात्काराचे आरोप असलेल्या गुन्हेगारांचा समावेश आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, सात वर्षांच्या कालावधीत, मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्या (पीएमएलए) अंतर्गत फरार गुन्हेगारांची १७,८७४ कोटी किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आणि १८,७६२ कोटींची रक्कम परत आणण्यात आली.

◂ (वृत्तसंस्था)



जर मुलांवर गोळ्या, पेलेट गन, अश्रुधूर किंवा लाठीचार्ज करण्याचे आदेश दिले गेले असतील, तर कोणीतरी जबाबदार असले पाहिजे. कोणीतरी ते आदेश दिले असतील आणि त्यांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे.
**- प्रियांका गांधी**, काँग्रेस खासदार



सुनेत्रा वहिनींनी स्वतः निर्णय घेतले तर चांगले होईल, पण त्या घेतात आणि बाकीचे लोक मीडियासमोर जाऊन बोलतात. त्यांनी निर्णय सांगण्याऐवजी इतर लोकच पुढे येतात. आपल्या नेत्याची उंची राखण्याचा प्रयत्न सर्वच नेत्यांनी करणे गरजेचे आहे.
**- शशिकांत शिंदे**, प्रदेशाध्यक्ष (शप गट)

# रशियाच्या हल्ल्याने कीव्हची दाणादाण

## निवासी इमारती, पायाभूत सुविधा उद्ध्वस्त; १७ नागरिक ठार



रशियाच्या हल्ल्यानंतर बचावकार्यात गुंतलेले युक्रेनच्या सुरक्षा दलाचे पथक

**कीव्ह, ५ ऑगस्ट**

रशियाच्या वायुदलाने बुधवारी पहाटे युक्रेनची राजधानी कीव्ह शहर आणि आसपासच्या परिसरात २४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, सुपरसॉनिक ओनिक क्षेपणास्त्रे आणि ११५ ड्रोनचा मारा केला. अवघ्या दोन तासाच्या आत झालेल्या झालेल्या या हल्यात कीव्ह शहरातील निवासी इमारती, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. ढिगाऱ्यातून १७ मृतदेह आणि ४४ जखमींना बाहेर काढण्यात आले.

हल्ले प्रामुख्याने नागरी भाग, औद्योगित वसाहती, रेल्वे स्थानके आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करून झाल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली. निवासी भागांवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा करणे दहशतवादी कृत्य आहे. रशियाचे हल्ले रोखण्यासाठी आम्हाला इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांची आवश्यकता असून, मित्र देशांनी तातडीने या क्षेपणास्त्रांचा पुरवठा करावा असे आवाहन झेलेन्स्की यांनी केले. दरम्यान इराणविरोधात सुरू असलेल्या संघर्षामुळे अमेरिकेकडे इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा मर्यादित साठा आहे. ही प्रणाली त्यांच्या शस्त्रागारातील बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे पाडण्यास सक्षम असलेली एकमेव हवाई संरक्षण प्रणाली आहे.

युक्रेनमधील सर्वात मोठ्या किरकोळ आणि बांधकाम साखळीपैकी एक असलेली एपिसेंटर कंपनीची इमारत हल्ल्यात उद्ध्वस्त झाली. काही मिनिटांतच अनेक दशकांपासून उभारलेली सर्व संपत्ती नष्ट झाली. (वृत्तसंस्था)

### युक्रेनला वाचविणे मित्र देशांच्या हातात

आमच्या भागीदारांनी हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, इंटरसेप्टर प्रणालीचा पुरवठा करण्यास होणारा विलंब आणि अँटी-बॅलिस्टिक प्रणाली सुपूर्द करण्यास दाखवलेली अनिच्छा जीवितहानी आणि विध्वंसास कारणीभूत ठरत आहे. युक्रेनला वाचवणे मित्र देशांच्या शस्त्र पुरवठ्यावर अवलंबून आहे. रशियाच्या हल्ल्यात राजधानीच्या आसपासच्या ब्रोवारी, बुचा आणि फास्टिव्ह जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी आगी लागल्या. ब्रोवारी शहर आणि वेलिका डायमेर्का, क्विटनेव्ह व पेरेमोहा या गावांमध्ये मोठ्या गोदामांना आग लागली. यात १७ नागरिकांना जीव गमवावा लागला असे झेलेन्स्की यांनी म्हटले आहे.

# इराणचे आखाती देशांवर हल्ले

## कुवेत-युएई स्फोटाने हादरले; ड्रोन-क्षेपणास्त्रांचा मारा

**दुबई, ५ ऑगस्ट**

होर्मुझची सामुद्रधुनी उघडणे आणि शांतता करारासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वारंवार धमक्या देत असतानाच चार दिवसांच्या विश्रांतीनंतर इराणनने पुन्हा आक्रमकता दाखवत कुवेत आणि संयुक्त अरब अमिरातीवर (यूएई) ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा केला. ट्रम्प यांच्या धमकीला डावलत बुधवारी पहाटे दुबई शहरावर ३० मिनिटात इराणने ड्रोनचा मारा केला. दुसरीकडे कुवेतमध्ये अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. अमेरिकेने हल्ले रोखण्याची घोषणा केली असताना, इराणने हल्ल्याची तीव्रता वाढवली आहे.



दुबई शहरातील औद्योगिक परिसरात झालेल्या हल्ल्यानंतर अनेक स्फोट झाले

इराणच्या नवीन हल्ल्यांमुळे ट्रम्प यांची धमकी निष्फळ ठरल्याचे दिसून येत आहे. युएईचे प्रमुख शहर दुबईच्या जेबेल अली औद्योगिक क्षेत्रात ड्रोनच्या माऱ्यामुळे अनेक स्फोट झाले. अमिरातीच्या अधिकाऱ्यांनी २० मिनिटांत किमान सात स्फोट झाल्याची पुष्टी केली. या घटनेचे चित्रीकरण केल्याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्डने तीन ड्रोनद्वारे अमेरिकी तळांवर हल्ला केला. कुवेत आणि इराकच्या बसरा प्रांतातही शक्तिशाली स्फोट झाल्याचे वृत्त आहे. ट्रम्प यांच्या अंतिम इशाऱ्यानंतर दुसऱ्या दिवशी, इराणने कुवेतमधील अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य करून तणाव आणखी वाढवला.

**जहाजांवर देखरेख ठेवण्याचा अधिकार हवा**

इराणला होर्मुझ सामुद्रधुनीत प्रवेश करणाऱ्या जहाजांवर नियंत्रण हवे आहे, तसेच त्यातून बाहेर पडणाऱ्या जहाजांवर देखरेख ठेवण्याचा अधिकारही हवा आहे. कतारने म्हटले आहे की पाकिस्तान आणि ओमानच्या मध्यस्थीने हा तिढा सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते, माजेद अल-अन्सारी यांनी सांगितले की, दोन्ही बाजूंमध्ये प्रस्तावांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि संवाद पुढे नेण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत, मात्र अद्याप यश आले नाही. (वृत्तसंस्था)

### करार चोवीस तासांत होणार

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरक्षित सुरू करण्यासाठी इराणसोबत चोवीस तासात करार होऊ शकतो, अशी माहिती ट्रम्प यांनी माध्यमांशी बोलताना दिली. होर्मुझ लवकरात लवकर खुली न केल्यास दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सर्वात मोठ्या आणि तीव्र लष्करी कारवाईला इराणला सामोरे जावे लागेल. आम्ही इराणशी चर्चा करत असून त्यांना ही एक शेवटची संधी देत आहोत. ते लवकरच यावर कोणताही एक निर्णय घेतील. ही काही फार गुंतागुंतीची बाब नाही. दुसरीकडे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी वाटाघाटीची प्रक्रिया सुरू असल्याचे वृत्त फेटाळले.



### सोन्याची तस्करी; दोन महिलांना अटक

**नवी दिल्ली :** इस्तंबूलहून आलेल्या दोन महिला प्रवाशांनी 'बाजूबंद' म्हणून लपवून आणलेले सुमारे एक किलो तस्करी केलेले सोने दिल्ली विमानतळावरील सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी जप्त केले, अशी माहिती बुधवारी देण्यात आली. ५ ऑगस्ट रोजी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलेल्या या प्रवाशांना 'अॅडव्हान्स पॅसेंजर इन्फॉर्मेशन सिस्टम'द्वारे केलेल्या प्रोफाइलिंगच्या आधारे 'ग्रीन चॅनेल' ओलांडल्यानंतर अडविले.

# पोलिस दल आधुनिकीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन

## केंद्राची सर्वोच्च न्यायालयात माहिती



**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

देशभरातील पोलिस दलांच्या आधुनिकीकरणासाठीच्या एका सर्वसमावेशक योजनेला तत्त्वतः मंजुरी मिळावी, या उद्देशाने अर्थ मंत्रालयाच्या 'व्यय विभागा'कडे एक प्रस्ताव पाठवण्यात आला आहे, अशी माहिती केंद्राने बुधवारी सर्वोच्च न्यायालयाला दिली. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

केंद्राची बाजू मांडताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजकुमार भास्कर ठाकरे यांनी सांगितले की, हा प्रस्ताव तत्त्वतः मंजुरी मिळण्यासाठी ८ जुलैला पाठवण्यात आला आहे. सध्या तो विचाराधीन आहे. तसेच पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यासाठीची सध्याची निधी योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवण्यात आली आहे. न्यायालयाने अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्यासाठी सरकारी वकिलांना दोन आठवड्यांचा वेळ देत या प्रकरणाची पुढील सुनावणी १ सप्टेंबर रोजी निश्चित केली. २२ जुलैला सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, देशभरातील पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याच्या प्रकरणातील गोष्टी योग्य दिशेने पुढे जात आहेत आणि त्यात सकारात्मक वळण आले आहे. या प्रकरणात न्यायालयाचे मित्र म्हणून सर्वोच्च न्यायालयाला सहकार्य करणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ दवे यांनी न्यायासनाला माहिती दिली होती की, या कामात लक्षणीय प्रगती झाली आहे. (वृत्तसंस्था)

# रिकव्हरी एजंट सांगून लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट -**

श्रीराम फायनान्सचे रिकव्हरी एजंट असल्याचे सांगून मोटरसायकलस्वारांना लुटणाऱ्या टोळीचा बार्शी तालुका पोलिसांनी अवघ्या २ तासात पर्दाफाश केला आहे.

तक्रारदार महेश चव्हाण (रा. बाभूळगाव, ता.पंढरपूर) हे लातूरहून येरमाळ्याकडे जात असताना बार्शी तालुका पोलीस ठाणे हद्दीतील कुसळंबजवळ दोन अज्ञातांनी त्यांच्या म ोटरसायकलला धडक मारुन खाली पाडले. आरोपींनी आम्ही श्रीराम फायनान्सचे लोक आहोत. मोटरसायकलचे हप्ते का थकवले? आत्ताच्या आत्ता ५० हजार रुपये दे, नाहीतर गाडी घेऊन जाऊ, असे म्हणत शिवीगाळ केली. फिर्यादीने गाडी भावाच्या कामगाराची असल्याचे सांगून फोन करतो, असे म्हटल्यावर आरोपींनी त्यांना मारहाण केली. जवळील दगडाने डोक्यात मारण्याची धमकी देऊन खिशातील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. तसेच मोबाईल फोडून नुकसान करुन आरोपी पळून गेले. या प्रकरणी बार्शी तालुका पोलिस ठाण्यात रॉबरीचा गुन्हा दाखल झाला होता. सहाय्यक पोलिस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. आरोपींनी वापरलेल्या मोटरसायकल क्रमांकावरुन गुन्हे शोध पथकाने अवघ्या २ तासात दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

गुन्ह्यात वापरलेले वाहन आणि मारहाण करुन लुटलेली रक्कम पोलिसांनी हस्तगत केली आहे. अटक केलेल्या आरोपींची नावे अशी ऋषिकेश सुनील साठे, रा. भवानी पेठ, बार्शी व मुजम्मिल रियाज सय्यद, रा. मंगळवार पेठ, बार्शी. दोन्ही आरोपींना आज न्यायालयात पोलीस रिमांडसाठी हजर करण्यात येणार आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आबासाहेब शिरगिरे करीत आहेत.

ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षकअक्षय सोनवणे, पीएसआय कुलदीप सोनटक्के, पीएसआय आबासाहेब शिरगिरे, राजेंद्र मंगरुळे, युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, गणेश साठे, आकाश कांबळे, सतुल बाकले, मारुती शेलार यांनी केली.

**आणखी फसवणूक असल्यास संपक करा**

रिकव्हरी एजंट सांगून ज्यांच्याकडून पैसे घेतले असतील किंवा फसवणूक झाली असेल, त्यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. या टोळीने आणखी गुन्हे केले असण्याची शक्यता आहे, असे आवाहन बार्शी तालुका पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

### जामगांव बायपासवर दुचाकी-एसटी धडक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट -**

बार्शी-कुसळंब रोडवरील जामगांव बायपास परिसरात दुचाकीस्वाराने भरधाव वेगात टेम्पोला चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात समोरून येणाऱ्या एसटी बसला धडक दिली. अपघातात एसटी बस व दुचाकीचे नुकसान झाले असून, याप्रकरणी एसटी बस चालकाने दुचाकीस्वाराविरोधात तक्रार दाखल केली आहे. मुंजा सुरवसे (वय ५२, रा. बीड) हे ३ ऑगस्ट रोजी एसटी बस क्र. एमएच २० बीएल २५५७ घेऊन पंढरपूरहून म ाजलगावकडे जात होते. सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास ही बस बार्शी-कुसळंब रोडवरील जाम गांव बायपासच्या पुढे जामगांव शिवारात आली असता समोरुन एक दुचाकीस्वार भरधाव वेगाने येत होता.त्याने टेम्पोला चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्नातून एसटी बसच्या समोरील उजव्या बाजूच्या बंपरला धडक दिली. अपघातात दोन्ही वाहनाचे २५ हजारांचे नुकसान झाले. निनाद परमेश्वर गोडसे (रा. पांगरी, ता. बार्शी) दुचाकीस्वाराचे नाव आहे.

# शिवशाही बसचे ब्रेक फेल; १४ प्रवासी सुखरूप

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ५ ऑगस्ट-**

पुणे - सोलापूर महामार्गावरील वरवडे टोलनाका येथे मंगळवारी (दि. ४) सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास भरधाव धावणाऱ्या शिवशाही बसचे (एमएच ०६ / बी डब्ल्यू ३५२२) अचानक ब्रेक फेल झाले. परंतू बसचालकाने प्रसंगावधान दाखवून बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या महावितरणच्या एका खांबाला धडकवली. नंतर मोकळ्या जागेतील विटांच्या ढिगावर जाऊन थांबली. सुदैवाने या अपघातात बसमधील कोणीही जखमी झाले नाही. याबाबत सोलापूरहून पुण्याकडे भरधाव वेगाने शिवशाही बस निघाली होती. बसने धडक दिल्याने हा लाईटचा खांब उन्मळून पडला.यामुळे खांबावरील तारा तुटून बसवर पडल्या. परंतू सुदैवाने या अपघातावेळी या भागात महावितरणमार्फत दुरूस्तीचे काम सुरू असल्याने लाईट बंद केलेली होती. यामुळे मोठा अनर्थ टळला. शिवशाही बसमधून एकूण १४ प्रवाशी प्रवास करीत होते. या अपघातामध्ये कोणीही जखमी झाले नाही. वरवडे टोलनाका येथील रुग्णवाहिका पथकाने तातडीने मदत कार्य सुरु केले.






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# ...हे देखील 'इन्फ्रास्ट्रक्चर'च !

नीती आयोगाच्या शालेय शिक्षण व्यवस्थेवरील ताज्या अहवालाने शिक्षण क्षेत्राचे जे भयावह वास्तव मांडले आहे, ते अत्यंत चिंताजनक म्हणावे असे आहे. एकीकडे आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारताचे स्वप्न बघत आहोत. विश्वगुरू होण्याची आकांक्षा आणि जगातील मातब्बर अर्थव्यवस्था बनण्यासाठी प्रयत्न करतो आहोत. दुसरीकडे, देशातील हजारो शाळांना कुलूप ठोकले जात आहे. लाखो मुलांचे शिक्षण माध्यमिक स्तरावर पोहोचण्याआधीच ठप्प होते आहे. कहर म्हणजे, ज्या शाळा सुरू आहेत, तिथेही शिक्षकांचा आणि सोयीसुविधांचा अभाव आहे. नीती आयोगाच्या अहवालानुसार, २०१७-१८ ते २०२२-२३ या अवघ्या पाच वर्षांत देशभरातील तब्बल ९२ हजार शाळा बंद पडल्या आहेत. लोकसंख्या वाढत असताना शाळांची संख्या १५.५८ लाखांवरून १४.६६ लाखांवर येणे धक्कादायक आहे. आहे त्या शाळांमध्ये सोयी नाहीत आणि असलेल्या शाळा बंद पडत आहेत, हे अत्यंत धोकादायक लक्षण मानले पाहिजे. देशातील १ लाखाहून अधिक शाळा आजही 'एका शिक्षकावर' चालत आहेत. तर ७ हजार ९९३ शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी एकही विद्यार्थी उरलेला नाही!

शाळा बंद पडण्यामागे सरकारच्या वतीने 'पटसंख्येची घट', 'शाळांचे विलीनीकरण' आणि 'एकात्मिक शाळा उभारणे' यासारखे धोरणात्मक व तांत्रिक युक्तिवाद केले गेले असले, तरी त्यामागील खरे कारण ग्रामीण भागात शिक्षकांचा अभाव, पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था आणि प्रशासकीय व्यवस्थेचे ढळढळीत अपयश हेच आहे. शाळेत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वाचनालय, संगणक प्रयोगशाळा आणि विषयतज्ज्ञ शिक्षक नसतील तर पालकांनी आपल्या मुलांना अशा शाळांमध्ये का पाठवावे, हा मुद्दा प्रशासनाच्या लक्षात येत नाही. बिहारच्या कैमूर जिल्ह्यातील एका माध्यमिक शाळेत पिण्याचे पाणी आणि पंखे नसल्याने विद्यार्थ्यांनीच आंदोलन केले आणि शेवटी उपविभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. महाराष्ट्रातील वेल्हे, धारूर आदी गावांमध्येही असेच आंदोलन झाले. आपल्या भविष्यासाठी आता विद्यार्थीच आंदोलन करीत आहेत, हे कुणालाच खटकत कसे नाही? एकाच शिक्षकाने पहिली ते चौथीपर्यंतच्या साऱ्या विद्यार्थ्यांना एकाच वर्गात बसवून शिकवणे, हे शिक्षण व्यवस्थेचे अपयश नव्हे तर काय? सरकारी शाळांमध्ये गुणवत्तेचा अभाव असतो म्हणून अपरिहार्यता म्हणून विद्यार्थी खाजगी शाळांत जातात. जे जाऊ शकत नाहीत, ते शिक्षणापासून दुरावतात. परिणामी पटसंख्या घटते आणि शेवटी त्या शाळा कायमच्या बंद पडतात. विद्यार्थी गळतीची आकडेवारी पाहिली तर परिस्थिती अधिकच भयाण दिसते. प्राथमिक स्तरावर प्रवेश घेण्याचे प्रमाण पुरेसे वाटत असले तरी उच्च माध्यमिक शाळेत पोहोचेपर्यंत ते फक्त निम्मे उरते. प्राथमिक शिक्षणात पाऊल ठेवणाऱ्या दर दहा विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच शिक्षण सोडून देतात. प्राथमिक ते उच्च प्राथमिक ९२.२ टक्के, उच्च प्राथमिक ते माध्यमिक ८६.६ टक्के आणि माध्यमिक ते उच्च माध्यमिक ७५.१० टक्के अशी प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांची मोठी गळती होत आहे. यामागे आर्थिक आणि सामाजिक घटक कारणीभूत आहेत. माध्यमिक शिक्षणाचा खर्च प्राथमिक शिक्षणापेक्षा ३ ते ५ पट जास्त आहे. शिक्षण हक्क कायदा केवळ १४ वर्षांपर्यंत म्हणजे ८ वीपर्यंतच मोफत शिक्षणाची हमी देतो. त्यामुळे माध्यमिक स्तरावर येताच शुल्क, प्रवास आणि परीक्षेच्या खर्चाचा ताण गरीब विद्यार्थी सहन करू शकत नाहीत. परिणामी, शाळेत जाण्याऐवजी ३९ टक्के मुले रोजगारात ढकलली जातात, २५ टक्के मुली कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये अडकतात. स्वच्छतागृहांच्या अभावामुळे सुद्धा मुली शिक्षण सोडून देतात. परवाच दृक-श्राव्य माध्यमावर एक बातमी झळकली, ज्यात स्वच्छतागृह वापरण्यासाठी विद्यार्थिनींची लांबलचक रांग लागली होती! खरे तर, देशातील भीषण गरिबी, स्त्री व बालकांवरील वाढते अत्याचार, प्रशासनातील प्रचंड भ्रष्टाचार आणि समाजात दिवसेंदिवस क्षीण होत चाललेली नागरी कर्तव्याची जाणीव याचा मागोवा घेत गेलो तर या सर्व सामाजिक व्याधींच्या केंद्रस्थानी शैक्षणिक संधींचा आणि दर्जेदार शिक्षणाचा अभाव हेच कारण दिसते. एखाद्या विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळत नाही, तेव्हा त्याच्यातील विचार करण्याची, न्याय-अन्याय पारखण्याची आणि कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता खुंटते. शिक्षणाअभावी रोजगाराच्या चांगल्या संधी हिरावल्या जातात आणि ती व्यक्ती व सोबतच त्याचे कुटुंब गरिबीच्या दुष्टचक्रात फसून राहते. दारिद्र्य आणि बेरोजगारीतून निर्माण होणारी हतबलता तरुण पिढीला गुन्हेगारी, व्यसनाधीनता आणि भ्रष्टाचाराकडे नेते. ज्या समाजात शाळा बंद पडतात, तिथे तुरुंगांची संख्या वाढवावी लागते, हा मानवी इतिहासातला नियम आहे. जेव्हा शिक्षण केवळ स्पर्धा, रँकिंग आणि कागदी पदव्यांमध्ये गुंडाळले जाते, जेव्हा ते विचारांची प्रगल्भता देत नाही, तेव्हा सुजाण नागरिक निर्माण होण्याची प्रक्रियाच बंद पडते. रस्त्यांवर कचरा फेकून देणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे, चिडीमारी करणे, व्यसनाधीन होणे आणि भ्रष्टाचाराचे उघड समर्थन करणे ही सगळी नागरी मूल्यांच्या आणि सुसंस्कृततेच्या अभावाची लक्षणे आहेत. नेल्सन मंडेला यांनी म्हटल्याप्रमाणे, शिक्षण हे असे शक्तिशाली शस्त्र आहे, ज्याचा वापर तुम्ही जग बदलण्यासाठी करू शकता. शिक्षणाचे हेच शस्त्र आपण गरीब वर्गाच्या हातात देऊ शकत नाही, तेव्हा त्यांना कायम शोषणाच्या अंधारात ढकलण्याचे पाप व्यवस्था करीत असते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीही स्पष्ट इशारा दिला होता की, जोपर्यंत देशातील शेवटच्या बालकाला उत्तम शिक्षण मिळत नाही, तोपर्यंत लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त होत नाही. स्वतंत्र भारताची शैक्षणिक कामगिरी ९२ हजार शाळांना कुलूप ठोकण्याच्या वर्तमानाशी पडताळून बघितली पाहिजे.

शिक्षणाचा दर्जा घसरण्यामागे आणि शाळा बंद पडण्यामागे या क्षेत्रावर होणारा तुटपुंजा खर्चही कारणीभूत आहे. आपल्या देशात सध्या शिक्षणावर केवळ २.९ ते ३.१ टक्के खर्च केला जातो. १९६६ च्या 'कोठारी आयोगाने' देशाच्या जीडीपीच्या किमान ६ टक्के खर्च शिक्षणावर करण्याची शिफारस केली होती. अगदी अलिकडच्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' मध्येही ६ टक्के खर्चाचा पुनरुच्चार झाला आहे. पण, गेल्या सहा दशकांत एकाही सरकारला हा टप्पा गाठता आलेला नाही. जगातील प्रगत आणि विकसित राष्ट्रांत शिक्षणावर मोठा खर्च केला जातो. नॉर्वे शिक्षणावर ८ टक्के, स्वीडन व फिनलंड ७.२ टक्के, अमेरिका ६ ते ६.२ टक्के खर्च करतात आणि म्हणून तेथे गरिबीचे प्रमाण कमी आहे. मानवी विकास निर्देशांकही जास्त आहे. भारत नावाचा विकसनशील देश द्रुतगती मार्ग, उड्डाणपूल, विमानतळे आणि भव्य इमारती यासारख्या भौतिक पायाभूत सुविधांवर लाखो कोटी रुपये खर्च करीत आहेत, ते केलेही पाहिजे. पण केवळ सिमेंट-काँक्रीटचे रस्ते आणि पूल बांधून राष्ट्र महान होत नसते. उत्तम, सुजाण, ज्ञानी आणि नैतिक मूल्ये जपणारे नागरिक हेही या देशाला आवश्यक असलेले 'इन्फ्रास्ट्रक्चर'च आहेत, हे समजून घेतले पाहिजे. गरिबी समूळ नष्ट करायची असेल, गुन्हेगारीला वेसण घालायची असेल, भ्रष्टाचार कमी करायचा असेल आणि देशाला प्रगल्भ व सुसंस्कृत राष्ट्र म्हणून उभे करायचे असेल, तर शिक्षणावरील खर्चाला 'अनुत्पादक खर्च' न मानता, ती राष्ट्राच्या भविष्यासाठी पायाभूत सुविधांतील गुंतवणूक मानली पाहिजे. शिक्षणावर खर्च करतानाच व्यवस्थेचा हात आखडता असतो. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार हा तर वेगळाच विषय. या साऱ्यांवर आपण काहीच करणार नसू तर तुरुंगांची सर्वाधिक संख्या असलेला देश म्हणून लवकरच भारताचे नाव गाजेल, यात शंका नाही. ■

---

## दखल

**विवेक गिरिधारी**

# पूर्वांचलाशी एकरूप झालेले वर्णेकर दाम्पत्य

**मूळ नागपूरचे अशोकराव व अलकाताई वर्णेकर हे दाम्पत्य गेली ३० वर्षे आसाममधील चहाच्या मळ्यातील अतिमागास जनजाती मजुरांच्या शैक्षणिक सेवाकार्यात रममाण झाले आहेत. त्यांच्या कामाची दखल घेत पुण्यातील मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे त्यांना ६ ऑगस्ट रोजी एक लक्ष रुपयांचा 'वा. ना. अभ्यंकर गुरुगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा सविस्तर परिचय करून देणारा हा लेख.-**



पूर्वांचलात काम करणाऱ्या मराठी कार्यकर्त्यांची मांदियाळी मोठी आहे. त्यापैकी सलग तीन तपे तेथे राहून काम करण्याची प्रदीर्घ तपश्चर्या करणाऱ्या मोजक्या मंडळींपैकी अशोकराव व अलकाताई वर्णेकर हे नागपूरचे एक आगळेवेगळे दाम्पत्य. आसाममधील चाय बागान आदिवासी जनजातीच्या प्रश्नांकडे समाजाचे व शासनाचे लक्ष वेधण्याचे मोठे कार्य त्यांच्या ३० वर्षांच्या मूलभूत कामामुळे घडून येत आहे. साऱ्यांसाठी भूषणावह असलेले हे सेवाकार्य व्यापक समाजापुढे आणण्याचे काम मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या 'गुरुगौरव पुरस्कारा'मुळे घडून येते आहे.

अशोकराव वर्णेकर यांचे वडील श्रीधर भास्कर वर्णेकर हे मोठे संस्कृत पंडित होते. अशोक वर्णेकर मूळचे नागपूरकर. त्यांचा जन्म २० सप्टेंबर १९५० चा. शिक्षण एम.एस्सी. (संख्याशास्त्र) व एम.एस्सी. (अर्थशास्त्र). शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी नागपूरच्या इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये दीड वर्षे नोकरी केली व नंतर दोन वर्षे नागपूर विद्यापीठात अध्यापन केले. मे १९७७ मध्ये लग्न झाल्यावर पुढच्याच वर्षी ते मुंबईत दाखल झाले. तेथील दोन वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी वेगळी वाट चोखाळावी म्हणून इकॉनॉमिक टाईम्सच्या रिसर्च ब्युरोत पत्रकार म्हणून काम केले. अलकाताई यांचा जन्म १९५६ सालातील. अलकाताईंनी एम.एस्सी. (संख्याशास्त्र) केले. १९७६ च्या आंध्रवादळाच्या मदतकार्यात अलकाताईंचा सक्रिय सहभाग होता.

**अरुणाचल प्रदेशात... :** सामाजिक काम करण्याची अनेक वर्षांची इच्छा पूर्ण करण्यासाठी अशोकराव वर्णेकर यांनी १९८० मध्ये त्यांचा मुलगा अवघा दीड वर्षाचा असताना मुंबई सोडून अरुणाचलमध्ये पत्नीसह जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यावेळेस ते मुंबईत अगदी स्थिरस्थावर होण्याच्या मार्गावर होते. आरंभी अरुणाचल प्रदेशातील सेजोसा येथील विवेकानंद केंद्र विद्यालयात (व्हीकेव्ही) दोघांनी दोन वर्षे अध्यापक म्हणून ठरवून काम केले. स्थानिक समाजात अधिकाधिक मिसळण्याची संधी मिळावी म्हणून पुढील दोन वर्षे वर्णेकर यांनी डोनी पोलो विद्याभवनमध्ये प्राचार्य म्हणून काम केले. १९८४ मध्ये वर्णेकर यांनी डोनी पोलो मिशन स्कूलमधील नोकरी थांबवून नहारलगून येथे विद्यार्थी प्रावीण्य वर्ग 'अरुणाचल युथ सेंटर' या नावाने चालू केला.

**आसाममधील कामास सुरुवात :** १९८८ मध्ये मुंबईची सदनिका विकून त्यांनी लखीमपूर जिल्ह्यातील पार्वतीपूर (हारमती) येथे सुमारे एक एकर जागा विकत घेतली. तेथे लगेचच चाय बागान आदिवासी जनजाती समाजातील मुला-मुलींसाठी भास्कर संस्कार केंद्र सुरू केले. १९८८ ते एप्रिल २००० पर्यंतचा १२ वर्षांचा पार्वतीपूर येथील कामाचा त्यांचा पहिला टप्पा. नंतर २००८ पर्यंत त्यांना आई-वडिलांच्या आजारपणामुळे महाराष्ट्रात घरी थांबावे लागले होते. याच दरम्यान ते कौटुंबिक जबाबदाऱ्यांतून मुक्त झाले आणि पार्वतीपूरला परतले.

आसाम राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या २० टक्के हा चाय बागान आदिवासी जनजाती समाज आहे. या समाजाला विशिष्ट नावच नाही. खरे तर या समाजाला ओळखच नाहीये! जवळपास दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी विविध राज्यांतून फसवून/पळवून चहाच्या मळ्यात आणलेले मजूर/गुलाम लोक हीच यांची खरी ओळख. तेलंगणा, विदर्भ, मध्यप्रदेश, झारखंड, ओडिशा, बिहार व बंगाल या राज्यांमधून फसवून, धाक अथवा प्रलोभने देऊन मोठ्या संख्येत आणला गेलेला हा मागास जातीतील मजूरवर्ग आहे आणि तो आसाममधील दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख समाज आहे.

**भास्कर संस्कार केंद्राची सुरुवात :** १९८८ मध्ये भास्कर संस्कार केंद्राची सुरुवात झाली. या समाजातील मुलांना शाळेची गोडी लावणे गरजेचे असले तरी जिकिरीचे होते. सध्या ७० मुले संस्कार केंद्रात निवासी असतात. चौथी ते महाविद्यालयीन शिक्षण घेणारी ही मुले आहेत. शरीर, मन व बुद्धी सतेज बनविण्यावर संस्कार केंद्रात भर असतो.

**प्राथमिक शाळेची सुरुवात :** १९९१ मध्ये लहान मुलांची शाळा चालू झाली. सुरुवातीला शाळेच्या चार झोपड्या बनल्या. संस्कार केंद्रात येणाऱ्या मुलांना त्यांच्या लहान भाऊ-बहिणींना पाठवण्यास सांगितल्यावर लहान मुलांचे येणे सुरू झाले. १९९९च्या सुमारास वनवासी कल्याण आश्रमाच्या सहकार्याने अनौपचारिक पद्धतीने चालणारी शाळा औपचारिक पद्धतीने नियमित भरायला लागली. आता तेथे बालगट ते ५ वी पर्यंत आसामी भाषेतील विद्याभारतीच्या अभ्यासक्रमावर आधारित प्राथमिक शाळा नित्य भरत असते. यात १८० अनिवासी विद्यार्थी येतात.

२०१० पर्यंत इथे बांबूच्या इमारती होत्या. टप्प्याटप्प्याने सिमेंटच्या पक्क्या इमारती बांधणे सुरू आहे. या इमारतींसाठी देणग्या उभारण्यात व शाळा चालविण्यात नागपूरच्या उत्थान न्यासाचे मोठे योगदान आहे. नागपुरातील बजाजनगर प्रभात संघशाखेचीही मोलाची साथ आहे. लवकरच स्थानिक न्यासाची निर्मिती करून त्याकडे शाळा व्यवस्थापन व जागा हस्तांतरणासाठी पाठपुरावा चालू आहे.

ख्रिश्चन धर्मांतराचा मोठा धोका या समाजाला आहे. शासनाने पुढाकार घेऊन सदानी लोकांसाठी गेल्या दोन वर्षांमध्ये दोन टप्प्यात १८० शाळा उघडल्या आहेत. सध्या त्या ८ वी पर्यंत असून लवकरच १० वी पर्यंत होतील अशी अपेक्षा आहे. ही आशादायक घडामोड असली तरी शैक्षणिक गुणवत्ता हे मोठे आव्हान आहे. राष्ट्रवादी विचारधारेशी जवळीक सांगणाऱ्या संस्थांनी या समाजासाठी चालू करणे गरजेचे आहे. त्यातून सदानी समाजातील नव्या पिढीमध्ये आत्मसन्मान जागविण्याचे काम करता येईल. ■

९४२२२३१९६७

---

## वेध

**नीलेश जोशी**

# पायी चालण्यावर जागोजागी 'अतिक्रमण'

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्देशांमुळे देशातील शहरे, नगरपरिषदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसमोर एक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. या निर्णयात न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जिथे रस्ता आहे तिथे पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त जागा असलीच पाहिजे. यासाठी मोठ्या निधीची किंवा नवीन प्रकल्पांची वाट न पाहता आवश्यक असल्यास दोरी लावूनही पदपथ अर्थात फूटपाथ वेगळा करा, पण पादचाऱ्यांना सुरक्षित पायी चालण्याच्या हक्कावर अतिक्रमण होऊ देऊ नका.

भारतातील बहुतांश शहरांमध्ये रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि वाहनांसाठी अधिक जागा निर्माण झाल्या आहेत. मात्र ही सुविधा उभारताना शहरातील अंतर्गत मार्गांवर पायी चालणारा नागरिक कायमच दुय्यम ठरला आहे. अनेक शहरांत पदपथच नाहीत. जिथे आहेत तिथे दुकाने, फेरीवाले, पार्किंग किंवा बांधकाम साहित्याने ते व्यापलेले असतात. परिणामी नागरिकांना जीव धोक्यात घालून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. रस्ते अपघातांच्या आकडेवारीतही ही वस्तुस्थिती दिसून येते. शासनाच्या रस्ते अपघात अहवालानुसार २०२४ साली रस्ते अपघातात १ लाख ७७ हजार १७५ लोकांचा मृत्यू झाला. यात ३६ हजार ५२६ मृत्यू पायी चालणाऱ्या व्यक्तींचे होते. ही संख्या टक्केवारीनुसार २०.०६ इतकी आहे. २०२३ साली देखील ३६ हजार २०३ पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. म्हणजेच रस्त्यांवरील सर्वांत असुरक्षित घटक हा पायी चालणारा नागरिक आहे. वाहनांसाठी नियम, लेन, सिग्नल आणि सुरक्षा उपाय आहेत, पण पादचाऱ्यांसाठी सुरक्षित जागाच नसणे हे दुर्दैव नव्हे का? सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही पायी चालणे हा मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र यावेळी न्यायालयाने प्रत्यक्ष अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. दोन आठवड्यांत संबंधित यंत्रणांनी कृती आराखडा सादर करावा, असे आदेश देत न्यायालयाने प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

महाराष्ट्रातील अनेक शहरांत प्रमुख रस्त्यांवर पदपथ अस्तित्वातच नाहीत. जिथे आहेत, तिथे अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग किंवा विविध व्यावसायिक वापरामुळे ते पादचाऱ्यांसाठी उपयोगी ठरत नाहीत. अशा ठिकाणी वृद्ध, महिला, दिव्यांग, विद्यार्थी आणि लहान मुलांना दररोज जीव मुठीत धरून चालावे लागते. मुख्यतः जिथे पादचारी मार्ग आहे तिथे झालेले अतिक्रमण हा त्या-त्या शहराचा कळीचा मुद्दा आहे.

यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नियोजित फेरीवाला क्षेत्रे, पर्यायी जागा आणि प्रभावी वाहतूक नियोजन यांचा समतोल साधला पाहिजे. मात्र कोणत्याही परिस्थितीत पदपथावर कायमस्वरूपी अतिक्रमण हे मूलभूत व्यवस्था कोलमडणारे ठरत असल्याने याबाबत कठोर निर्णय घ्यावेच लागतील.

यासंदर्भात नागरिकांची देखील जबाबदारी आहेच. अनेकदा वाहनचालक स्वतःच पदपथावर वाहने उभी करतात. दुकानदार त्यांच्या दुकानातील वस्तू पदपथावर ठेवतात. काही ठिकाणी तर नागरिक पदपथाऐवजी रस्त्यावरून चालणे पसंत करतात. त्यामुळे प्रशासनाच्या उपाययोजना सोबतच नागरिकांनी देखील जबाबदारीचे भान ठेवणे तितकेच आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कासाठी दिलेल्या निर्देशांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र या संदर्भात अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे होते, हे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा न्यायालयीन आदेश काही दिवस चर्चेत राहतात आणि नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. या वेळी तसे होऊ नये. प्रत्येक शहराने पदपथांचे सर्वेक्षण करून अतिक्रमणमुक्ती, देखभाल आणि नवीन पदपथ उभारणीसाठी प्रामाणिकपणे पुढाकार घ्यावा. खरं म्हणजे पदपथ हा पादचाऱ्यांचा मूलभूत नागरी हक्क आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारा सर्वांत दुर्लक्षित, उपेक्षित घटक असणाऱ्या पादचाऱ्यांकरिता सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले. याच्या अंमलबजावणीची जबाबदारी आता प्रशासनाची आहे. पण प्रशासन करेल या अपेक्षेत न राहता नागरिक आणि लोकप्रतिनिधींना देखील या निर्देशांबाबत आग्रही व्हावे लागेल. तरच पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटवून 'रस्त्यांवर पहिला अधिकार माणसांचा आहे, वाहनांचा नाही' आणि 'पायी चालणे हा मूलभूत अधिकार आहे' हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला संदेश उपयोगी ठरेल. ■

९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# विधानसभा पोटनिवडणूक निकालाचा अन्वयार्थ

बिहार, गुजरात आणि मध्यप्रदेशातील विधानसभेच्या तीन जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीच्या निकालाची सध्या चर्चा आहे. बिहारमधील बांकीपूर येथे भाजपाचा पराभव झाला. मध्यप्रदेशातील दतिया येथे काँग्रेस जिंकली तर गुजरातमध्ये भाजपाने विजय मिळविला. तीन मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपाला दोन जागा गमवाव्या लागल्या, फक्त एक जागा जिंकता आली. क्रिकेटच्या भाषेत सांगायचे तर दोन एकने भाजपाने ही मालिका गमावली. दोन राज्यातील भाजपाच्या पराभवाचा त्या राज्यातील भाजपाला धक्का बसला असला, तरी त्याचा त्या राज्यातील भाजपा सरकारच्या स्थैर्यावर मात्र कोणताही परिणाम होणार नाही, तरीही या निवडणुकीतील विशेषतः बांकीपूर मतदारसंघातील भाजपाच्या पराभवाची चर्चा होणार आहे.

गुजरातमधील मंजालपूरची जागा भाजपाची होती; ती भाजपाने कायम राखली. मध्यप्रदेशातील दतियाची जागा काँग्रेसची होती; ती काँग्रेसने पुन्हा जिंकली. फक्त बिहारच्या बांकीपूरची जागा भाजपाला गमवावी लागली. सामान्यपणे कोणत्याही राज्यात होणाऱ्या पोटनिवडणुकीत सत्ताधारी पक्ष जिंकत असतो. बिहार आणि मध्यप्रदेशात भाजपाची सत्ता आहे, त्यामुळे या राज्यातील दोन्ही पोटनिवडणुका भाजपाने जिंकणे अपेक्षित होते. मात्र, या दोन्ही ठिकाणी भाजपाचा पराभव झाला. त्यामुळे भाजपाला या दोन्ही पराभवाचे चिंतन आणि मंथन करावे लागणार आहे. बिहारमध्ये आतापर्यंत भाजपा सत्तेत असला, तरी मुख्यमंत्रिपद जदयुकडे म्हणजे नितीशकुमार यांच्याकडे होते. यावेळी प्रथमच मुख्यमंत्रिपद भाजपाला मिळाले आणि सम्राट चौधरी मुख्यमंत्री झाले.

भाजपा कोणतीही निवडणूक पूर्ण गांभीर्याने आणि तयारीने लढवत असतो. मात्र बाकीपूरची पोटनिवडणूक लढवताना कोणत्या तरी टप्प्यावर भाजपाकडून गफलत झाली, असे निवडणूक निकालावरून म्हणावेसे वाटते. राष्ट्रीय अध्यक्षाचा हा मतदारसंघ असल्यामुळे या मतदारसंघात भाजपाकडून अधिक खबरदारी घेणे अपेक्षित होते. याठिकाणी एकतर भाजपाला अतिआत्मविश्वास नडला वा भाजपाने ही निवडणूक पूर्ण गांभीर्याने लढली नाही, असे म्हणायला जागा आहे. बिहारच्या बांकीपूरचा भाजपाचा पराभव हा अनपेक्षित आणि धक्कादायक म्हणावा लागेल. भाजपाचा बालेकिल्ला म्हणून हा मतदारसंघ ओळखला जात होता. नितीन नवीन यांचे वडील नवीन किशोर सिन्हा या मतदारसंघातून सलग चार वेळा जिंकले, तर नितीन नवीन पाच वेळा या मतदारसंघातून विजयी झाले आहे. १९९५ पासून हा मतदारसंघ भाजपाकडे होता. यावरून या मतदारसंघातील भाजपाच्या पराभवाचे गांभीर्य लक्षात येईल. मंजालपूरमध्ये भाजपाचे विद्यमान आमदार योगेश पटेल यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाल्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. या मतदारसंघात भाजपाचे सतीशभाई पटेल विजयी झाले. २०१२ पासून हा मतदारसंघ भाजपाकडे होता. पोटनिवडणुकीत भाजपाने तो आपल्याकडे कायम राखला.

मध्यप्रदेशातील दतियाची पोटनिवडणूक काँग्रेस आमदार राजेंद्र भारती यांना अपात्र ठरवल्यामुळे घ्यावी लागली. काँग्रेसने दतिया राजघराण्यातील कुंवर घनश्यामसिंह यांना उमेदवारी दिली तर भाजपाने आशुतोष तिवारी यांना, या मतदारसंघातील निवडणूक भाजपाच्या उमेदवारीमुळे गाजली होती. माजी गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांचा हा मतदारसंघ.

मागील निवडणुकीत मिश्रा यांचा पराभव झाला, यावेळी उमेदवारीसाठी नरोत्तम मिश्रा इच्छुक होते, पण भाजपाने त्यांना उमेदवारी न देता आशुतोष तिवारी यांना उमेदवारी दिली. त्यामुळे मिश्रा यांचे समर्थक संतापले आणि त्यांनी आक्रमक पद्धतीने आपला निषेध व्यक्त केला. या मतदारसंघातील पोटनिवडणूक चर्चेत आली आणि भाजपासाठी प्रतिष्ठेची झाली होती, पण या ठिकाणी भाजपाचा पराभव झाला.

याचाच अर्थ भाजपाच्या प्रदेश नेतृत्वाने आशुतोष तिवारी यांची या मतदारसंघावर थोपलेली उमेदवारी भाजपा कार्यकर्त्यांना मान्य नव्हती, या पराभवाचे खापर मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यावर फुटू शकते तसेच त्यांच्या नेतृत्वक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकते. कोणत्याही निवडणुकीत वा पोटनिवडणुकीत पक्षाचा उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते. या जबाबदारीत बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव कमी पडले, हे निश्चित.

दतियापेक्षाही बांकीपूर विधानसभा मतदारसंघातील पराभव भाजपासाठी धक्कादायक म्हणावा लागेल. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा विधानसभा मतदारसंघ भाजपाला कायम राखता आला नाही, असा याचा अर्थ निघतो.

बांकीपूरमध्ये जनसुराज्य पक्षाचे प्रशांत किशोर विजयी झाले. निवडणूक व्यवस्थापन तज्ज्ञ अशी प्रशांत किशोर यांची ओळख आहे. आतापर्यंत राजकीय पक्षाच्या नेत्यांना आणि त्यांच्या पक्षाला निवडणूक जिंकून देण्याचा ठेका घेणाऱ्या म्हणजे किंगमेकर असणाऱ्या प्रशांत किशोर यांना किंग होण्याची स्वप्न पडू लागली आणि त्यांनी जनसुराज्य पक्षाची स्थापना केली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनसुराज्य पक्षाचा धुव्वा उडाला. एकही जागा त्याला जिंकता आली नाही. एवढेच काय, त्यांच्या जवळपास सर्व उमेदवारांची जमानत जप्त झाली. त्यावेळी विधानसभा निवडणूक न लढवणाऱ्या प्रशांत किशोर यांना नितीन नवीन यांच्या राजीनाम्यामुळे झालेल्या पोटनिवडणुकीतून आपले राजकीय नेतृत्व प्रस्थापित करण्याची चांगली संधी मिळाली, असे म्हणावे लागते.

प्रशांत किशोर यांच्या विजयाचा भाजपाला बसलेला फटका हा तात्कालिक स्वरूपाचा म्हणावा लागेल. पण बिहारच्या राजकारणात प्रशांत किशोर यांच्या झालेल्या उदयाचा खरा फटका राष्ट्रीय जनता दलाला दीर्घ काळासाठी बसणार आहे. बिहारच्या राजकारणातील त्या पक्षाचा प्रभाव कमी होणार आहे. बांकीपूर पोटनिवडणुकीत राजदच्या रेखा गुप्ता तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या. बांकीपूरमध्ये आपला पराभव होणार, याची कल्पना राजदचे तेजस्वी यादव यांना आधीच आली असावी, त्यामुळे निवडणूक प्रचारारादरम्यान पक्षाला वाऱ्यावर सोडत तेजस्वी यादव परदेशात निघून गेले.

बिहारच्या राजकारणात प्रशांत किशोर यांच्या पक्षाचा प्रभाव जेवढा वाढेल, तेवढा राजदचा प्रभाव कमी होणार आहे. बांकीपूरमध्ये राजद उमेदवार जसा तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला, तसाच राज्याच्या राजकारणात राजद तिसऱ्या वा चौथ्या स्थानावर फेकला गेला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यामुळे भाजपाच्या पराभवामुळे राजदने जास्त उड्या मारण्याची गरज नाही तसेच भाजपाने हताश होण्याचेही कारण नाही. राजदने स्वतःच्या पराभवाचे आत्मचिंतन केले पाहिजे. ■

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्रे

### हिरोशिमाचा इशारा आणि युद्धाच्या उंबरठ्यावरचे जग

६ ऑगस्ट हा दिवस जगाच्या इतिहासातील सर्वांत वेदनादायी दिवस म्हणून स्मरणात आहे. १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकण्यात आला. एका क्षणात शहर भस्मसात झाले. हजारो लोक मृत्युमुखी पडले आणि पुढील अनेक पिढ्यांपर्यंत किरणोत्सर्गाचे दुष्परिणाम भोगावे लागले. तीन दिवसांनी नागासाकीवर दुसरा अणुबॉम्ब टाकण्यात आला. विज्ञानाची सर्वोच्च उपलब्धी मानवतेच्या विनाशासाठी वापरली गेली, ही शोकांतिका आजही जगाला अस्वस्थ करते.

हिरोशिमा दिवस केवळ भूतकाळातील दुःखद घटना आठवण्यासाठी नाही, तर युद्धाचे भयावह परिणाम विसरू नयेत यासाठी दिवस स्मरणाचा केला जातो. परंतु प्रश्न असा आहे की, जगाने खरंच या घटनेतून काही शिकले आहे का? आज जग पुन्हा अस्थिरतेच्या टप्प्यावर उभे आहे. युक्रेन-रशिया युद्ध, मध्यपूर्वेतील संघर्ष, चीन-तैवान तणाव आणि महासत्तांमधील वाढती स्पर्धा यामुळे जागतिक शांतता धोक्यात आली आहे. मध्यपूर्वेतील संघर्षाचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. पर्शियन आखातातून जगभर जाणाऱ्या कच्च्या तेलाचा आणि द्रवीकृत नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा या अरुंद समुद्री मार्गातून वाहतूक केला जातो. त्यामुळे इराण-इस्त्रायल संघर्ष तीव्र झाल्यास किंवा होर्मुझची सामुद्रधुनी बंद होण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. परिणामी कच्च्या तेलाच्या किमती वाढणे, महागाई वाढणे आणि भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर दबाव येणे, अशा परिणामांची भीती व्यक्त केली जाते.

डोनाल्ड ट्रम्प यांचे 'अमेरिका प्रथम' धोरण अमेरिकेच्या आर्थिक हितांना प्राधान्य देते. त्यामुळे आयात शुल्क वाढवणे, व्यापार करारांचा फेरविचार करणे आणि इतर देशांवर आर्थिक दबाव टाकणे या गोष्टींना चालना मिळाली आहे. २०२६ मध्ये भारतावरील काही अमेरिकी शुल्कांबाबत चर्चा आणि बदल झाले असून भारतीय निर्यातदारांना त्याचा परिणाम जाणवत आहे. विशेषतः वस्त्रोद्योग, रसायने, अभियांत्रिकी उत्पादने आणि इतर निर्यात क्षेत्रांसमोर अनिश्चितता निर्माण झाली आहे. आजच्या काळात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. आर्थिक निर्बंध, सायबर हल्ले, ड्रोन, क्षेपणास्त्रे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शस्त्रे, माहितीचे युद्ध आणि अण्वस्त्रांच्या धमक्या हे संघर्षाचे नवे आयाम बनले आहेत. त्यामुळे हिरोशिमाची आठवण अधिकच महत्त्वाची ठरते. हिरोशिमा आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारते की मानवजातीची खरी ताकद विनाशात आहे की संवादात? युद्ध सुरू करणे सोपे असते, पण शांतता प्रस्थापित करणे अत्यंत कठीण असते. म्हणूनच जगातील सर्व महासत्तांनी सामर्थ्याचे प्रदर्शन करण्याऐवजी परस्पर संवाद, मुत्सद्देगिरी आणि सहकार्य यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

हिरोशिमा दिवसाचे स्मरण करताना आपण फक्त इतिहासाचे स्मरण करू नये , तर वर्तमानालाही प्रश्न विचारला पाहिजे. हिरोशिमा हा केवळ इतिहासातील एक दिवस नाही, तो मानवजातीसाठी कायमचा इशारा आहे. युद्धाची आग पेटवणे एका क्षणाचे काम असते, पण तिच्या राखेतून उभे राहण्यासाठी अनेक पिढ्या खर्ची पडतात. त्यामुळे शक्तीपेक्षा शहाणपण, संघर्षापेक्षा संवाद आणि युद्धापेक्षा शांतता हा मार्ग स्वीकारणे, हीच हिरोशिमा दिनानिमित्त मानवजातीला खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. सुरुची डबीर**/९३७०६९६११७

■■■

### अभिमान कृषी व्यवसायाचा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु इतर व्यावसायिकांना ते करीत असलेल्या व्यवसायाचा ज्याप्रमाणे अभिमान असतो, त्याप्रमाणे भारतीय कृषक करीत असलेल्या कृषी व्यवसायाचा कृषकवर्गाला अभिमान असतो का, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बरेच लोक असे असतात की त्यांना ते करीत असलेल्या व्यवसायाचा अभिमान असतो. त्यांना विचारले की ते लगेच आपला व्यवसाय अभिमानाने सांगतात. 'माझे किराणा दुकान आहे, ज्वेलरी शॉप आहे' जे अल्प भूधारक असतात ते खाली मान घालून सांगतात की, 'आम्ही गरीब शेतकरी आहोत.' जे शेतकरी अल्प भूधारक नसतात, बरेच एकर जमीन त्याच्याकडे असते परंतु ते शेतीबरोबर इतर जोडव्यवसाय देखील करतात, त्यांना शेतीचा नव्हे तर त्यांच्या जोड व्यवसायाचा अभिमान असतो. भारत कृषी प्रधान देश आहे, परंतु कृषक वर्गाला आपण बरेच वर्षांपासून करीत असलेल्या शेती व्यवसायाचा अभिमान नाही, हा एकप्रकारे विरोधाभास ठरतो. मोठा उद्योग करणाऱ्या लोकांना उद्योगपती म्हणतात परंतु मोठ्या शेतकऱ्याला कोणी 'कृषी पती' म्हणत नाही. ही खरी कृषी प्रधान देशातील कृषक वर्गाची शोकांतिका आहे. ही शोकांतिका जर दूर होऊ शकली तर आपल्या कृषी प्रधान देशाची प्रतिष्ठा अधिक वाढेल. ■

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# निलकंठ को-ऑप.बँक लि. सोलापूर

प्रधान कार्यालय : ४२/ब/३, बुधवार पेठ,
सम्राट चौक, सोलापूर-४१३ ००२.

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल

### सन २०२५-२०२६ या वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षक अहवाल

(STTUTORY UDITORS REPORT)

स्वतंत्र लेखापरिक्षकाचा अहवाल (INDEPENDENT UDITOR'S REPORT)

**प्रति,**
**मा. सभासद,**
**नीलकंठ को-ऑप. बँक मर्यादित, सोलापूर.**

**वित्तीय तक्त्यांच्या (Financial Statements) लेखापरीक्षणाबाबतचा अहवाल**

**अभिप्राय (Opinion)**

१. आम्ही 'नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सोलापूर' ('बँक') च्या सोबत जोडलेल्या वित्तीय तक्त्यांचे लेखापरीक्षण केले आहे. यामध्ये ३१ मार्च २०२६ रोजीचा ताळेबंद (Balance Sheet), त्या दिवशी संपलेल्या वर्षाचा नफा-तोटा पत्रक (Profit and Loss ccount) आणि महत्त्वपूर्ण लेखांकन धोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीसह वित्तीय तक्त्यांवरील टिपा (Notes) यांचा समावेश आहे. यामध्ये आमच्याद्वारे लेखापरीक्षण केलेल्या प्रधान कार्यालय (Head Office) आणि ३ शाखांच्या वित्तीय विवरणांचा समावेश आहे.

२. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या सर्वोत्तम माहितीनुसार तसेच दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, वित्तीय तक्त्यांसोबतच्या टिपा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ (सहकारी संस्थांना लागू असल्यानुसार) आणि बँकिंग रेग्युलेशन (अमार्टमेंट) ॲक्ट, २०२० द्वारे सुधारित, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० ('अधिनियम') आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियन, १९६१ ('नियम') तसेच भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक असलेली माहिती योग्य प्रकारे दर्शवितात. तसेच भारतातील सर्वमान्य लेखांकन तत्त्वांचे (Accounting Principles) पालन करून बँकेच्या आर्थिक स्थितीचे खरे आणि रास्त चित्र (True and Fair View) मांडतात.

अ. ताळेबंदाच्या (Balance Sheet) बाबतीत, ३१ मार्च २०२६ रोजीची बँकेची आर्थिक स्थिती.

ब. नफा-तोटा पत्रकाच्या (Profit and Loss ccount) बाबतीत, त्या दिवशी संपलेल्या आर्थिक वर्षातील बँकेचा नफा.

**अभिप्रायासाठी आधार (Basis for Opinion)**

३. आम्ही आमचे लेखापरीक्षण इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) ने जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार (Standards on uditing - SAs) केले आहे. या मानका Sub अंतर्गत आमच्या जबाबदाऱ्यांचा सविस्तर उल्लेख वा अहवालातील 'वित्तीय तक्त्यांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची जबाबदारी' या भागात केला आहे. आम्ही वित्तीय तक्त्यांच्या लेखापरीक्षणाशी संबंधित नैतिक आवश्यकता आणि ICAI ने जारी केलेल्या आचारसंहितेनुसार (Code of Ethics) बँकेपासून स्वतंत्र आहोत. आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्यांचे देखील पालन केले आहे. आमचा असा विश्वास आहे की, आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे (Audit Evidence) आमचा अभिप्राय मांडण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत. (१, २)

**वित्तीय तक्ते आणि त्यावर दिलेल्या लेखापरीक्षकाच्या (uditor) अहवालाव्यतिरिक्त इतर माहिती**

१. बँकेचे संचालक मंडळ (Board of Directors) इतर माहितीसाठी जबाबदार आहे. या इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट असलेल्या माहितीचा आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश होतो; परंतु यामध्ये वित्तीय तक्ते आणि त्यावरील आमच्या लेखापरीक्षण अहवालाचा समावेश होत नाही. वित्तीय तल्त्यांवरील आमचा अभिप्राय या इतर माहितीचा समावेश करत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचा खात्रीशीर निष्कर्ष (Assurance Conclusion) व्यक्त करत नाही व करणार नाही. वित्तीय तक्त्यांच्या आमच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात, वर नमूद केलेली इतर माहिती उपलब्ध झाल्यावर ती वाचणे आणि असे करताना ती इतर माहिती वित्तीय तक्त्यांशी किंवा लेखापरीक्षणादरम्यान आम्हाला मिळालेल्या ज्ञानाशी मोठ्या प्रमाणावर विसंगत (Materially Inconsistent) आहे का, किंवा ती चुकीच्या पद्धतीने गांडली गेली आहे का, याचा विचार करणे ही आमची जबाबदारी आहे. जेव्हा आम्ही जोडपत्रांलह (Annexures) संचालक मंडळाचा अहवाल आणि व्यवस्थापकीय चर्चा व बिश्लेषण (Management Discussion and Analysis) वाचतो, आणि त्यामध्ये मोठी चूक किंवा चुकीचे विधान (Materia) Misstatement) असल्याचे आमच्या निदर्शनास आले, तर ती बाब आम्ही प्रशासनाची जबाबदारी असलेल्या व्यक्तींना आणि वार्षिक सर्वसाधारण सभेतील (AGM) सभासदांना कळवणे आवश्यक आहे. या संदर्भात आमच्याकडे नोंदवण्यासारखे काहीही नाही.

**वित्तीय तक्त्यांसाठी व्यवस्थापन आणि प्रशासकीय जबाबदारी असलेल्या व्यक्तीची जबाबदारी**

२. बँकेचे संचालक मंडळ हे वित्तीय तक्ते तयार करण्यासाठी जबाबदार आहे, जे भारतातील सर्वमान्य लेखांकन तत्त्वे (ICAI ने जारी केलेल्या लेखांकन मानकांसह Accounting Standards), बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ आणि त्याअंतर्गत केलेले नियम, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ (लागू असल्यानुसार) आगि रिझर्व्ह बँकेने (RBI) वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके व मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँकेची आर्थिक स्थिती आणि कामगिरीचे खरे आणि रास्त (True and Fair View) मांडतात. या जबाबदारीमध्ये बँकेच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी आणि फसवणूक व इतर अनियमितेचा शोध घेण्यासाठी व त्यांना रोखण्यासाठी कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेसे लेखांकन रेकॉर्ड (Accounting Records) ठेवणे; योग्य लेखांकन धोरणांची निवड व अंमलबजावणी करणे; वाजवी आणि शहाणपणाचे निर्णय व अंदाज वर्तवणे; आणि पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची (Intemal Financial Controls) रचना, अंमलबजावणी व देखभाल करणे समाविष्ट आहे. ही नियंत्रणे वित्तीय तक्त्यांची अचूकता आणि पूर्णता सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत असणे आवश्यक आहे, जेणेकरून वित्तीय तक्ते सत्य व न्याय्य चित्र दर्शवतील आणि फसवणूक किंवा त्रुटींमुळे होणाऱ्या मोठ्या चुकांपासून मुक्त असतील.

वित्तीय तक्ते तयार करताना, बँकेची 'सुरू राहण्याची क्षमता' (Ability to Acontinue as a going concern) तपासणे, लागू असल्यानुसार चालू चिंतेशी (Going Concern) संबंधित बाबी उघड करणे आणि जोपर्यंत व्यवस्थापनाचा बैंक बंद करण्याचा किंवा कामकाज थांबवण्याचा उद्देश नसेल, अथवा तसे करण्याशिवाय दुसरा कोणताही वास्तववादी पर्याय नसेल, तोपर्यंत लेखांकनाचा 'गोइंग कन्सर्न' (Going Concem Basis) आधार वापरणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. संचालक मंडळ बँकेच्या बित्तीय अहवाल प्रक्रियेच्या (Financial Reporting Process) देखरेखीसाठी देखील जबाबदार आहे.

**वित्तीय तक्त्यांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची जबाबदारी**

१. आमचे उद्दिष्ट वित्तीय तक्ते एकूणच मोठ्या चुकांपासून (फसवणूक किंवा त्रुटींमुळे होणाऱ्या) मुक्त आहेत का, याबाबत वाजवी खात्री (Reasonable Assurance) मिळवणे आणि आमचा अभिप्राय असलेल्या लेखापरीक्षक अहवालाचे सादरीकरण करणे हे आहे. बाजवी खात्री ही उच्च पातळीची खात्री असते, परंतु ती अशी हमी देत नाही की, लेखापरीक्षण मानकांनुसार (SAS) केलेले लेखापरीक्षण नेहमीच विद्यमान असलेल्या मोठ्या चुका शोधून काढेल. चुका फसवणूक किंवा त्रुटींमुळे उद्भवू शकतात. जर वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे या चुकांमुळे वित्तीय तक्त्यांच्या आधारे युजर्सनी घेतलेल्या आर्थिक निर्णयांवर परिणाम होण्याची शक्यता असेल, तर त्या चुका मोठ्या व महत्त्वपूर्ण (Material) मानल्या जातात. लेखापरीक्षण मानकांनुसार (SAS) लेखापरीक्षणाचा एक भाग म्हणून, आम्ही संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेदरम्यान व्यावसायिक निर्णयक्षमता आणि व्यावसायिक संशयवृत्ती (Professional Skepticism) बाळगतो. तसेच आम्ही:

वित्तीय तक्त्यांमध्ये फसवणूक किंवा त्रुटींमुळे होणाऱ्या मोठ्या चुकांच्या जोखमीची ओळख व मूल्यमापन करतो. या जोखमींना अनुसरून लेखापरीक्षण प्रक्रिया तयार करतो आणि पार पाडतो. आमचा अभिप्राय देण्यासाठी पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षण पुरावे मिळवतो. त्रुटींपेक्षा फसवणुकीमुळे झालेली मोठी चूक न सापडण्याची जोखीम जास्त असते, कारण फसवणुकीमध्ये गुप्त संगनमत, बनावट दस्तऐवज, जाणूनबुजून केलेली चूक, चुकीचे सादरीकरण किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन समाविष्ट असू शकते.

परिस्थितीनुसार योग्य लेखापरीक्षण प्रक्रिया तयार करण्यासाठी अंतर्गत नियंत्रणांची समज मिळवतो: परंतु बँकेच्या अंतर्गत नियंत्रणाच्या प्रभावीतेवर अभिप्राय व्यक्त करण्याच्या उद्देशाने असे करत नाही. वापरलेल्या लेखांकन धोरणांच्या योग्यतेचे आणि व्यवस्थापनाने केलेल्या लेखांकन अंदाजांचे व संबंधित खुलाशांच्या वाजवीपणाचे मूल्यमापन करतो. व्यवस्थापनाने वापरलेल्या लेखांकनाच्या 'गोइंग कन्सर्न' (Going Concern Basis) आधाराच्या योग्यतेबाबत आणि मिळालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांच्या आधारे बँकेच्या सुरू राहण्याच्या क्षमतेवर शंका निर्माण करणाऱ्या घटना किंवा परिस्थितीशी संबंधित मोठी अनिश्चितता अस्तित्वात आहे का, याबाबत निष्कर्ष काढतो. जर मोठी अनिश्चितता अस्तित्वात आहे असा निष्कर्ष निघाल्यास, आम्ही आमच्या लेखापरीक्षण अहवालात वित्तीय तक्त्यांमधील संबंधित खुलाशांकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे किंवा जर असे खुलासे अपुरे असतील तर आमचा अभिप्राय बदलणे आवश्यक आहे. आगचे निष्कर्ष हे लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत मिळालेल्या पुराव्यांबर आधारित असतात. तथापि, भविष्यातील घटना किंवा परिस्थितीमुळे बँक बंद पडू शकते.

खुलाशांसह वित्तीय तक्त्यांचे एकूण सादरीकरण, रचना आणि मजकूर याचे मूल्यमापन करतो आणि स्वतंत्र वित्तीय तक्ते संबंधित व्यवहार व घटनांचे योग्य प्रकारे सादरीकरण करतात की नाही हे तपासतो. 'मटेरियालिटी' (Materiality) हे वित्तीय तक्त्यांमधील चुकांचे ते प्रमाण आहे जे वैयक्तिक किंवा एकत्रितपणे, वित्तीय तत्त्यांचा वापर करणाऱ्या सुजाण व्यक्तीच्या आर्थिक निर्णयांवर प्रभाव टाकू शकते. आम्ही (१) आमच्या लेखापरीक्षणाच्या व्याप्तीचे नियोजन करताना आणि कामाच्या निकालाचे मूल्यमापन करताना; तसेच (ii) वित्तीय तक्त्यांमध्ये आढळलेल्या चुकांच्या प्रभावाचे मूल्यमापन करताना परिमाणात्मक महत्त्व (Quantitative Materiality) आणि गुणात्मक घटकांचा विचार करतो. आम्ही प्रशासनाची जबाबदारी असलेल्या व्यक्तींशी लेखापरीक्षणाची नियोजित व्याप्ती, वेळ आणि महत्त्वपूर्ण लेखापरीक्षण निष्कर्ष (ज्यामध्ये अंतर्गत नियंत्रणातील कोणत्याही त्रुटींचा समावेश आहे) या बाबींविषयी संवाद साधतो.

आम्ही प्रशासनाची जबाबदारी असलेल्या व्यक्तींना हे देखील लिखित स्वरूपात देतो की, आम्ही स्वातंत्र्याशी संबंधित नैतिक आवश्यकतांचे पालन केले आहे. तसेच आमच्या स्वातंत्र्यावर परिणाम करू शकतील अशा सर्व संबंधांविषयी आणि इतर बाबींविषयी व लागू असल्यास संबंधित सुरक्षा उपायांविषयी (Safeguards) त्यांच्याशी चर्चा करतो. प्रशासनाची जबाबदारी असलेल्या व्यक्तिंशी चर्चा केलेल्या बाबींमधून, आम्ही चालू कालावधीच्या वित्तीय तक्त्यांच्या लेखापरीक्षणातील सर्वात महत्त्वपूर्ण बाबी निश्चित करतो,

ज्यांना 'मुख्य लेखापरीक्षण बाबी' (Key Audit Matters) म्हटले जाते. आम्ही आमच्या अहवालात या बाबींचे वर्णन करतो; जोपर्यंत कायदा किंवा नियम या बाबी सार्वजनिकपणे उघड करण्यास मनाई करत नाहीत किंवा अत्यंत दुर्मिळ परिस्थितीत, जर या बाबी उघड केल्याने होणारे विपरीत परिणाम सार्वजनिक हितापेक्षा जास्त असतील, तर आम्ही त्या अहवालात समाविष्ट न करण्याचा निर्णय घेतो.

**इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल**

२. ताळेबंद (Balance Sheet) आणि नफा-तोटा पत्रक (Profit and Loss Account) हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ च्या तिसऱ्या अनुसूचीच्या अनुक्रमे नमुना 'अ' (Form 'A') आणि 'ब' (Form 'B') आणि त्यावरील नियमांनुसार तयार केले गेले आहेत.

३. वरील परिच्छेद ४ ते ६ मधील लेखापरीक्षणाच्या मर्यादांच्या अधीन राहून, बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ च्या कलम ३० (३) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ६९ (४) नुसार आम्ही अहवाल देतो की अ) आमच्या सर्वोत्तम माहिती आणि विश्वासाच्या आधारे, आम्हाला लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे मिळाली आहेत आणि ती समाधानकारक आढळली आहेत.

ब) आमच्या मते, बँकेने तपासलेल्या पुस्तकांवरून आणि बँकेच्या कार्यालयांकडून व शाखांकडून मिळालेल्या विवरणांवरून (Returns) असे दिसून येते की, कायदा, नियम आणि उपविधी (Bye-Laws) नुसार आवश्यक असलेली योग्य हिशेब पुस्तके बँकेने ठेवली आहेत आणि ती लेखापरीक्षणासाठी पुरेशी आहेत.

क) या अहवालाशी संबंधित ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक हे हिशेब पुस्तके आणि विवरणांशी जुळणारे आहेत.

ड) आमच्या निदर्शनास आलेले बँकेचे व्यबहार बँकेच्या अधिकार कक्षेत (Powers) होते.

इ) बँकेने स्वीकारलेली लेखांकन मानके (Accounting Standards) बँकांना लागू असलेल्या भारतातील सर्वमान्य लेखांकन तत्त्वांशी सुसंगत आहेत.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ६९ (६) नुसार, आम्ही बँकेला लागू असलेल्या मयदिपर्यंत सदर नियमाच्या उपकलम (१) ते (iv) मध्ये नमूद केलेल्या बाबींबर अहवाल देतो:

अ) आमच्या लेखापरीक्षणादरम्यान, सामान्यतः कायद्याच्या तरतुदी, नियम आणि बँकेच्या उपविधींच्या (Bye-Laws) विरोधाभासी असलेले कोणतेही व्यवहार आमच्या निदर्शनास आलेले नाहीत.

ब) आमच्या लेखापरीक्षणादरम्यान, सामान्यतः बँकेने हिशेबात समाविष्ट न केलेली कोणतीही रक्कम आमच्या निदर्शनास आलेली नाही.

क) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, बँकेच्या खर्चात किंवा बँकेला येणे असलेल्या रकमेमध्ये कोणतीही मोठी अयोग्यता किंवा अनियमितता आढळलेली नाही.

ड) ३१/०३/२०२६ रोजी रिझर्व्ह बँकेच्या (RBI) प्रूडेंशियल नियमांनुसार खालील रकमा सब-स्टैंडर्ड (Sub-standard), डौटफुल (Doubtful) किंवा लॉस असेट्स (Loss Assets) म्हणून वर्गीकृत केल्या आहेत आणि नियमांच्या नियम ६९ (६) च्या उपकलम (iv) नुसार अहवालबद्ध केल्या आहेत.

**(Rs. In Lakhs)**

| Particulars | No. of Account | Outstanding Balance |
|---|---|---|
| Sub-Standard | 03 | 115.77 |
| D 1 | 00 | - |
| D 2 | 00 | - |
| D 3 | 37 | 970.38 |
| **Total** | **40** | **1086.15** |

३१.०३.२०२६ रोजी बँकेकडे एकूण १०८६.१५ लाख रुपयांच्या ढोबळ थकीत कर्जाच्या (Gross NPA) तुलनेत १५४५.६१ लाख रुपयांची एकूण तरतूद (BDDR - बुडीत ब संशयास्पद कर्ज तरतूद) उपलब्ध आहे.

इ) आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार, सहकार निबंधक, महाराष्ट्र यांनी इतर कोणत्याही बाबी निर्दिष्ट केलेल्या नाहीत, ज्यांचा या नियमांतर्गत अहवाल देणे आवश्यक आहे. आम्ही पुढे असे प्रमाणित करतो की, लेखापरीक्षणांतर्गत असलेल्या सन २०२५-२६ या वर्षासाठी बँकेला 'अ' (A) वर्ग (Classification) बहाल करण्यात आला आहे.

**विजय पंचप्पा ॲण्ड कंपनी करीता**
**चार्टर्ड अकौंटंट**
**सही/-**
**सी.ए. नागेश द. महिंद्रकर**
**भागीदार**
UDIN-26147446NSGFQP4478

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०७/०५/२०२६**

# निलकंठ को-ऑप.बँक लि. सोलापूर

प्रधान कार्यालय : ४२/ब/३, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर-४१३ ००२. फोन : ०२१७-२७२५०११, २६२१४५५

## ताळेबंद पत्रक ३१/०३/२०२६ अखेर

| ३१/०३/२०२५ (रु.) | भागभांडवल व देणी | | ३१/०३/२०२६ (रु.) |
|---|---|---|---|
| १०,००,००,०००.०० | **भाग भांडवल** | | १०,००,००,०००.०० |
| | १) अधिकृत भाग भांडवल रु. २५/- प्रमाणे ४०,००,००० | | |
| ५,०२,०५,०००.०० | **ब) वसूल भाग भांडवल** | | ५,३६,७४,०००.०० |
| १४,८५,३९,१३७.०५ | **गंगाजळी व इतर निधी** | | १५,४९,१४,११५.०५ |
| ४,५४,१२,१६८.२८ | १) राखीव निधी | ४,७९,७४,४८८.२८ | |
| २,०१,७८,०२०.७७ | २) इमारत निधी | २,२१,७८,०२०.७७ | |
| ५०,६०,०००.०० | ३) स्टँडर्ड ॲसेटवरील तरतूद | ५३,६०,०००.०० | |
| २,७०,४००.०० | ४) सभासद कल्याण निधी | ४,६८,४००.०० | |
| ३,८८,८०,०००.०० | ५) पुनर्मुल्यांकन निधी | ४,०१,९४,६५८.०० | |
| ३,८७,३८,५४८.०० | ६) जनरल रिझर्व्ह (बीडीडीआर २०२४) | ३,८७,३८,५४८.०० | |
| १,९१,४७,७५,९४०.३१ | **ठेवी** | | २,११,५९,६२,२२१.६२ |
| ११,९३,२८,२४०.०४ | १) चालू ठेवी | १२,४१,६२,०८१.९१ | |
| १४,३७,५७,९५९.५४ | २) बचत ठेवी | १४,९१,७८,८९६.३० | |
| १,२३,२२,०००.०० | ३) शॉर्ट टर्म मुदत ठेव | ४,३६,०८,७१३.०० | |
| २,७७,३१,१८५.०० | ४) धनमान दुप्पट ठेव | २,८९,७७,८३२.०० | |
| १,३५,२४,६९,३६१.६९ | ५) वृध्दी ठेव | १,४४,७६,८०,७५९.९३ | |
| १३,२४,७४,३२४.०० | ६) धनराशी मासिक ठेव | १५,८२,३८,८९०.०० | |
| ६,३१,८१,३७९.०० | ७) तिमाही उत्पन्न ठेव | ८,७७,४०,२२२.०० | |
| ३,०५,११,६०५.०० | ८) अल्प बचत ठेव | ३,२६,१६,६१०.०० | |
| ४८,४५,७३१.०० | ९) गती ठेव | ५४,२३,६६०.०० | |
| १२,८२,०८८.०० | १०) आधार पेन्शन (मॅच्युअर्ड) | १२,८२,०८८.०० | |
| ८१,६३,८४२.०० | ११) लॉकर फिक्सड डिपॉझीट | ८८,६४,७०१.०० | |
| १८,३९,१२५.०० | १२) लक्षपुर्ती योजना - १ | ७,२९,९५०.०० | |
| ७,२०,७१३.०० | १३) लक्षपुर्ती योजना २, ३ | ४,७८,४७९.०० | |
| १,६१,४८,३८७.०४ | १४) कर्ज खात्याची जमा रक्कम | २,६९,७९,३३८.४८ | |
| ५८,३५,३१८.०० | **व्याज देणे (ठेवीवरील)** | | ४०,९८,७५१.०० |
| १४,२६,५१,४८१.९३ | **इतर देणी व तरतूदी** | | १६,३९,३४,०२०.७५ |
| १९,१०,१०३.०० | १) पे आर्डर देणे | २३,५६,०२१.०० | |
| २३,०५,२८३.४७ | २) टी.डी.एस. देणे | १७,२१,६४२.८७ | |
| १२,००,०००.०० | ३) ऑडीट फी पेयेबल | १०,००,०००.०० | |
| ७,७६,५००.०० | ४) डिव्हीडंड पेयेबल | १३,१८,६००.०० | |
| १३,००,०००.०० | ५) ग्रॅच्युइटी पेयेबल | ४,००,०००.०० | |
| ५९,९७८.०० | ६) टेलिफोन व लाईटबील पेयेबल | ४५,०००.०० | |
| १,३९,७५४.०० | ७) प्रॉव्हिडंड फंड पेयेबल | १,४१,३४८.०० | |
| ३,९०,२८८.१० | ८) आऊटपुट जीएसटी | २,७२,४०४.५२ | |
| ८,५२५.०० | ९) प्रोफेशनल टॅक्स पेयेबल | ७,८७५.०० | |
| १३,४५,६१,०५०.३६ | १०) प्रोव्हिजन फॉर एनपीए | १५,४५,६१,०५०.३६ | |
| ०.०० | ११) लिव्ह इनकॅशमेंट व क्लोजिंग | १६,६९,०७९.०० | |
| ०.०० | १२) ऑक्शन डिपॉझिट | ४,५०,०००.०० | |
| १७,७८,५४,१९४.१४ | **कर्जावरील येणे व्याज** | | १८,०१,२७,३३२.३९ |
| १,०७९.०८ | **ॲक्युमलेटेड नफा** | | ३,५२,१६७.३१ |
| १,००,५५,३८८.२३ | **चालू वर्षाचा नफा** | | १,८६,३७,२०७.६९ |
| २९,७७,७७८.४६ | **इतर देणी** | | ४८,३८,८०२.५० |
| ८,१८,९६३.४६ | **डिफ अकाऊंट** | १०,००,९१५.५० | |
| ४,००,०००.०० | **वसुलीत आलेली बिले** | ४,००,०००.०० | |
| १७,५८,८१५.०० | **बँक गॅरंटी** | ३४,३७,८८७.०० | |
| **२,४५,२८,९५,३१७.२०** | एकूण | | **२,६९,६५,३८,६१८.३१** |

| ३१/०३/२०२५ (रु.) | जिंदगी व येणी | | ३१/०३/२०२६ (रु.) |
|---|---|---|---|
| ३,१७,५९,३१९.०० | **रोख शिल्लक** | | ३,०९,१०,५५२.०० |
| १२,०७,२८,७७१.०४ | **बँकांतील शिल्लक** | | २३,४१,३६,११६.८१ |
| ५९,५४१.१९ | १) सो.जि.म. सह. बँक, मुख्य शाखा | ५९,४७०.३९ | |
| २,०६,८८,७९२.०१ | २) बँक ऑफ बडौदा | १,५३,८३,५५६.०१ | |
| १,०१,३७,२३१.८६ | ३) स्टेट बँक ऑफ इंडिया | ३,६६,६६,५११.८६ | |
| १,९६,०२,८३६.९५ | ४) एच.डी.एस.सी. बँक, पुणे | ६,१५,५०,६४६.४७ | |
| ५९,०७,४४८.०१ | ५) बँक ऑफ इंडिया | ४३,२२,५६५.०१ | |
| १,२६,११९.१७ | ६) ॲक्सिस बँक | १,२६,११९.१७ | |
| ६१,८७६.७४ | ७) आय.डी.बी.आय. बँक लि. | ६१,८७५.८७ | |
| २,२०,९९,५१५.४१ | ८) पंजाब नॅशनल बँक | २,९४,१८,११९.३५ | |
| १४,८७,४७९.४६ | ९) सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ५,१४,३६८.७४ | |
| २,७६,१५,५२५.७४ | १०) ॲक्सिस बँक सी.टी.एस. | १,८६,९१,६४७.५७ | |
| १,१२,०२,४४८.०० | ११) आय.सी.आय.सी.आय. बँक | ५,१४,७२,७७०.७० | |
| ७,१८,६९२.०० | १२) कॅनरा बँक | ५२,०९,३९८.०० | |
| १०,२१,२६४.५० | १३) एच.डी.एफ.सी. बँक सोलापूर | ४६,४९,५४९.५० | |
| | १४) कॉसमॉस बँक | ६०,०९,५१८.१७ | |
| ७६,९०,८२,२२७.०० | **गुंतवणूक** | | ८७,१३,६२,१२६.०० |
| २७,७३,८०,०५६.०० | १) राष्ट्रीयकृत बँकेतील गुंतवणूक | १९,५६,००,०००.०० | |
| १०,०००.०० | २) एम.एस.सी. बँक शेअर्स | १०,०००.०० | |
| ३८,२८,४०,३५०.०० | ३) गव्हर्नमेंट सिक्युरिटी (एच.टी.एम.) | ४९,१२,५२,१२६.०० | |
| १०,८८,५१,८२१.०० | ४) इतर बँकेतील गुंतवणूक | १८,४५,००,०००.०० | |
| १,२४,६७,९२,८५९.०० | **कर्जे** | | १,२६,८४,८४,९१०.९४ |
| १२,३२,५५,९९१.६१ | १) ओ.डी.एफ.डी. | १३,९२,३०,५८५.३८ | |
| ४४,९३,६२,००४.०५ | २) डिमांड लोन सिक्युअर्ड | ४१,०७,९१,६३६.८६ | |
| १,४६,६५,८४३.०० | ३) सोने तारण कर्ज | ४,२३,६०,८३४.०० | |
| ४,३०,७९,३२२.०० | ४) वाहन तारण कर्ज | ४,७२,०२,६७७.०० | |
| ६,५७,२७,७६२.०० | ५) घर तारण कर्ज | ८,९३,७६,७००.१२ | |
| ४१,८८,४४७.०० | ६) ठेव तारण कर्ज | ४५,४३,०३६.०० | |
| ४,७३,६४८.०० | ७) पिग्मी ठेव तारण कर्ज | २,००,८८५.०० | |
| ११,५७,४५९.५० | ८) मशिनरी तारण कर्ज | ०९,५२,८४१.५० | |
| २६,७७,०७,३१६.३९ | ९) नजर गहाण कर्ज | २३,६०,७४,४४८.७९ | |
| ८,२२,६१७.०० | १०) स्टाफ लोन | ८,५३,४९०.०० | |
| ३६,४४,३३८.०० | ११) डिमांड लोन क्लिन | ३२,७९,५२३.०० | |
| १७,१९,६३,१४४.६५ | १२) नजर गहाण इतर तारण | १२,७९,३१,५०१.२९ | |
| २२,३२८.०० | १३) लोन अगेंस्ट गव्हर्नमेंट सिक्युरिटी | ०.०० | |
| २,०६,९२,२५४.०० | १४) वेअर हाऊस कर्ज | २,५५८.०० | |
| १२,२०,१८१.०० | १५) स्टाफ हाऊसिंग लोन | २३,१४,०८१.०० | |
| १,२८,४९,४७६.०० | १६) सोने तारण टर्म लोन | २,६४,११,८७२.०० | |
| ४,१६,७६,०८३.०० | १७) प्रॉपर्टी मॉर्गेज लोन | १०,२०,२३,८२६.०० | |
| २,४२,८४,६४३.८० | १८) लोन अगेंस्ट प्रॉपर्टी (सीसी) | ३,४९,३४,६१५.०० | |
| २,९७,९३,५४५.७१ | **व्याज** | | २,६१,५९,१५०.०० |
| २,३९,३८,४७३.०० | १) गुंतवणूकीवरील येणे व्याज | १,७६,५६,३३०.०० | |
| ५०,५९,४३२.७१ | २) गव्हर्नमेंट सिक्युरिटीवरील येणे व्याज | ७७,०३,०६०.०० | |
| ७,९५,६४०.०० | ३) स्टाफ हाऊसिंग कर्ज व्याज | ७,९९,७६०.०० | |
| १७,७८,५४,१९४.१४ | **कर्जावरील येणे व्याज** | | १८,०१,२७,३३२.३९ |
| ६,३६,३८,४४९.८५ | **डेडस्टॉक, फर्निचर व फिक्श्चर** | | ६,५७,४०,४५७.२७ |
| ३३,८९,३२४.९५ | १) डेडस्टॉक | ४०,६६,२३७.४७ | |
| ६५,८८,९३२.३३ | २) फर्निचर व फिक्श्चर | ६७,१७,२००.४१ | |
| ८,००,९१५.४३ | ३) इलेक्ट्रीक फिटींग | ९,६५,८१०.९३ | |
| ४,६९,९३९.५२ | ४) संगणक | ८,१२,१३२.८४ | |
| १,२७,८३,२६९.३८ | ५) इमारत | १,२३,६७,२५९.३८ | |
| ६,२५,१४७.२४ | ६) वाहन | ५,३१,३७५.२४ | |
| ३,८८,८०,०००.०० | ७) इमारत पुनर्मुल्यांकन | ४,०१,९४,६५८.०० | |
| १,००,९२१.०० | ८) सोलार सिस्टिम | ८५,७८३.०० | |
| १,०२,६८,१७३.०० | **इतर येणी** | | १,४७,७९,१७०.४० |
| ३१,४९५.०० | १) टेलिफोन डिपॉझिट | ३१,४९५.०० | |
| ५२,०००.०० | २) प्रिंटींग व स्टेशनरी स्टॉक | २,२६,०५६.४० | |
| ५,६८,५५८.०० | ३) प्रीपेड एक्स्पेंसेस | ६,२९,७५४.०० | |
| १९,४१,१३३.०० | ४) इन्कम टॅक्स रिसीव्हेबल | २७,७६,१७८.०० | |
| ५०,१८०.०० | ५) एम.एस.इ.बी. डिपॉझिट | ४०,८८०.०० | |
| १,३५,८०७.०० | ६) डिपॉझिट अगेन्स्ट आधार पेन्शन | १,३५,८०७.०० | |
| २०,२५,०००.०० | ७) ए.पी.एम.सी. डिपॉझिट | २०,२५,०००.०० | |
| ५४,६४,०००.०० | ८) जुळे सोलापूर शाखा बिल्डींग ॲडव्हान्स | ७८,१४,०००.०० | |
| | ९) एम.आय.डी.सी. शाखा बिल्डींग ॲडव्हान्स | ११,००,०००.०० | |
| ४,००,०००.०० | **वसुलीस आलेली बिले** | | ४,००,०००.०० |
| ८,१८,९६३.४६ | **डिफ अकाऊंट** | | १०,००,९१५.०५ |
| १७,५८,८१५.०० | **बँक गॅरंटी** | | ३४,३७,८८७.०० |
| **२,४५,२८,९५,३१७.२०** | एकूण | | **२,६९,६५,३८,६१८.३१** |

## नफा-तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

| ३१/०३/२०२५ (रु.) | खर्च | | ३१/०३/२०२६ (रु.) |
|---|---|---|---|
| १३,०७,८६,०५७.६८ | ठेवीवरील व्याज | | १३,५८,०६,३९८.७६ |
| २,०७,२०,३७५.०० | कर्मचाऱ्यांचे पगार, बोनस व भत्ते | | १,८०,२१,६००.०० |
| ९,५०४.९६ | स्टेशनरी, छपाई | | ४८,२५७.०० |
| ६८,५१७.३८ | जाहिरात | | ३,५०,०७५.४८ |
| २,७४,२१६.६९ | टपाल व दूरध्वनी | | ४,०३,७४७.०० |
| २६,१९,०६६.०० | विमा खर्च | | २७,०१,७९७.४३ |
| ४,६७,८३६.०० | विजेचा खर्च | | ३,३२,४५८.०० |
| १२,११,५७४.८३ | दुरुस्ती व देखभाल खर्च | | १७,३९,९३०.६७ |
| ६३,१८६.०० | सभा खर्च | | ५१,७२९.०० |
| ४,०६,२४६.०० | म्युनिसिपल टॅक्स | | १,३९,४५१.०० |
| १,२०,९७,२५३.२८ | **इतर खर्च व तरतूद** | | १,२०,०१,२९२.३० |
| २१,०३,२०२.०० | १) पिग्मी कमिशन | २४,४१,२७६.०० | |
| १०,९२,२७५.९३ | २) किरकोळ खर्च | १३,७३,६०३.३२ | |
| १३,२०,४२८.०० | ३) ऑडिट फी | ७,३५,९२८.५० | |
| ६,३०४.०० | ४) प्रवास खर्च | ७,२०६.०० | |
| १,३२,३६२.०० | ५) वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,५०,५७०.७२ | |
| ४३,९८२.०० | ६) बँक असोसिएशन वर्गणी | ७३,०३०.०० | |
| १,९०,९४६.०० | ७) पेट्रोल | १,३३,१४०.०० | |
| २३,४८,७४७.०० | ८) घसारा | २९,०७,९५०.३२ | |
| ३८,१८५.०० | ९) संचालक/स्टाफ ट्रेनिंग खर्च | १३,८८२.०० | |
| ४,७०,७००.०० | १०) संचालक मंडळ मिटींग भत्ते | ४,९३,२००.०० | |
| ६०,६००.०० | ११) प्रिमीयम राईट ऑफ सरकारी कर्जरोखे | २,३१,६००.०० | |
| २३,००,०००.०० | १२) ग्रॅज्युईटी | १५,८६,६८१.०० | |
| ११,६७,७९०.०० | १३) आयकर खर्च | १,७९,१८२.०० | |
| १,१५,६४२.०० | १४) स्टाफ युनिफॉर्म | ५,३४०.०० | |
| १,८६,०५०.०० | १५) कन्सलटंन्सी चार्जेस | १,६७,३०४.२० | |
| २३,२०५.१० | १६) सीआयसी चार्जेस | ०.०० | |
| २,५००.०० | १७) बँक प्रोफेशनल टॅक्स | ०.०० | |
| २,५७,६८४.२५ | १८) जीएसटी खर्च | १,१०,८३६.०० | |
| २,३६,६५०.०० | १९) मोबाईल बँकींग खर्च | १३,९०,५६२.२४ | |
| २,८४,००,०००.०० | **प्रोव्हिजन** | | ३,१३,००,०००.०० |
| २,००,००,०००.०० | **संशयीत व बुडीत कर्ज तरतूद** | | २,००,००,०००.०० |
| ८०,००,०००.०० | **आयकर तरतूद** | | १,१०,००,०००.०० |
| ४,००,०००.०० | **स्टैंडर्ड ॲसेट प्रोव्हिजन** | | ३,००,०००.०० |
| १,००,५५,३८८.२३ | **नफा** | | १,८६,३७,२०७.६९ |
| **२०,७१,७९,२२२.०५** | एकूण | | **२२,१५,३३,९४४.३३** |

| ३१/०३/२०२५ (रु.) | उत्पन्न | | ३१/०३/२०२६ (रु.) |
|---|---|---|---|
| १९,८८,४२,०४२.०५ | **व्याज** | | २१,३०,७५,७२१.९९ |
| १३,१३,२०,२४४.२५ | १) कर्जावरील व्याज | १४,९४,७९,१८८.९६ | |
| ९४,३७७.०० | २) स्टाफ कर्जावरील व्याज | ९६,३७२.०० | |
| ३,६५,९९,०४२.०९ | ३) गुंतवणुकीवरील व्याज | ३,१७,९६,७१०.७४ | |
| ३,०८,२८,३७८.७१ | ४) सरकारी कर्जरोखेवरील व्याज | ३,१७,०३,४५०.२९ | |
| ८३,३७,१८०.०० | **इतर उत्पन्न** | | ८४,५८,२२२.३४ |
| ८,९३,४३९.५३ | १) कमिशन | ७,६४,७३४.०९ | |
| ३९,०६,५३९.४३ | २) इन्सिडेंटल चार्जेस | ३८,२४,५४२.४३ | |
| ४३,१३०.०० | ३) नोटीस फी | २५,९३६.०० | |
| २७,७४,०६१.८८ | ४) प्रोसेसिंग फी | ३०,६०,६६७.८२ | |
| ७,६९०.०० | ५) स्टॉप पेमेन्ट चार्जेस | ७,१४२.०० | |
| ६,८८,४४९.१६ | ६) लॉकर भाडे जमा | ७,१७,२००.०० | |
| २३,८७०.०० | ७) कॉम्प्युटर चार्जेस | ०.०० | |
| | **प्रॉफिट ऑन सेल ऑफ गव्ह. सिक्युरिटीज** | | ५८,०००.०० |
| **२०,७१,७९,२२२.०५** | एकूण | | **२२,१५,३३,९४४.३३** |

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | |
|---|---|---|---|---|---|---|
| सीए धनराज नोगजा | सौ. पद्मा भुतडा | श्री. रमेश राठी | श्री कौस्तुभ करवा | सीए शुभम सोमाणी | श्री. आनंद बलदवा | विजय पंचप्पा ॲन्ड कंपनी |
| चेअरमन | व्हा. चेअरमन | संचालक | संचालक | जनरल मॅनेजर | मुख्य कार्यकारी अधिकारी | चार्टर्ड अकौंटंट्स, सोलापूर<br>वैधानिक लेखापरिक्षक |

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ज्युडोपटू हर्ष सिंगची आशियाई खेळाची तयारी

**नवी दिल्ली :** राष्ट्रकुल स्पर्धेत पदक जिंकणारा पहिला भारतीय म्हणून इतिहास रचणाऱ्या पुरुष ज्युडोपटू हर्ष सिंगने आता आपल्या पुढील आव्हानाची, म्हणजेच आशियाई खेळांची तयारी सुरू केली आहे. गतविजेता हर्ष पुढील महिन्यात होणाऱ्या आयची-नागोया आशियाई खेळांपूर्वी यजमान जपान किंवा जॉर्जियामध्ये प्रशिक्षण घेण्याची योजना आखत आहे. ज्युडोपटूंच्या सत्कार समारंभात हर्षने सांगितले, मला जपान किंवा जॉर्जियाला जायचे आहे. हे दोन्ही देश भारतीय ज्युडोपटूंसाठी आदर्श आहेत. जपानसोबतच जॉर्जियादेखील जगातील सर्वांत मजबूत ज्युडो देशांपैकी एक आहे. तेथील प्रशिक्षण आमच्या भविष्यातील तयारीसाठी खूप फायदेशीर ठरेल. ऑलिम्पिकमध्ये यश मिळवलेल्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतल्यास आम्ही आमचे ध्येय गाठू शकू. हर्ष म्हणाला की, तांत्रिक बाबींमध्ये भारतीय ज्युडोपटू अजूनही जगातील अव्वल खेळाडूंपेक्षा मागे आहेत.

### विक्रम आदित्य करणार भारताचे नेतृत्व

**नवी दिल्ली :** विक्रम आदित्य चौफलाच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ, गुरुवारपासून रॉटरडॅम येथे सुरू होणाऱ्या रॅकेटलॉन विश्वचॅम्पियनशिपमध्ये सलग तिसऱ्या विजेतेपदासाठी प्रयत्न करेल.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द



कार्यक्रमाला उपस्थित गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल खेळाडू व मान्यवरांसह

## २०३० च्या तयारीला प्रारंभ

**गांधीनगर, ५ ऑगस्ट**

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे बुधवारी औपचारिकपणे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज सुपूर्द करण्यात आला. याद्वारे अहमदाबाद येथे होणाऱ्या २०३० च्या क्रीडा स्पर्धेच्या तयारीला प्रतीकात्मक सुरुवात झाली. ग्लासगोहून परतल्यानंतर, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान पटेल यांच्याकडे ध्वज सुपूर्द केला.

संघवी, दोन वेळचे ऑलिम्पिक पदक विजेते नीरज चोप्रा आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांच्यासह, ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभात उपस्थित होते. तेथे पुढील यजमान देश म्हणून भारताकडे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज सुपूर्द करण्यात आला. शासनाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी येथील राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान पूर्ण सन्मानाने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे औपचारिकपणे सुपूर्द केला. २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारे गुजरातचे पॅरा-ॲथलीट राकेश भट्ट आणि रोहित मजगुल हे देखील या प्रसंगी उपस्थित होते. पॅरा टेबल टेनिसपटू सोनल पटेलही या कार्यक्रमात उपस्थित होती.

**टीम गुजरात पूर्णपणे सज्ज**

उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी गुजरात आणि देशभरातील खेळाडूंचे अभिनंदन करताना सांगितले की, अहमदाबादमध्ये २०३० च्या राष्ट्रकुल खेळांचे आयोजन करण्यासाठी 'टीम गुजरात' पूर्णपणे सज्ज आहे. त्यांनी सांगितले की, राष्ट्रकुल क्रीडा, भारतीय ऑलिम्पिक संघटना, भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि गुजरात क्रीडा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रकुल खेळांची तयारी सुरू आहे. स्कॉटलंडहून परतल्यानंतर त्यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले, ग्लासगो ते अहमदाबाद असा २०३० च्या राष्ट्रकुल खेळांचा प्रवास आता अधिकृतपणे सुरू झाला आहे.

ग्लासगोहून परतल्यानंतर माध्यमांशी बोलताना हर्ष संघवी म्हणाले की, राज्य सरकार राष्ट्रकुल खेळांच्या तयारीला गती देईल, तसेच क्रीडा पायाभूत सुविधा आणि खेळाडूंच्या विकासावरही लक्ष केंद्रित करेल. ते म्हणाले की, या उपक्रमामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट इंडिया' मोहिमेला आणखी चालना मिळेल, 'नशामुक्त भारत' मोहीम अधिक मजबूत होईल आणि तरुणांना फिटनेस व निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरणा मिळेल. संघवी म्हणाले की, केंद्र सरकारने क्रीडा क्षेत्रात केलेल्या वाढीव गुंतवणुकीमुळे आधुनिक क्रीडा सुविधांचा विकास झाला आहे, ज्यामुळे भारतीय खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी मिळाली आहे. (वृत्तसंस्था)

# गेल्या दशकातील सर्वांगीण प्रयत्नांचे यश

## राष्ट्रकुलमध्ये खेळाडूंच्या यशावर मांडवियांनी व्यक्त केला आनंद

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

भारताने आपल्या आवडत्या खेळांपैकी एकाही खेळात भाग घेतला नसतानाही, ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत खेळाडूंनी केलेल्या अपवादात्मक कामगिरीबद्दल क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी आनंद व्यक्त केला आणि गेल्या दशकातील सरकारच्या प्रयत्नांना आता यश येत असल्याचे सांगितले.

अर्थसंकल्पीय कपातीमुळे ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत केवळ १० खेळांचा समावेश करण्यात आला होता, त्यापैकी भारताने नऊ खेळांमध्ये भाग घेतला आणि १३ सुवर्ण पदकांसह ३९ पदके जिंकली. बुधवारी रालोआ संसदीय पक्षाच्या बैठकीत क्रीडा मंत्री मांडविया यांनी ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताच्या कामगिरीचा तपशील दिला.



भारताने २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ३० पदके आणि २०१८ च्या गोल्ड कोस्ट क्रीडा स्पर्धेत २२ पदके जिंकली.

मांडविया म्हणाले, २०१४ पासून क्रीडा क्षेत्रात सरकारने केलेल्या प्रयत्नांना आता फळ मिळत आहे. भारताने १९४७ ते २०१२ पर्यंत एकूण २१ ऑलिम्पिक पदके जिंकली, पण केवळ गेल्या तीन ऑलिम्पिकमध्ये १५ पदके जिंकली आहेत. त्याचप्रमाणे, २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने प्रथमच १०० पदकांचा टप्पा ओलांडला.

भारतीय खेळाडू आता सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धांमध्ये नेमबाजी, कुस्ती, बॅडमिंटन, क्रिकेट आणि हॉकी यांचा समावेश असेल, हे सर्व भारतीय वर्चस्व असलेले खेळ आहेत.

क्रीडा मंत्र्यांनी या कामगिरीचे श्रेय गेल्या दशकात सरकारच्या विविध उपक्रमांद्वारे निर्माण झालेल्या क्रीडा परिसंस्थेला दिले, ज्यामध्ये खेलो इंडिया योजना, फिट इंडिया चळवळ, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम (टॉप्स) आणि अस्मिता लीग यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

## हरयाणाच्या विजेत्यांवर पुरस्कारांचा वर्षाव

**चंदीगड :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये हरयाणाला गौरव मिळवून देणाऱ्या खेळाडूंचा राज्य सरकार ७ ऑगस्ट रोजी सन्मान करणार आहे.

मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, प्रमुख पाहुणे म्हणून पंचकुला येथील सेक्टर ३ मधील ताऊ देवी लाल स्टेडियममध्ये आयोजित राज्यस्तरीय समारंभात खेळाडूंना १३.४७ कोटी रुपयांची रोख पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रे प्रदान करतील.

# बॅडमिंटन विश्वचॅम्पियनशिपमध्ये आयुषची लढत शी युकीशी

## सिंधू, लक्ष्य सेन आणि सात्त्विकसाईराज-चिरागला सोपा ड्रॉ

**नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**



पाच वेळा पदक विजेती पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन आणि पुरुष दुहेरीतील सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीला बुधवारी येथे बॅडमिंटन विश्वचॅम्पियनशिपसाठी सोपा ड्रॉ मिळाला आहे. परंतु पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत आयुष शेट्टीला चीनच्या अव्वल मानांकित शी युकीकडून कडवे आव्हान मिळणार आहे.

भारताचे सर्व पाच प्रकारांमध्ये प्रत्येकी दोन खेळाडू आहेत : पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी. दुहेरी प्रकारातील सर्व १६ मानांकित जोड्यांना पहिल्या फेरीत बाय मिळाला आहे.

आपले सहावे विश्वचॅम्पियनशिप पदक जिंकणारी जगातील पहिली खेळाडू बनण्याचे ध्येय बाळगणारी नववी मानांकित सिंधू, आयर्लंडच्या सोफिया नोबलविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. भारतीय खेळाडूचा उपांत्य फेरीपर्यंतचा मार्ग सोपा असण्याची शक्यता आहे. तिचा सामना दक्षिण कोरियाच्या अव्वल मानांकित आन से यंगशी होण्याची शक्यता आहे.

महिला एकेरीमध्ये, उन्नती हुडाचा सामना पहिल्या फेरीत म्यानमारच्या थेट तार हुझारशी होईल. पुरुष एकेरीमध्ये, १४ वे मानांकित लक्ष्यचा सामना पहिल्या फेरीत ऑस्ट्रियाच्या कॉलिन्स व्हॅलेंटाईन फिलमनशी होईल. जर लक्ष्यने पहिल्या दोन फेऱ्या पार केल्या, तर तिसऱ्या फेरीत त्याचा सामना थायलंडच्या दुसऱ्या मानांकित कुनलावुत विटिडसर्नशी होऊ शकतो.

पुरुष दुहेरीमध्ये, पाचवे मानांकित सात्त्विक आणि चिराग या जोडीला पहिल्या फेरीत बाय मिळाला आहे, तर हरिहरन आमसाकरुनन आणि एम.आर. अर्जुन आपल्या मोहिमेची सुरुवात आयर्लंडच्या स्कॉट गिल्डिया आणि पॉल रेनॉल्ड्स या जोडीविरुद्ध करतील.

महिला दुहेरीमध्ये, कविप्रिया सेल्वम आणि सिमरन सिंघी यांचा सामना स्पॅनिश जोडी निकोल कॅरुला आणि कार्मेन मारिया जिमेनेझ यांच्याशी होईल, तर त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचाही सामना पहिल्या फेरीत स्पॅनिश जोडी पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांच्याशी होईल.

भारताचे मुख्य प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांनी हा ड्रॉ भारतीय खेळाडूंसाठी चांगला असल्याचे म्हटले आहे. आयुषने शी यु चीचा सामना उशिरा करण्याऐवजी लवकर करणे अधिक चांगले होईल, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# क्रीडा ज्ञान परीक्षा ६ सप्टेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

क्रीडा भारती आणि चैतन्य काश्यप फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने छात्र, अभिभावक आणि जनसामान्यांमध्ये खेळांच्या प्रति रुची जागृत करण्यासाठी पूर्ण भारतात 'क्रीडा ज्ञान परीक्षा रविवार ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ५ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आयोजित केली असल्याचे क्रीडा भारतीचे प्रांत उपाध्यक्ष ज्ञानेश्वर म्यकल यांनी सांगितले

या परीक्षेच्या माध्यमातून खेळांद्वारे चारित्र्य आणि राष्ट्राची निर्मिती करण्याच्या उद्देशाने क्रीडा भारती कार्यरत आहे. या परीक्षेमध्ये २० मिनिटांत ५० प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. परीक्षा मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणक याद्वारे कोणत्याही माध्यमातून दिली जाऊ शकते. यासाठी वयोगट १२ ते २५ वर्षे पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

खेळ जगतात जागरूकतेसाठी प्रति परीक्षार्थी २०/- रुपये नोंदणी शुल्क असून ऑनलाइन माध्यमातून https://kreedabharatikg.org/ या वेबसाईटवर किंवा दिलेल्या अथवा कोडवरून नोंदणी करता येईल. परीक्षा दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी ४ वाजतानंतर मार्कशीट आणि प्रमाणपत्र डाउनलोड करता येईल.

**एकूण ४.७१ लाखाची बक्षिसे**

चैतन्य कुमार काश्यप फाऊंडेशनद्वारे प्रायोजित बक्षिसे या प्रमाणे: **प्रथम पुरस्कार:** १ लाख रुपये (एक विजेता), **द्वितीय पुरस्कार:** ५० हजार रुपये (दोन विजेते), **तृतीय पुरस्कार:** २५ हजार रुपये (सहा विजेते), **चतुर्थ पुरस्कार:** ११ हजार रुपये (अकरा विजेते - संस्थेच्या ११ विभागांमधून प्रत्येकी एक).



# सिंहगड पब्लिक स्कूल १७ वर्षांखालील गटात उपविजेता

## सुब्रतो कप शालेय फुटबॉल स्पर्धा : १५ वर्षांखालील गटात तृतीय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सुब्रतो कप आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगावने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद, तर १५ वर्षांखालील गटात तृतीय स्थान संपादिले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात सिंहगडच्या संघाने उपांत्य फेरीत के.बी.पी. पंढरपूर संघाचा २-० असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात आयएमएस, अक्कलकोट संघाविरुद्ध चुरशीची लढतीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. १५ वर्षांखालील गटात तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सिंहगड पब्लिक स्कूलने आयएमएस, अक्कलकोट संघावर १-० असा रोमांचक विजय मिळवत तृतीय क्रमांक संपादिला. संघाचे प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख आदींनी संघाचे अभिनंदन केले.

# कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षणाचा आदर्श: यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ व राजीव स्मृती बहुउद्देशिय संस्था बार्शीची यशोगाथा



बार्शीच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे स्वर्गीय अर्जुनराव बारबोले यांच्या प्रेरणेतून अरूणदादा बारबोले यांनी कौशल्याधारित व व्यवसायाभिमुख शिक्षणाची गरज ओळखून १३ ऑक्टोबर १९८२ रोजी यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना केली. गेल्या ४४ वर्षांच्या प्रवासात संस्थेने रोजगाराभिमुख शिक्षणाच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली असून, अनेक कुटुंबांचा आधारस्तंभ बनण्याचा मान मिळवला आहे.

संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत विविध शाखा कार्यरत आहेत. केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासावर भर देण्याची दूरदृष्टी अरूणदादांनी ठेवली. याच हेतूने शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) सुरू करण्यात आल्या. पुढे २००६ साली खांडवी येथे औषधनिर्माण शास्त्र पदविका (D.Pharmacy) महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून या महाविद्यालयाला 'व्हेरी गुड' असा दर्जा मिळालेला आहे, ही संस्थेची मोठी कामगिरी आहे.

बार्शी व परिसरातील विद्यार्थ्यांना बी.फार्मसीसाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने २०१९ साली खांडवी येथे पदवी स्तरावरील (B.Pharmacy) शिक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, प्राचार्य सुजित करपे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. संस्थेच्या कौशल्याधारित आणि व्यवसायाभिमुख शिक्षणामुळे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. ही संस्था केवळ शैक्षणिक केंद्र नसून समाजाच्या प्रगतीत योगदान देणारी एक सक्षम शक्ती बनली आहे.

इंग्रजी शिक्षणाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन अरूणदादांनी बार्शीत इंग्रजी माध्यमाच्या पूर्व-प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचीही व्यवस्था निर्माण केली आहे. तसेच राजीव बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून दिव्यांग व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

ज्या बालकांचे पालकत्व हरपले आहे, अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या सहकार्याने बालसंगोपन योजना राबवली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संस्थेचा विस्तार बार्शीपुरता मर्यादित न राहता कुर्डूवाडी, भूम, कळंब या परिसरातही शाखांद्वारे वाढविण्यात आला आहे.

पायाभूत शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास व रोजगाराभिमुख शिक्षणाचा संगम साधत युवकांच्या भविष्याला योग्य दिशा देणारी आणि सामाजिक विकासात मोलाची भूमिका बजावणारी संस्था म्हणून यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ आज एक आदर्श ठरली आहे. संस्थापक अध्यक्ष अरूणदादा बारबोले यांच्या दूरदृष्टी, चिकाटी आणि सामाजिक बांधिलकीमुळे संस्थेला आज वैभवशाली स्थान प्राप्त झाले आहे.

**- मोहन लोहार**
विशेष शिक्षक

# पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेतील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना तातडीने बक्षीस रक्कम द्या

## आमदार सतीश चव्हाण यांची उपमुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ५ ऑगस्ट-**

पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेतील विजेत्या भारतीय संघात सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासनाच्या धोरणानुसार रोख बक्षीसाची रक्कम आणि शासकीय सेवेत नोकरी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी विधान परिषद आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात मुंबई येथे आमदार सतीश चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. नवी दिल्ली येथे १३ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा अत्यंत दिमाखात पार पडली होती. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र शासनाने १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. विशेष म्हणजे, या ऐतिहासिक स्पर्धेत भारत देशाच्या पुरुष आणि महिला खो-खो संघाने चॅम्पियन ठरत सुवर्णपदक पटकावले होते.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या ७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार (जीआर), वरिष्ठ विश्वचषक



(वर्ल्ड कप) स्पर्धेत सांघिक क्रीडा प्रकारातील विजेत्या खेळाडूंना २.२५ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक देण्याचे प्रावधान आहे. मात्र, या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंना अद्याप हे घोषित प्रोत्साहनपर इनाम मिळालेले नाही. त्यामुळे या खेळाडूंना त्वरित रोख बक्षीस रक्कम वितरीत करावी आणि नियमानुसार शासकीय सेवेतमामा सामावून घेण्यात यावे, अशी आग्रही विनंती आमदार सतीश चव्हाण यांनी केली.आमदार सतीश चव्हाण यांच्या या निवेदनाची आणि मागणीची गांभीर्याने दखल घेत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या प्रकरणी तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती आमदार सतीश चव्हाण यांनी यादरम्यान दिली.

# मौलाना आझाद पॉलिटेक्निकमध्ये नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

द ग्रेट मौलाना अबुल कलाम अझाद अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था संचलित मौलाना आझाद पॉलिटेक्निक, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष तसेच थेट द्वितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ पार पडला. तसेच उन्हाळी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा, उत्कृष्ट निकाल देणाऱ्या प्राध्यापकांचा गुणगौरव सोहळाही पार पडला.

अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष अमिरोद्दीन शेख हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अल्पसंख्याक आयोगाचे राज्य सदस्य वसीम बुऱ्हाण, महावितरणचे कार्यकारी अभियंता विनायक इदाते, डॉ. इस्माईल शेख उपस्थित होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नसिर खलिफा, खजिनदार मुश्ताक चौधरी आणि संचालक सदस्य अल्ताफ बुऱ्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यास विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, माजी विद्यार्थी आदींची उपस्थिती लाभली. प्राचार्य डॉ.सर्फराज शेख यांनी प्रास्ताविक केले. वसीम बुऱ्हाण यांनी अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांची माहिती दिली. डॉ. इस्माईल शेख यांनीही संबोधित केले. सन्मानित विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अतिया शेख यांनी, तर आभारप्रदर्शन अझर गिरगावकर यांनी केले.

# शंकरनगर येथे रत्नाई नागपंचमी स्पर्धा

## समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑगस्ट -**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.११ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता स्मृतीभवन शंकरनगर येथे रत्नाई पारंपारिक नागपंचमी समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन केले आहे.

जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नियोजनातून मुलींसाठी या स्पर्धा होत आहेत. स्पर्धेमध्ये सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय अकलूज, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकरनगर या सात शाखांचा सहभाग आहे.



प्रत्येक संघात सुमारे २० ते ५० कलाकार पारंपारिक गीतांचेच सादरीकरण करणार असून यासाठी त्यांना २० मिनिटांचा कालावधी दिला आहे. लाखो रुपयांची बक्षीसेही ठेवली आहेत. सदरची स्पर्धा ११ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत होणार असून ते केवळ निमंत्रितासाठी असून सर्वांसाठी याचे थेट प्रक्षेपण त्याच वेळी सुरू राहणार आहे. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, प्रताप क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष पोपट भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव उपस्थित होते.


## CHANGE IN NAME

Do I hereby declare that my old name - **ANJUM RAFIK SOUDAGAR** and my new name has been - **ANJUM SAGEER SOUDAGAR**, R/o - 1427, Mangalwar Peth, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur Pin Code: 413 411

**Dated - 04/08/2026**
**Notary Affidavit No. 02571/2026**

**अंजुम सगीर सौदागर**
**ANJUM SAGEER SOUDAGAR**
R/o - 1427, Mangalwar Peth, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur Pin Code: 413411


# अकोलेकाटी येथे नवविवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

सहा महिन्यापूर्वी लग्न झालेल्या नवविवाहितेने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना अकोलेकाटी (ता.उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी मयताच्या सासरकडील मंडळींवर गुन्हा दाखल केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी मागणी मयताच्या माहेर कडील लोकांनी केली आहे.

पायल धोत्रे (वय १९ रा. अकोलेकाटी ता.उत्तर सोलापूर) असे त्या विवाहितेचे नाव आहे. मंगळवारी रात्री पतीबरोबर भांडण झाल्याने तिने घरातील छताच्या अँगलला ओढणीने गळफास घेतला. याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस पाटील आणि ग्रामीणच्या पोलिसांनी मृतदेह फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. मयत पायल हिचे माहेर सुरतगाव (ता.तुळजापूर) येथील असून तिचा विवाह फेब्रुवारी महिन्यात झाला होता. याप्रकरणी हवालदार वाघमोडे तपास करीत आहेत.

## निधन वृत्त...

### भामाबाई भुसे

**मंगळवेढा, दि. ५ ऑगस्ट-**

घरनिकी येथील भामाबाई शामराव भुसे (वय ९५) यांचे मंगळवार दि.४ ऑगस्ट रोजी रात्री १०:१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे स्टोअर किपर उत्तम भुसे यांच्या त्या मातोश्री होत.



### जगदीश पाटील

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अडत व्यापारी जगदीश सिद्धाराम पाटील (वय ३४ रा.कुमठे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. आडत व्यापारी सद्दोजात पाटील यांचे ते चुलत बंधू होत.



### आफताब शेख

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

जोडभावी पेठ येथील रहिवाशी आफताब सलीम शेख (वय २७) यांचे आज बुधवारी सकाळी आकस्मिक निधन झाले. बुधवारी पहाटे घरामध्ये अचानक पोट दुखू लागल्याने त्यांना खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले असता त्यांचा काही तासातच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ असा परिवार आहे.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः माळशिरस तालुका व मौजे बचेरी ता. माळशिरस येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जि. सोलापूर, ता. माळशिरस पैकी मौजे बचेरी जमीन गट नं.२०९/६ क्षेत्र २.८५.०० हे.आर आकार १ रु. ५० पैसे हे संपूर्ण क्षेत्र पूर्वीचे मालक पवन सिद्राम तिवाटणे हे ता. २४/०४/२०२५ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अभिजीत पवन तिवाटणे, अमृता आशुतोष राव, कस्तुरी पवन तिवाटणे यांचे वारस म्हणुन बचेरी फेर नोंद नं.५०१३ नुसार झालेली आहे. सदर जमीन ही सिलींग कायद्याखालील असल्यामुळे व सदर जमिनीचा आमचे अशिल सचिन बाबूराव मदने यांनी खरेदीकामी व्यवहार केलेला असल्यामुळे परंतु सदर जमीन हस्तांतरणाकामी मा. जिल्हाधिकारीसो सोलापूर यांची पुर्व परवानगी आवश्यक असल्यामुळे तसे प्रकरण दाखल करण्याचे आहे. त्यामुळे सदर जमिनीचे विक्री अथवा हस्तांतरणाकामी कोणाचा काही हक्क, हितसंबंध अगर अन्य प्रकारे हस्तांतरणाबाबत व्यवहार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसांचे आत आमचे अशिल अथवा त्यांचे विधीज्ञ यांचेशी सक्षम कागदोपत्रांनिशी संपर्क करावा अन्यथा सदर मिळकतीशी कोणाचीही, कसलाही हक्क, हितसंबंध नाही असे समजुन रितसर परवानगी आणून जमीन खरेदीचा व्यवहार करणेची पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. त्यानंतर कोणाची कसलीही हरकत ऐकुण घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे ता.०५/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. एस.डी. मदने**
**मु.पो. ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**मो. ९८२२१४१४८१**



## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अ.नं. २४/२०२६
पुढील नेमली ता. ११/०८/२०२६ नि.५

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

१) **बशीरा बादशाह रमदान,**
वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. एकविराई मंदिराजवळ, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

२) **शमशाद बादशाह रमदान**
लग्नानंतरचे नांव - शमशाद मिरासाब अतनी
वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १, २ या एकमेकींच्या सख्या बहिणी असून अर्जदाराची आई - रहिमतबी बादशाह रमदान ही होती. ती दि. २१/०१/२०२६ रोजी बार्शी येथे मयत झालेली आहे. अर्जदाराचे वडिला बादशाह महंमदजी रमदान हे दि. १०/०३/१९८५ रोजी बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत वडिल बादशाह महंमदजी रमदान यांचे नांवे अर्ज कलम २ मधील मिळकत असून सदर मिळकतीस वारसा हक्काने नोंद होणेकरीता अर्जदारांनी विनंती केली असता येथील अधिकारी यांनी हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची मागणी केली असलेने गरज भासलेली आहे. सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे. असे कथन करून अर्जदाराने वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथना संबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, हरकत आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमले ता. ११/०८ /२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे.कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. तारीख : ०३/०८/२०२६

**सही/-** **वरिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधीक्षक** **दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**



स्थापना : १२ मार्च १९०८ — पी.टी.आर.नं.ए-६२ (सोलापूर)

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान,
**गांधी नाथा रंगजी कॉलेज ऑफ डी. फार्मसी, सोलापूर**
एआयसीटीई/पीसीआय/सीओए व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्नित
१३, बुधवार पेठ, बाळीवेस, सोलापूर. फोन नं. ०२१७-२३२४१८७, फॅक्स : ०२१७-२६२४९००
संकेतस्थळ : www.gnrdpharmacy.org इमेल : gnrdpharma09@gmail.com संपर्क : ०२१७-२६२११६६

**पाहिजेत**

कायम स्वरूपी विनाअनुदानीत तत्वावर विवीध शिक्षकिय पदावर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक उमेदवारांनी पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रासह **''अध्यक्ष, गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान गांधी नाथा रंगजी कॉलेज ऑफ डि. फार्मसी, सोलापूर.'' १३, बुधवार पेठ, बाळीवेस सोलापूर, या पत्तावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांमध्ये** पोहचतील अशा पध्दतीने पाठवावे. अपूर्ण अर्ज किंवा अपूर्ण कागदपत्रे किंवा नियत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. एकूण रिक्त जागा, आरक्षण, शैक्षणिक अनुभव व इतर अर्हता, वेतन, अटी शर्ती व अर्ज करण्याची पध्दत याबाबतच्या सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gnrdpharmacy.org) आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.dbatu.ac.in) उपलब्ध आहे.

स्थळ : सोलापूर
दिनांक : ०६/०८/२०२६

**अध्यक्ष**
**गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान,**
**गांधी नाथा रंगजी कॉलेज ऑफ डिप्लोमा फार्मसी, सोलापूर.**



# Classifieds

**पाहिजेत**

**आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का? आपला वेळ, शिक्षण, यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत कामाची सुवर्णसंधी. निश्चित उत्पन्न, गुंतवणूक नाही. मो.८०८७४५९८५४**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील सर्व लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील वि.क्र. ३१ मधील बिनशेती खुला प्लॉट याचा गट नं. १०७३/४ मधील प्लॉट नं. २५ याचे क्षेत्रफळ १६८.७७ चौ.मी. याचा बिनशेती आकार ११२ रू. ०० पै. याचे मोजमाप पुर्व पश्चिम बाजू मी. ९.२५ व दक्षिणोत्तर मी. १८.२४ यासी चतु:सिमा :- पुर्वेस - ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. २६, पश्चिमेस - १२ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. २४, याचे पाणी व वागणूक पुर्व व पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक खुला प्लॉट आतील सर्व तदंगभूत वस्तू हक्कासह

सदरचा प्लॉट हा शकील अहमद करीमसाब शेख यांचे मालकी व कब्जेवहिवाटीचा आहे. त्याप्रमाणे त्यांची वर नमूद मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी नाव नोंद असून सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीस आहे.

सदरची मिळकत ही शकील अहमद करीमसाब शेख यांचे मालकी हक्काची व नांवे असलेली कब्जेवहिवाटीची मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. त्यावेळी त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमीची असलेची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपरही वरिल मिळकती संदर्भाने कोणाची काही हरकत, हक्क संबंध, गहाण, साठेखत, दानपत्र, भाडेकरार, मृत्युपत्र, बक्षिसपत्र , चोळी बांगडी, कोर्ट आदेश, लिज, लिन, वारसा हक्क वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क संबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०५ (पाच) दिवसांत खालील पत्त्यावर समक्ष भेट घेऊन योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलाची खात्री करून द्यावी. त्यानंतर आमचे अशिल आपसात ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. ०५/०८/२०२६.

**सही/-**
**ॲड. अक्षय नागनाथ बिडबाग**
**जिल्हा व सत्र न्यायालय आवार,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ७९७२७८८१२३**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ११७/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. गौसिया निसार पंजेशा** — **अर्जदार**
रा. महेदी नगर, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील महमद ए लांडगे)

विरुद्ध

**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार. रा महेदी नगर, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १० डिसेंबर १९९० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १० डिसेंबर १९९० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेण्यासाठी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० जुलै २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिषी दिली.

(शिक्का)
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**



## बँक ऑफ महाराष्ट्र

**आंचलिक कार्यालय, सोलापूर**
पहिला मजला, अग्रवाल पॅलेस,
भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, पिन - ४१३००४

### ताबा नोटीस - बार्शी मुख्य शाखा

ज्याअर्थी, बँक ऑफ महाराष्ट्रचे खालील स्वाक्षरीकर्ते अधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार श्री. मोहन चतुर्भुज लोखंडे व जामीनदार श्री. सुनील हुडाजी लांडे यांना कलम १३ (२) अंतर्गत ३१/०५/२०२५ रोजी मागणी नोटीस बजावली होती. सदर नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु. ५,१९,२१९.१५ (रुपये पाच लाख एकोणीस हजार दोनशे एकोणीस आणि पैसे पंधरा फक्त) तसेच पुढील कंत्राटी दराने व्याज, इतर खर्च आणि आकार जे १९/१२/२०२५ पासून प्रत्यक्ष पेमेंटच्या तारखेपर्यंत लागू होतील, ही रक्कम नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन केले होते.

कर्जदार आणि संबंधित व्यक्ती सदर रक्कम परत करण्यास अपयशी ठरल्यामुळे, कर्जदार, इतर संबंधित व्यक्ती आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि नियम ८ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून ०४/०८/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

कर्जदार, संबंधित व्यक्ती आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी या मालमत्तेचा कोणताही व्यवहार करू नये. मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्र, बार्शी मुख्य शाखेच्या रु. ५,१९,२१९.१५ (रुपये पाच लाख एकोणीस हजार दोनशे एकोणीस आणि पैसे पंधरा फक्त) अधिक पुढील कंत्राटी दराने व्याज आणि १९/१२/२०२६ पासूनचे इतर अनुषंगिक खर्चांच्या बोजाच्या अधीन राहील.

**मालमत्तेचे वर्णन**

**मालमत्ता मालकाचे नाव** : श्री. मोहन चतुर्भुज लोखंडे
**मालमत्तेचा तपशील** : नोंदणीकृत गहाण ठेवलेली जमीन, जी नोंदणी जिल्हा सोलापूर, उपजिल्हा बार्शी, मौजे खामगाव येथील सीटीएस मिळकती क्रमांक ९१५ येथे स्थित आहे.
**चतुःसीमा** : **पूर्व** - गट क्र. १०१/३, **पश्चिम** - गट क्र. १०१/२
**दक्षिण** - येळंब रोड, **उत्तर** - गट क्र. १०१/५/१

**दिनांक : ०४/०८/२०२६**
**ठिकाणः बार्शी, सोलापूर**

(शिक्का)
**सही/-**
**अधिकृत अधिकारी,**
**बँक ऑफ महाराष्ट्र**



## चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक** :- ३७१/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक** :- श्री संत नामदेव आश्रम धर्मादाय संस्था नामदेव सोसायटी बार्शी रोड, बाळे, सोलापूर
**नोंदणी क्र ई** : ५४८/सोलापूर
**अर्जदार** :- श्री रविकिरण मल्लिकार्जुन शेंडगे

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपायुक्त, सोलापूर विभाग सोलापूर हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / नोंदणी अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खालील निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) स्थावर मिळकत :- (वर्णन)

डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे येथील व नवीन शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील नविन सि.स.नं. ६७२ मिळकत यासी प्लॉट नं ५०, ५१ व ५२ याचे एकूण क्षेत्र १७३.८७ चौ.मी. यासी चतुःसीमा :- पूर्व - रस्ता, पश्चिम - रस्ता, उत्तर - रस्ता, दक्षिण - सि.स.नं. ६७२

येणेप्रमाणे चतुःसीमेतील जागा हि विनामोबदला बक्षीसपत्र दस्त क्र ६८७/१९९६f प्रमाणे संस्थेच्या मालकीची झालेली आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न असल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दि ३०/०७/२०२६ रोजी दिली.

(शिक्का)
**सही/-**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**बांधकाम आणि दुरुस्ती काम**

मंडळ रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 21-2026-एसआरडीईएनएस कामाचे नाव: एडीईएन/केएलबीजी उपविभागाअंतर्गत विद्यमान एन टाईप ट्रस एफओबी आणि इतर एफओबीची दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: रु. 20566288.53 विनाकारण रक्कमेचा भरणा (बयाणा रक्कम): रु. 411300.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 06 महिने निविदा उघडण्याची तारीख: 25/08/2026 निविदा सूचना क्रमांक: २३-२०२६-एसआरडीईएनएस कामाचे नाव: 1 एडीईएन(एस) एसयूआर उपविभागासाठी झोन-सी करिता वार्षिक विभागीय कंत्राट. एसयूआर (समाविष्ट) ते दुधनी (समाविष्ट) सोलापूर, टिकेकरवाडी, अक्कलकोट रोड, होटगी, तिलाटी, नागणसूर, बोरोटी, दुधनी इत्यादी ठिकाणी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी निवासस्थाने. (वर्ष:2026-27) 2 एडीईएन/केएलबीजी उपविभागासाठी झोन-डी करिता वार्षिक विभागीय कंत्राट. दुधनी (वगळून) ते वाडी (समाविष्ट). वाडी, शहाबाद, मार्तूर, हिरेनंदुरू, कलबुरगी, बबलाद, कुलाली, ताजसुल्तानपूर इत्यादी ठिकाणी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी निवासस्थाने. (वर्ष:2026-27). कामाची अंदाजित किंमत: रु. 57999999.99 विनाकारण रक्कमेचा भरणा (बयाणा रक्कम): रु. 1160000.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: 06 महिने निविदा उघडण्याची तारीख: 31/08/2026 निविदा सूचना क्रमांक: २४-२०२६-एसआरडीईएनएस कामाचे नाव: 1) डीयूडी-डब्ल्यूडी विभागातील एडीईएन/केएलबीजी उपविभागाअंतर्गत लहान पुलांची दुरुस्ती. 2) एसयूआर-डीयूडी विभागातील एडीईएन/एस/एसयूआर उपविभागाअंतर्गत लहान पुलांची दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: रु. 29891399.82 विनाकारण रक्कमेचा भरणा (बयाणा रक्कम): रु. 597800.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 06 महिने निविदा उघडण्याची तारीख: 25/08/2026. संभाव्य निविदाधारकांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक नोंदवण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट द्यावी. वेबसाइट: www.ireps.gov.in.

ANJ-26 — **डीआरएम(सी), सोलापूर**

**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा**



# नगर परिषद नळदुर्ग

**जा.क्र. ३०३२/नपन/भांडार/निविदा/२०२६** — **दि. ०४/०८/२०२६**

## वार्षिक जाहीर निविदा सन २०२६-२०२७

नळदुर्ग नगर परिषदतर्फे सर्व पात्र उत्पादक / अधिकृत विक्रेते / अनुज्ञप्ती नोंदणीकृत कंत्राटदार धारकांकडून नगर परिषद मार्फत जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येते की, सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता भांडार विभागामार्फत खालील कामाचे निविदा द्वि-लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| द्वि-लिफाफा | |
|---|---|
| १. | जेसीबी पुरवठा करणे ऑपरेटरसह (तिसरी वेळ) |
| २. | मुरुम डस्ट लेबरसह पुरवठा करणे (तिसरी वेळ) |
| ३. | सीसीटीव्ही पुरवठा करणे व तत्सम साहित्य पुरवठा (तिसरी वेळ) |
| ४. | कापड पुरवठा करणे व शिवणेसह (पहिली वेळ) |
| ५. | पाईप पुरवठा करणे (पहिली वेळ) |
| ६. | नगर परिषद कार्यालयामध्ये पाण्याचे जार व पाणीचे बॉक्स पुरवठा करणे. (पहिली वेळ) |

वरील निविदा दि. ०५/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ सायं ५.०० वाजेपर्यंत निविदा विक्री व भरणा करण्यात यावी. मुदतीनंतर आलेल्या निविदा स्वीकारले जाणार नाही. निविदेतील अटी व शर्ती नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर दाखविण्यात आली आहेत.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार नगर परिषदेने राखून ठेवले आहे. याबाबत वेगळी कारणे दिली जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-** **भांडार विभाग प्रमुख** **नगर परिषद नळदुर्ग**
**स्वाक्षरीत/-** **मुख्याधिकारी** **नगर परिषद नळदुर्ग**
**स्वाक्षरीत/-** **अध्यक्ष** **नगर परिषद नळदुर्ग**



**महाराष्ट्र शासन**

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**कार्यालय - प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर**
दूरध्वनी क्र. :- ०२१७-२३७३०४७ ई-मेल :- zarssolapur@rediffmail.com
पत्ता :- ९७, रविवार पेठ, दयानंद महाविद्यालयाजवळ, टपाल पेटी क्र. २०७, सोलापूर ४१३००२

**जा.क्र.प्रशा व ससंसा/विक्री केंद्र/ /२०२६** — **दि. / /२०२६**

**विक्री केंद्र, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथे जैविक खते व रोपे विक्रीस उपलब्ध आहेत..**

| अ.क्र. | विद्यापीठ उत्पादने | प्रमाण | किंमत |
|---|---|---|---|
| १ | झोटोबॅक्टर | ५०० मिली लिटर | १३५ |
| २ | रायझोबियम (तूर, मूग, उडीद) | ५०० मिली लिटर | १३५ |
| ३ | रायझोबियम (सोयाबीन) | ५०० मिली लिटर | १३५ |
| ४ | सिटोबॅक्टर | ५०० मिली लिटर | १३५ |
| ५ | स्फुरद (PSB) | ५०० मिली लिटर | १३५ |
| ६ | पालाश (KMB) | ५०० मिली लिटर | १३५ |
| ७ | ट्रायकोडर्मा | १ किलो | २०० |
| ८ | ट्रायकोडर्मा | ५०० ग्रॅम | ११० |
| ९ | कंपोष्ट कल्चर | ५०० ग्रॅम | ५० |
| १० | फुले सुपर बायोमिक्स | १ लिटर | ३०० |
| ११ | फुले मायक्रो ग्रेड II | ५ लिटर | १४१० |
| १२ | फुले मायक्रो ग्रेड II | १ लिटर | ३०० |
| १३ | आंबा (केशर) | प्रती नग | ९० |
| १४ | लिंबु (फुले सरबती) | प्रती नग | ४० |
| १५ | डाळिंब (सुपर भगवा) | प्रती नग | ३० |
| १६ | सीताफळ (पुरंदर) | प्रती नग | ६० |

सदर विद्यापीठ उत्पादने विक्री केंद्र, विभागीय कृषि संशोधन केंद्र, कृषकभवन दयानंद महाविद्यालय जवळ सोलापूर येथे मिळतील.

**संपर्क**
**डॉ. पी.के. पवार । मो.नं.: ९५११६२५०१०** **श्री. ए.पी. हिंगाडे । मो.नं.: ९४०३०००९६०**
**श्री. व्ही.डी. सोनवणे । मो.नं.: ९७६४५२४३४२**

तुमचे हक्क,
आमची लढाई!
अनुभवी • समर्पित • परिणामकारक बचाव
कायद्याची उत्तम जाण, न्यायासाठी अटूट बांधिलकी!
आमच्या सेवा
ॲड. कुलदीप संजय क्षीरसागर
क्रिमिनल लॉयर
सल्लामसलतीसाठी आजच संपर्क करा
9657693995
8208902214
न्याय हा अधिकार आहे, कृपा नाही!

ॲड. विक्रम प्रभाकर जाधव
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी
मो. ९४२३८३७७७७
ऑफिस पत्ता : व्हानकळस प्लॉट, अलीपुर रोड, बार्शी.

ॲड. रोहित राजेंद्र घोडके
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी
मो. ९८८१८४१५९५
ऑफिस पत्ता : वैराग नगरपंचायत जवळ, वैराग.

ॲड. एस. एम. गुंड (लाडोळेकर)
मो. ९८२२१७८३१३

ॲड. ए. एम. गुंड (लाडोळेकर)
मो. ७८८७८८६००१

'सदानंद' ७३०/२/३७, कासारवाडी रोड, बार्शी.

बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी संचलित खालील शाखांतर्फे
दैं. सोलापूर तरुण भारतच्या ४२ व्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
१) सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, बार्शी.
२) नवीन मराठी शाळा, बार्शी.
३) श्रीमती मंगलाताई सुलाखे शिशुविहार, बार्शी.
४) सुलाखे इंग्लिश मिडियम स्कूल, बार्शी.
५) सुलाखे इंग्लिश मिडीयम प्री प्रायमरी स्कूल, बार्शी.
६) सुलाखे कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बार्शी.
७) सुलाखे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, बार्शी.
शुभेच्छुक
बार्शी एज्युकेशन सोसायटी बार्शीचे - अध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त, सर्व मुख्याध्यापक
सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर वृंद

इ. ८ वी १७३ विद्यार्थी पात्र
इ. ५ वी २७७ विद्यार्थी पात्र
यावर्षीही-शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश विद्यालय बार्शीचा राज्यात डंका
Foundation Course + शिष्यवृत्तीचा अभ्यास तरीही ११८ शिष्यवृत्तीधारक
४०० विद्यार्थी पात्र
राज्याचे गुणवत्ता यादीतील ८ यशवंत
इ. ४ थी व इ. ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेतही सुयश विद्यालय, बार्शी.
महाराष्ट्रात नं.१
३२५ विद्यार्थी पात्र
इ. ४ थी चे २०३ विद्यार्थी पात्र






इ. ७ वी चे १२२ विद्यार्थी पात्र






सर्वच यशवंताचे हार्दिक अभिनंदन...!
म्हणूनच आम्ही म्हणतो... होय ! आम्ही अधिकारीच घडवितो !

107 कोटीच्या ठेवी
Reg. No. MSCS/CR/1188/2015
ISO 9001:2015
IFSC CODE : ICIC0000104
दैं. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

| ठेवींवर आकर्षक व्याजदर | |
|---|---|
| १ ते ३ महिने | 6% |
| ३ महिने ते ६ महिने | 7% |
| ६ महिने ते १२ महिने | 8% |
| १३ महिने ते २ वर्ष | 9% |
| २ वर्षापुढे | 10% |
| ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक इ. | 0.50% |
| आवर्तक ठेव (१ वर्ष) | 9% |
| सेव्हींग्ज ठेव | 3% |

दामदुप्पट ठेव ७२ महिने

• बँको Blue Ribbon
• FMCCS पुरस्कार
• सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार
अल्पावधीतच विश्वासास पात्र ठरलेली संस्था...
पिग्मी ठेव ग्राहकांसाठी दैनंदिन शिल्लक रकमेची SMS सेवा देणारी एकमेव संस्था
नवीन शाखा मंजूरी : मुंबई, पुणे, छ.संभाजीनगर, पंढरपूर, धाराशिव, तुळजापूर, विजापूर

उपलब्ध सुविधा
✻ मासिक व्याज प्राप्ती योजना
✻ एस.एम.एस. बँकिंग सुविधा
✻ सर्व प्रकारचे तारण कर्ज
✻ RTGS & NEFT सुविधा.
✻ QR CODE सुविधा.
One Stop Banking, Non-stop Service

श्री भगवंत मल्टीस्टेट
क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी.
मुख्य कार्यालय : निकीता हॉटेल शेजारी, कुर्डूवाडी रोड, पाटील प्लॉट, बार्शी.
Mob.08805375959, E-mail: sbmbarshi@gmail.com
मुख्य शाखा : बार्शी Mob. 9881926296 | पांगरी Mo. 8380805959 | वैराग Mo. 8805325959 | परांडा Mo. 9552065959 | केशवनगर-पुणे Mo. 8805245959
श्री. संतोष रावसाहेब ठोंबरे चेअरमन
संचालक मंडळ
श्री. शहाजी हरिदास फुरडे-पाटील व्हा.चेअरमन | श्री. प्रदीप सुभाष ओसेकर सचिव | श्री. विलास कृष्णा निंबाळकर संचालक
श्री. आबासाहेब विष्णू लोंढे संचालक | प्रा. सतिश दिनकरराव देवकर संचालक | सौ. कविता यशवंत भालके संचालिका
सौ. सविता अविनाश सोलवट संचालिका | सौ. माधुरी संतोष ठोंबरे संचालिका | श्री. मिलिंद सिद्राम कांबळे मुख्य कार्यकारी अधिकारी





दैनिक तरुण भारत, सोलापूर वर्धापन दिन शुभेच्छा !
कै. डॉ. बी. एम. नेने संस्थापक चेअरमन
नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी
कॅन्सर निदान व उपचार एकाच छताखाली उपलब्ध..
सन १९८१ पासून कॅन्सरवरील जागतिक पातळीवरील संशोधन (WHO/IARC) व उपचारासाठी अग्रणी संस्था म्हणून देश विदेशात सुपरिचित
महात्मा ज्योतीराव फुले जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत पिवळे, केसरी, पांढरे रेशन कार्ड व आयुष्मान भारत कार्ड धारकांना कॅन्सर वरील उपचार (ऑपरेशन, केमोथेरपी, रेडिएशन) मोफत मिळतील.
टाटा मेमोरियल सेंटर मुंबई मान्यता प्राप्त ग्रामीण कर्करोग प्रकल्प केंद्र
उपलब्ध सुविधा
• कर्करोगाचे अचूक निदान व उपचाराच्या सुयोग्य नियोजनासाठी उपयुक्त असणारी अद्ययावत पेट सी.टी. स्कॅन सुविधा
• अत्याधुनिक रेडिएशन मशीन, सिटी स्कॅन, सोनोग्राफी, मॅमोग्राफी, डिजिटल X-ray
• निदान चाचणीसाठीच्या अद्ययावत प्रयोगशाळा.
• तज्ञ डॉक्टर्स व कुशल मनुष्यबळ,
• २४x७ वैद्यकीय सेवा उपलब्ध
धर्मादाय रुग्ण निधी (I.P.F.) अंतर्गत निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत अथवा ५०% सवलतीच्या दरात उपचाराची सुविधा उपलब्ध.
तज्ञ व अनुभवी डॉक्टर्स
अत्याधुनिक रेडिएशन उपचार
3DCRT, IMRT, VMAT उपलब्ध
पेट स्कॅन सुविधा उपलब्ध

## ▶▶ महत्वाचे...

### चिरागअली मैदानात तरुणाची आत्महत्येची धडपड

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

दयानंद कॉलेज परिसरातील चिरागअली मैदानात ओंकार अरविंद मुसळे (वय २२ रा.एकता नगर) याने विषारी द्रव्य पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. काल मंगळवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. त्याला उपचारासाठी वैभव मुसळे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. जोडभावी पेठ पोलिसात याची नोंद झाली आहे.

### वळसंग टोल नाक्याजवळ अपघात; तिघे जखमी

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

वेगाने जाणारी रिक्षा रस्ता दुभाजकाला धडकल्याने तिघेजण जखमी झाले. हा अपघात सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील वळसंग टोल नाक्याजवळ आज बुधवारी सकाळच्या सुमारास घडला. समीर समद कुरेशी (वय ४०), साहिल महबूब शेख (वय २०) आणि दिशान इसाक शेख (वय २१, सर्व रा. साखरपेठ सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ते तिघेजण रिक्षात बसून वळसंगकडे निघाले होते. सकाळी ६ वाजेच्या सुमारास टोल नाक्याजवळील रस्ता दुभाजकाला रिक्षा धडकल्याने तिघेजण जखमी झाले. तालुका पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.

### कुंभारी जवळ मोटारीच्या धडकेने दुचाकी चालक जखमी

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

अक्कलकोट मार्गावरील कुंभारी जवळ मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील हमीद अलीभाई शेख (वय २६ रा.रामपूर ता. दक्षिण सोलापूर) हा तरुण गंभीर जखमी झाला.




हा अपघात काल मंगळवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास कुंभारी येथील त्रिनेत्र हॉटेल जवळ घडला. त्याला ॲम्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो दुचाकी वरून सोलापूर ते रामपूरच्या दिशेने निघाला होता. तालुका पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.

### होटगी रेल्वे स्थानकाजवळ प्रवासी जखमी

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

रेल्वेच्या बोगीत दरवाजाजवळ बसून प्रवास करीत असताना सिमेंट प्लॅटफॉर्मचा मार लागल्याने तरुण जखमी झाला. ही घटना काल मंगळवारी रात्रीच्या सुमारास होटगी रेल्वे स्थानकाजवळ घडली. नितीन विठ्ठल गायकवाड (वय २१ रा. विजापूरनाका झोपडपट्टी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो हुसेनसागर एक्सप्रेसच्या बोगीत दरवाजात बसून सोलापूरच्या दिशेने येत होता. होटगी रेल्वे स्थानकाजवळ उजव्या पायाला प्लॅटफॉर्म घासल्याने तो जखमी झाला. लोहमार्ग पोलिसात याची नोंद झाली आहे.

# पंढरपूर शहरावर पुन्हा एकदा पुराचे सावट



पंढरपूर : उजनी आणि वीर धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे येथील चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. बुधवारी टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : उमेश टोमके, पंढरपूर)

### प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ ऑगस्ट-**

पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर आणि भीमा खोऱ्यात झालेल्या दमदार पावसामुळे उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी उशिरा रात्री उजनी धरणातून भीमा नदीपात्रात सुमारे १ लाख १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूर शहरासह नदीकाठच्या गावांवर पुन्हा एकदा पुराचे सावट निर्माण झाले असून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

उजनी धरणात वाढलेल्या पाण्याच्या आवकेमुळे पुढील काही तासांत चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पंढरपूर शहरातील सखल भागांतील नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. परिस्थिती गंभीर झाल्यास यापूर्वीप्रमाणे सुमारे १०० कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

पुणे जिल्ह्यातील मावळ परिसरासह भीमा खोऱ्यात मुसळधार पाऊस झाल्याने खडकवासला, चासकमान तसेच इतर धरणांतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या पाण्याची आवक उजनी धरणात वाढल्याने व्यवस्थापनानेही नदीपात्रात विसर्ग वाढविला आहे.

दरम्यान, पंढरपूर शहरातील व्यास नारायण झोपडपट्टी, अंबाबाई झोपडपट्टी तसेच गोपाळपूर-जुनापूल परिसरातील सखल भाग पाण्याखाली जाण्याची शक्यता लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. नदीकाठच्या गावांनाही खबरदारीचा इशारा देण्यात आला असून आवश्यकतेनुसार सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यास तयार राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.उजनी धरणातून भीमा नदीपात्रात १ लाख १० हजार क्युसेकचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या विसर्गामुळे पंढरपूरसह नदीकाठच्या गावांवर पुराचे सावट निर्माण झाले असून, प्रशासन सतर्क झाले आहे. खडकवासला आणि चासकमान धरणातून होणाऱ्या आवकेमुळे चंद्रभागेची पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. पूरस्थितीचा सामना करण्यासाठी एनडीआरएफ आणि स्थानिक रेस्क्यू टीम हाय अलर्टवर असून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**स्नानासाठी जाण्यास मज्जाव**

चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत वाढ होत असल्याने भाविकांनी नदीपात्रात किंवा घाटांवर स्नानासाठी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी प्रमुख घाटांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नदीकाठच्या परिसरावर महसूल, नगरपालिका, आपत्ती व्यवस्थापन आणि पोलीस प्रशासनाकडून सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

**अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**

प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, नदीकाठच्या भागातील नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व जीवनावश्यक साहित्य सुरक्षित ठेवण्यासह प्रशासनाच्या सूचनांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कामगारपुत्र कुमार करजगी यांनी पाळला शब्द

### जुनी मिल कामगार वारसदार संस्थेच्या ताब्यात देणार ३० कोटींची जागा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

जुनी मिल बेकार कामगार वारसदार कल्याणकारी संस्थेला शहराच्या मध्यवर्ती भागातील धरमशी लाईन येथील सुमारे २५ ते ३० कोटी रुपयांची जागा हस्तांतरित करण्यात येणार आहे. कामगारपुत्र कुमार करजगी यांनी ३५ वर्षांच्या संघर्षानंतर कामगारांना दिलेला शब्द पाळला आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष विद्या माने आणि सचिव मधुकर कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सन १९६३ मध्ये जुनी मिल बंद झाल्यानंतर हजारो कामगारांवर अन्याय झाला. त्यानंतर ९ ऑगस्ट १९८८ रोजी जनहित संघर्ष समितीची स्थापना करून न्यायालयीन व लोकशाही मार्गाने लढा सुरू करण्यात आला. दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेनंतर नागरिकांना त्यांच्या हक्काचे प्लॉट मिळाले. तसेच २५ जुलै २०२६ रोजी संस्थेच्या नावावर २५ ते ३० कोटी रुपयांची जागा अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आली. करजगी यांनी दिनांक २३ मे २०२४ रोजी या संस्थेस जागा देण्याचे मान्य करून तसे पत्रही दिले होते. दरम्यान, प्लॉटसाठी नागरिकांकडून कोणतीही रोख रक्कम घेतली नसतानाही कुमार करजगी यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र सर्व अडथळ्यांवर मात करून हा लढा यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सिद्राम ढोबळे, रजनिकांत इंगळे, पल्लवी सुरवसे, अमोल रणशृंगारे, अजय मस्के आदी उपस्थित होते.

## संपादक प्रशांत माने लिखित ‘लोकाभिमुख पत्रकारिता’ पुस्तकाचा सोलापूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

### * सोलापूर दै.‘तरुण भारत’च्या शिरपेचात मानाचा तुरा
### * पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तक ठरणार उपयुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने लिखित लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तकाचा समावेश पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने यंदाच्या वर्षापासून पत्रकारिता कोर्सच्या अभ्यासक्रमात केला आहे. पत्रकारितेत नव्याने येऊ इच्छिणारे विद्यार्थी आणि पत्रकारितेत असलेल्यांसाठी लोकाभिमुख पत्रकारिता हे पुस्तक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरणार आहे.




सोलापूर : दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने लिखित लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तकाचा सोलापूर विद्यापीठाने पत्रकारिता अभ्यासक्रमात समावेश केल्याचे पत्र प्रशांत माने यांना देताना सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा. यावेळी वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, विद्यापीठाचे लिपीक मंगेश कुलकर्णी.

सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र.कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि विद्यापीठ अभ्यासक्रम समिती यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत माने लिखित लोकाभिमुख पत्रकारिता हे पुस्तक पत्रकारिता कोर्सच्या अभ्यासक्रमात सन २०२६-२७ पासून संदर्भ ग्रंथ म्हणून समाविष्ठ करण्यात आले आहे. संपादक-लेखक प्रशांत माने यांनी आपल्या पत्रकारितेतील तीस वर्षांच्या अनुभवावर आधारित लोकाभिमुख पत्रकारिता हे पुस्तक लिहिलेले असून नुकतेच गतवर्षी जून महिन्यात या पुस्काचे प्रकाशन झालेले आहे. पत्रकारितेत नव्याने येऊ इच्छिणाऱ्या आणि पत्रकारिता अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी लोकाभिमुख पत्रकारिता हे पुस्तक खूपच उपयुक्त ठरणार आहे. कारण या पुस्तकात पत्रकारिता कशी करावी, पत्रकारिते समोरील आव्हाने आणि बातम्या कशा लिहाव्यात तसेच बातम्यांचे विषय काय असावेत, यासंदर्भात सहउदारण लेख प्रसिध्द केलेले आहेत. शोध पत्रकरिता कशी करावी यासह पत्रकारिता करताना कोणती पथ्ये पाळावित याबद्दलच्या महत्वपूर्ण टिप्स या पुस्तकात आहेत. पत्रकारिता करीत असताना तळागाळातील समस्या, ग्रामीण भागातील समस्या, भष्टाचाराची प्रकरणे, संवेदनशील आणि मानवीय स्टोरीज कशा कराव्यात याबाबतही मार्गदर्शन आहे.

समाजातील प्रत्येक घटकांशी पत्रकारांचे सलोख्याचे संबंध असावेत हे सहचित्र या लोकाभिमुख पत्रकारिता पुस्तकात देण्यात आले आहे. पत्रकारितेचा कोर्स करणारे विद्यार्थी आणि समाजातील प्रत्येक घटकांना उपयुक्त ठरेल असे हे पुस्तक सर्वांसाठी उपलब्ध असणार असल्याचे आवाहन तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले असून विद्यापीठाचे कुलगुरु, प्र. कुलगुरु यांचे प्रशांत माने यांनी आभार मानले आहेत.

SINHGAD INSTITUTES
सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
एन बी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
केगांव - सोलापूर
A NAAC CGPA 3.15 / 4.00
Approved by AICTE, New Delhi, Recongnised by DTE (M S) and Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur



प्रा. एम. एन. नवले
संस्थापक - अध्यक्ष

ENGINEERING ADMISSIONS
For First Year & Direct Second Year B. Tech. Programs in AY 2026-27
M.Tech. (Civil Engineering-Structural) & Recognised Ph.D. Centre in Civil Engineering
DTE CODE EN 6640
Applications are invited from eligible candidates for admissions under probable Vacant Seats against CAP & IL Quota

राष्ट्रीय स्तरावरील अनेक मानांकने प्राप्त महाविद्यालय
- सोलापूर विद्यापीठाकडून 'A++' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (91.66%)
- नॅक कडून 'A' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (CGPA 3.15/4)
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व AICTE कडून ARIIA मानांकन
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन (SIH) या राष्ट्रीय स्पर्धेत सलग 2 वर्ष ₹ 1 लाखाचे प्रथम पारितोषिक
- CAREERS360 कडून 'AA+' Grade सहित India's Best Engineering Institutes 2026 म्हणून मानांकन
- उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार 2024
- उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार 2023
- उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार 2023
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व Innovation Cell कडून 5 पैकी 4.5 स्टार मानांकन
- Intelliswift कंपनी तर्फे Innovate स्पर्धेत प्रथम पारितोषिक

Think Placement... Think Sinhgad

Excellent Placement Record

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Highest Package in LPA | 18.55 | Students with Package of 7+ LPA | 28 | Students Placed in Core Industries | 126 |
| Average Package in LPA | 4.5 | Students with Package of 5+ LPA | 37 | Students Placed in IT Industries | 117 |
| Total Students Placed | 243 | Students with Package of 4+ LPA | 178 | Entrepreneurs and Higher Studies | 31 |

अभियांत्रिकीच्या उज्वल करिअर साठी संधीचे प्रवेशद्वार “सिंहगड सोलापूर”

| Sr.No. | Name of the Course | Program Code | Intake |
|---|---|---|---|
| 1 | B.Tech. (Civil Engineering) | 664019110 | 60 |
| 2 | B.Tech. (Computer Science & Engg) | 664024210 | 60 |
| 3 | B.Tech. (Electrical Engineering) | 664029310 | 60 |
| 4 | B.Tech. (E & TC Engineering) | 664037210 | 60 |
| 5 | B.Tech. (Mechanical Engineering) | 664061210 | 120 |
| 6 | M.Tech. (Civil Engineering-Structural) | 664021210 | 18 |

NEP नुसार AI-DS, EV या सारख्या विषयात Minor Degree घेण्याची संधी...
विविध सेंटर्सवर मोफत ऑप्शन फॉर्म भरण्याची व मार्गदर्शनाची सोय उपलब्ध.
Contacts for Admission : 97303 93182, 83800 25624, 70209 96697, 83800 25630

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१५२४

**योगासिध्दीसार । त्यांसि वाटे ते असार ।**

स्वत:ला सुख मिळावे, इंद्रियांचे लळे पुरविले जावेत, इतरांवर थोड्याफार प्रमाणात का होईना पण सत्ता गाजवता यावी, इतरांपेक्षा आपण मोठे व्हावेत यासाठी जवळपास सर्वांचीच धडपड चालू असते. अनेकजण तर यासाठी वाट्टेल त्या अयोग्य मार्गाचा अवलंब करतात. मी म्हणजे सर्वस्व म्हणण्याने किंवा देहाभिमान बाळगल्याने माणसाला देहाचा व स्वचा खरा परिचय होत नाही. स्वचा परिचय होणे अवघड असले तरी देहाचा परिचय होणे अवघड नाही. हा देह नाशवंत आहे व तो काळाच्या स्वाधीन आहे. एवढे जरी देहाच्या अनुषंगाने समजले तरी बरेच प्रश्न आपोआप मिटतील. अर्थात देहाचे, इंद्रियाचे लळे पुरविण्यासाठी नको ते मार्ग अवलंबावे वाटणार नाहीत.



असे नको ते मार्ग न अवलंबिणे म्हणजेच कळत न कळत माया, मोह, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आदितून मुक्त होणे होय. ज्याला या सर्वांपासून मुक्ती मिळिवता आली, त्याला लहान-सहान गोष्टी तर सोडाच पण योग, ऋध्दी, सिध्दीचेही कांही वाटत नाही. अर्थात, त्याच्याकडे कशाचाही मोह शिल्लक राहत नाही. याअनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**योगसिध्दीसार । त्यांसि वाटे ते असार ।**

मी असा, मी तसा, मी हे केले, मी ते केले, मी असे करेन, मी तसे करेन म्हणणाऱ्या या जीवाला ऋध्दी-सिध्दी असार वाटणे अत्यंत अवघड आहे. प्रामुख्याने जास्तीत जास्त लोक स्वत:ला कांही तरी मिळावे म्हणून धडपडत असतात. कांही मिळत नसले तर किमान लोकांनी आपणाला मोठा, शहाणा म्हणावे एवढी तरी लोक अपेक्षा करतात. सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक यापैकी कोणतेही क्षेत्र असो या क्षेत्रात कांही तरी प्राप्त व्हावे म्हणून शिरकाव केलेल्यांची संख्या जास्त असल्याचे आपणाला पाहायला मिळते. वरुन वरून एखादा निस्वार्थ सेवा केल्याचे दाखवत असला तरी त्याचे खरे रुप कालांतराने का होईना पण इतरांच्या लक्षात येतेच. कांही दिवसांपूर्वीची घटना आहे. मी कार्यालयातून घरी निघण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात आमच्या नजरेतील एक चांगला निस्वार्थ समाजसेवक माझ्या कक्षात आला. त्यांच्या चेहऱ्यावरची नाराजी पाहून मी त्यांना विचारले, का हो नाराज वाटता. मागचा पुढचा विचार न करता झटकन तो उत्तरला, साहेब बारा वर्षापासून कोणत्याही पदाची अपेक्षा न करता मी वरीष्ठ सांगतील ती सेवा करीत आहे. पण यावेळी सुध्दा आमच्या पक्षाने मला साध्या एखाद्या समीतीवरही घेतले नाही. त्याचे उत्तर ऐकून माझ्या मनात मिश्कील विचार आला की, याने स्वार्थापोटी अशी सेवा करण्यापेक्षा बारा वर्ष आपली संसारीक जबाबदारी पार पाडीत तपश्चर्या, नामस्मरण केले असते तर याला कांही प्रमाणात का होईना ऋध्दी-सिध्दी प्राप्त झाली असती, समाधान लाभले असते.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार,**
**दि. ६ ऑगस्ट २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. अष्टमी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- भरणी (२०.१३)**
**योग - गंड (१५.००)**
**करण - तैतिल (२९.४७)**
**राहू काल : गुरुवार**
**स. ०१.३० ते ०३.००**

**दिनविशेष :१९४५: दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेने जपानमधील 'हिरोशिमा' शहरावर 'लिटिल बॉय' नावाचा पहिला अणुबॉम्ब टाकला.१९१४: पहिल्या महायुद्धादरम्यान सर्बियाने जर्मनीविरुद्ध आणि ऑस्ट्रियाने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.२०१०: भारताच्या जम्मू आणि काश्मीरमधील लडाख भागात ढगफुटी होऊन भयानक पूर आला होता.**

# पिलीवमध्ये मरिमातेच्या यात्रेला अलोट गर्दी

### भक्तिमय वातावरण; पारंपरिक पध्दतीने महानैवेद्य




**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ ऑगस्ट-**

सालाबादप्रमाणे याही वर्षी माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ग्रामस्थांच्या वतीने गावदेवी मरमातेची यात्रा भक्तीमय वातावरणात साजरी झाली. जत्रेला गवातील, बाहेरगावात गेलेले व पंचक्रोशीतील भाविकांनी अलोट गर्दी केली होती.

गावात रोगराई येऊ नये भरपूर पाऊस पडावा सर्वसामान्य माणूस सुखी राहावा संकट मुक्त राहावा म्हणून म्हणून श्री मरीमाता देवीस ग्रामस्थांच्या वतीने अजाबळी देऊन महानैवेद्याचे वाटप ही करण्यात आले. श्री मरीमाता देवीचे भक्त, सुवासिनी, पोतराजाच्या सहभागाने गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. गावातील सर्व देव देवतांस, आरती करून सुख-समृद्धी, रोगराई मुक्तीसाठी सर्व देवतास साकडे घातले. संपूर्ण गावातून मिरवणूक काढून गावाला प्रदक्षिणा घालण्यात आली. त्यानंतर जागृत देवस्थान असलेल्या बाजार तळावरील श्री मरी माता देवीस भक्तांच्या, ग्रामस्थांच्या वतीने पूजा करुन आठखूरी मेंढीचा अजाबळी दिला. देवीची आरती करून गावजत्रेस प्रारंभ करण्यात आला

श्री मरीमाता देवस्थान समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रमाणे उपस्थित बालक, महिला व ग्रामस्थांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जत्रेसाठी समितीचे शंकर उर्फ गुदा काळे, किशोर लोखंडे, सुनील काळे, महेश वाघमारे, हरि लोखंडे, दशरथ काळे, प्रवीण भांडेकर, हरि खुर्द पाटील, सुशील करडे, विजय कुंभार, लखन जरग, लखन काळे राजू काळे यांनी परिश्रम घेतले.

गजी ढोल संघांकडून आकर्षक गजीढोल सादरीकरण

दिवसभर परिसरातील गावातील गजी ढोल संघांनी आकर्षक असा गजी ढोलाचा खेळ सादर केला. त्याचप्रमाणे दिवसभर देवीची गाणी, सुवासिनीना भोजन, तसेच गावातील ग्रामस्थांनी भक्तांनी देवीस नैवेद्य नारळ, कोंबडे, बकरी यांचा बळी देऊन भक्तिमय वातावरणात गाव जत्रा साजरी करण्यात आली.

# मलबार गोल्ड अँड डायमंड्समध्ये ६ ते ९ ऑगस्टदरम्यान आर्टिस्ट्री शो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

शहरातील मलबार गोल्ड अँड डायमंड्स येथे ६ ते ९ ऑगस्टदरम्यान हा चार दिवसीय 'आर्टिस्ट्री शो' होणार असून, दुप्पट स्टॉक, आकर्षक ऑफर्स आणि विविध उपक्रमांमुळे ग्राहकांसाठी ही पर्वणी ठरणार असल्याची माहिती स्टोअर डायरेक्टर वैष्णव यूएस यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**दुप्पट स्टॉक, आकर्षक ऑफर्स; खरेदीवर फ्री मेकअप, मेहेंदी, नेल आर्ट आणि लकी ड्रॉचे आयोजन**

शोदरम्यान खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला मोफत मेहेंदी आर्ट, मेकअप सेशन, नेल आर्ट आणि फोटोशूटची सुविधा दिली जाणार आहे. याशिवाय, आर्दा मॉलच्या क्लोदिंग ब्रँडचे नवीन वेस्टर्न आणि ट्रेडिशनल कलेक्शन, ट्रायल्स आणि विशेष सवलतीही ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहेत. ग्राहकांसाठी दागिन्यांवरही आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. चांदीचे दागिने १,५०० रुपयांपासून, सोन्याच्या दागिन्यांवरील मेकिंग चार्जेस ७.९ टक्क्यांपासून, तर हिऱ्यांच्या दागिन्यांची खरेदी १८ हजार रुपयांपासून करता येणार आहे. शोमध्ये ग्राहकांसाठी १ लाख १० हजार रुपयांच्या लकी ड्रॉ गिफ्ट काड्र्स देण्यात येणार आहेत. तसेच आर्दा मॉलतर्फे स्वतंत्र लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले असून, ऑनलाइन लकी ड्रॉद्वारे निवडलेल्या विजेत्यांना फ्री नेल आर्ट आणि फुल ब्रायडल मेकअप जिंकण्याची संधी मिळणार आहे. या पत्रकार परिषदेला उपव्यवस्थापक सागर जक्का, सचिन पाटोळे, सहाय्यक विक्री व्यवस्थापक अनुराधा हाडपड, अर्चना काशेट्टी आदी उपस्थित होते.

# विश्वशांती गुरुकुलमध्ये माईर्स एमआयटीचा स्थापना दिन साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये 'माईर्स' संस्थेचा ४४ वा स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ. दा. कराड यांनी माईर्स एमआयटी शिक्षण समूहाची स्थापना ०५ ऑगस्ट १९८३ रोजी कोथरूड, पुणे येथे केली. आज या संस्थेचा वटवृक्ष शाळा, महाविद्यालये आणि पाच विद्यापीठांसह देशभरात विस्तारित झाला आहे. यावेळी संस्थेच्या चार दशकांहून अधिक काळाच्या गौरवशाली शैक्षणिक वाटचालीला उजाळा देणारा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला.

संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ. दा. कराड यांचे दूरदर्शी कार्य, संस्थेच्या प्रवासातील उल्लेखनीय टप्पे, विविध क्षेत्रांतील योगदान आणि भविष्यातील ध्येय यांचे प्रभावी दर्शन या माहितीपटातून घडले.

स्थापना दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सत्य, शिस्त, करुणा, उत्कृष्टता, नावीन्य, शांतता आणि समाजसेवा या जीवनमूल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेतली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका रूपाली हजारे यांनी एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा समृद्ध वारसा आणि मूल्याधारित शैक्षणिक परंपरेविषयी बोलताना ज्ञानासोबतच जबाबदार आणि संवेदनशील विद्यार्थी घडविण्याचे कार्य संस्था करत असल्याचे सांगितले. शाळेच्या समन्वयिका नमिता अथणीकर यांनी एमआयटी परिवारातील आपल्या अनुभवांना उजाळा देत शिस्त, समर्पण, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी हीच संस्थेची खरी ओळख असल्याचे सांगितले. यानंतर विद्यार्थी प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त करत संस्थापक, व्यवस्थापन, शिक्षक आणि पालक यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# बेडा जंगम, बुडगा जंगम, माला जंगम समाजावरील आक्षेपार्ह विधानांचा निषेध

### न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

बेडा जंगम, बुडगा जंगम आणि माला जंगम समाजाबाबत सोशल मीडियावर व काही दैनिकांत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह विधानांचा तीव्र निषेध करत, संबंधितांवर कारवाई करावी तसेच अनुसूचित जातीतील या समाजाला जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणीसाठी प्रशासनाकडून होणारा त्रास तातडीने थांबवावा, अशी मागणी बेडा जंगम, बुडगा जंगम , माला जंगम समाजाचे अध्यक्ष राजशेखर कंदलगांवकर यांनी पत्रकार परिषदेत केली.

बेडा जंगम, बुडगा जंगम व माला जंगम समाजाचा समावेश स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनुसूचित जातीमध्ये असून त्यासंदर्भातील ऐतिहासिक व शासकीय पुरावे उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात जन्मापासून ते अंत्यसंस्कारापर्यंत विविध समाजांच्या धार्मिक विधींची जबाबदारी हा समाज पारंपरिक पद्धतीने पार पाडत आला आहे. समाजातील नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र मिळिवण्यासाठी वारंवार कागदपत्रे, शाळेचे मूळ रजिस्टर, स्थानिक चौकशी आणि विविध स्तरांवरील पडताळणीला सामोरे जावे लागते. जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणीसाठी एकाच व्यक्तीला दोन ते तीन वेळा तपासणी प्रक्रियेतून जावे लागत असून ही प्रक्रिया अत्यंत जाचक असल्याचा आरोप त्यांनी केला. समाजाबाबत चुकीची माहिती पसरवून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करावी, तसेच न्यायालयीन आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करून बेडा जंगम, बुडगा जंगम आणि माला जंगम समाजातील पात्र नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी सुलभपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी कंदलगांवकर यांनी केली. या पत्रकार परिषदेस श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, सातलिंग स्वामी, शिवकुमार स्वामी, सुप्रिया स्वामी उपस्थित होते.

# फॅबटेकचा जगदीश खताळ गायन स्पर्धेत द्वितीय



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.५ ऑगस्ट-**

अखिल भारतीय गंधर्व संगीत महाविद्यालय मंडळातर्फे आयोजित गायन परीक्षेत फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज, सांगोला मधील विद्यार्थी जगदीश खताळ याने द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याला संगीत शिक्षक प्रसाद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्राचार्य सिकंदर पाटील, सारीका रूपनर यांनी जगदीश खताळचे अभिनंदन केले.

# पंढरीत मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा वाढदिवस सामाजिक कार्यक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे यांचा वाढदिवस सोमवारी विविध सामाजिक उपक्रम आणि विकासकामांच्या शुभारंभाने उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर असलेले दिलीप धोत्रे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्तही वैयक्तिक सत्कारापेक्षा विकासकामांना प्राधान्य देत सामाजिक बांधिलकी जपल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दिलीप धोत्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १७ मधील विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. शिवसेना नेते अनिल सावंत, नगराध्यक्ष प्रणिता भालके तसेच तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे गटनेते नागेश भोसले यांच्या हस्ते या विकासकामांचा शुभारंभ झाला.

यावेळी माजी नगरसेवक नागेश यादव, किरणराज घाडगे, आदित्य फत्तेपुरकर, नगरसेवक लोकेश यादव, नगरसेवक प्रसाद कळसे, नगरसेवक ओंकार जोशी उपस्थित होते. मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत धोत्रे यांच्या समर्थकांनी गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात वयोवृद्ध नागरिकांना भोजनदानाचा उपक्रम राबविला. याशिवाय शहरातील विविध भागातही सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी दिवसभर दिलीप धोत्रे यांच्या पंढरपूर येथील संपर्क कार्यालयात त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विकासकामांचा शुभारंभ, सामाजिक उपक्रम आणि नागरिकांशी सातत्याने ठेवलेला संपर्क यामुळे दिलीप धोत्रे यांचा वाढदिवस यंदा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता समाजाभिमुख आणि विकासाभिमुख उपक्रमांनी साजरा झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## परमार्थाशिवाय जीवन निरर्थक




'बुद्धिमान तोच आहे जो असे कार्य करतो ज्यामुळे संसाराचे कल्याण होते आणि स्वतः चे दुःख दूर होऊन फलप्राप्ती होते,'' असे प्रतिपादन १०८ मुनी श्री सुप्रभ सागरजी महाराज यांनी केले. श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्टच्या श्री महावीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित अमृत प्रवचनप्रसंगी ते बोलत होते.

प्रवचनात जैनेस्टिक सायन्सवर प्रकाश टाकत मुनीश्रींनी कर्मांचे महत्त्व सांगितले. ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय, आयु, गोत्र आणि अंतराय यांसह एकूण आठ कर्मे असून, त्यातील चार घाती कर्मे आत्म्याच्या मूळ गुणांचा घात करतात, असे त्यांनी स्पष्ट केले. मती व श्रुतज्ञान मनुष्याकडे, अवधी ज्ञान नारकीजीवांकडे, मनःपर्यय ज्ञान तीर्थंकरांकडे तर केवल ज्ञान भगवंतांकडे असते, असे त्यांनी नमूद केले. आयुष्यातील गुंतवणुकीबाबत बोलताना मुनीश्री म्हणाले की, लोक तात्कालिक लाभासाठी घरात मनी प्लांट लावतात, परंतु तो लवकर वाळतो. त्याऐवजी दीर्घकालीन फलित मिळण्यासाठी आंब्याचे झाड लावण्यासारखा दूरगामी विचार केला पाहिजे. आई जशी नऊ महिने बाळाला पोटात वाढवते, त्याप्रमाणे जीवनात धैर्य आवश्यक आहे. म्हातारपणी मुलगा सांभाळेल या अपेक्षेने गुंतवणूक करू नये. आजच्या जीवनशैलीमुळे मानवी बुद्धी बोन्साय झाडासारखी खुजी होत चालली आहे. आजचा तरुण शरीरसौष्ठवासाठी जिममध्ये जातो, मात्र त्याहून अधिक महत्त्वाचे मनाच्या विकासासाठी मंदिरात जाणे, देव-शास्त्र-गुरूंची पूजा करणे आहे, असे मुनीश्रींनी सांगितले. ''छोटी सोच, साईड इफेक्ट ज्यादा'' असा संदेश देत इतिहास साक्षी आहे की आपले नाव बाग फुलवण्यात आहे, आग लावण्यात नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक गोष्टीत केवळ आर्थिक नफा न बघता पुण्य (गुडविल) कमावण्यावर भर दिला पाहिजे. आयुष्याचा हिशोब करताना विवेकरुपी अमृत जागृत करण्याचा सल्ला मुनीश्रींनी दिला. सेवानिवृत्तीनंतरही सतत दुकानात बसून राहण्यापेक्षा काही वेळ मंदिरात जाऊन धर्मध्यान करावे. प्रसिद्धीच्या मागे न धावता वास्तवाचे भान ठेवावे. संपत्ती वाढली की आजारपणही वाढते, असा इशारा देत दुसऱ्याच्या पैशाने किंवा कर्ज काढून दानधर्म करू नका, ऋण काढून सण करू नका, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. शेवटी, ''आजची ऐश ही उद्या राख (भस्म) करणारी आहे,'' असे सांगत त्यांनी भौतिक सुखांमागील मृगजळापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

# कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोहाचे आयोजन

### ८ ते १७ ऑगस्टदरम्यान विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य सेनानी व सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे (अण्णा) यांच्या स्मृतिदिन (८ ऑगस्ट) व जयंती (१७ ऑगस्ट) निमित्त ८ ते १७ ऑगस्ट या कालावधीत विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ, श्री स्वामी समर्थ सहकारी सुतगिरणी (वळसंग), सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार, सिद्ध-संग प्रतिष्ठान आणि कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्मृती समारोह होणार आहे.

समारंभाची सुरुवात ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह येथे सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या गुणवंत सभासद पाल्यांच्या गौरव समारंभाने होणार आहे. चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार होणार असून ते करिअरविषयक मार्गदर्शनही करणार आहेत. ९ ऑगस्ट रोजी हुतात्मा स्मृती मंदिर परिसरात स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार, १२ बलुतेदार आणि श्रमजीवी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ साहित्यिक सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार असून आमदार सचिन कल्याणशेट्टी व आमदार देवेंद्र कोठे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. १० ते १७ ऑगस्टदरम्यान शालेय वक्तृत्व स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, भारतीय कालगणना, भूगोल, शिक्षण, पत्रकारिता आदी विषयांवरील व्याख्याने, विज्ञान व भूगोल शिक्षक परिषद, रक्तदान शिबिर, महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी, महिलांच्या आरोग्यावर विशेष व्याख्यान, शिवकालीन शस्त्र प्रशिक्षण व प्रदर्शन, १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता 'गीतबहार' सांस्कृतिक कार्यक्रम, आंतरशालेय चित्रकला स्पर्धा, स्वातंत्र्य दिन कार्यक्रम तसेच नव्या शालेय वर्गखोल्यांचे उद्घाटन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १७ ऑगस्ट रोजी सकाळी विविध स्पर्धांतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ होणार



असून त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार राहुल कुलकर्णी यांचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याच दिवशी दुपारी ४.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय सभागृह येथे स्मृती समारोहाचा सांगता समारंभ होणार आहे. कै. वि. गु. शिवदारे यांनी सहकार, शिक्षण, समाजसेवा आणि स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानाचा जागर या स्मृती समारोहातून केला जाणार असून नागरिकांनी विविध कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन नरेंद्र गंभीरे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत प्रकाश वाले, सुचेता थोबडे, डी. एस. सुत्रावे, बाळासाहेब मुस्तारे आदी उपस्थित होते.

## धनाची आसक्ती बाळगू नका




धन तुम्ही कितीही कमवा, नीतीने कमवा. धन कमावण्यास बंदी नाही परंतु धनाची आसक्ती बाळगू नका, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात ते बोलत होते. यावेळी श्रावकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, धनाचा सदुपयोग करा. धनाचा उपयोग दानधर्मासाठी करा. आपले धन सत्कर्मी लावा. जो धनसंचय करतो त्याला समाजात किंमत नसते तर जो धनाचा त्याग करतो, दानधर्म करतो त्याचा समाजात सन्मान असतो. आध्यात्मिक क्षेत्रात धनाला किंमत नाही. तर जो पैशाचा सदुपयोग करतो, त्याग करतो त्याला सन्मान आहे. भरपूर धनसंचय केलेला आहे. परंतु त्याच्याकडे दानाची प्रवृत्ती नसेल तर त्याला समाजात कोणीच विचारत नाहीत. धनापेक्षा आरोग्याला महत्त्व आहे. कोरोनामध्ये आपण याचा थरारक अनुभव घेतलेला आहे. आज-काल विवाह ठरविण्यापूर्वी मुलगी दाखविण्यापेक्षा पैसाअडका, सोने-चांदी,गाडीबंगला याचेच प्रदर्शन केले जाते. बरेचसे लग्न मुला मुलींची नव्हे तर पैशाशी केले जाते, लावले जाते. आसक्त होऊन जगण्यापेक्षा निरासक्त होऊन जगणे ही कला आहे. ही कला ज्याला अवगत होईल तोच खऱ्या अर्थाने जीवनाचा आनंद घेऊ शकतो. तुमच्याकडे पैसा आहे, मान्य आहे परंतु पैशाचा घमंड योग्य नव्हे. राजाचा रंक आणि रंकाचा राजा बनण्यास वेळ लागत नाही हे लक्षात ठेवा.

**- मल्लेश पुरवंत**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# प्रत्येक मुलाची होणार तपासणी, निदान, उपचार

## बालकांच्या आरोग्यासाठी जिल्हा परिषदेची मोहीम

### ११ ऑगस्टला ३९ बालकांवर मोफत हृदयशस्त्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील एकही बालक आरोग्य तपासणी, उपचार किंवा शस्त्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाला अधिक गती दिली आहे. केवळ आरोग्य तपासणी करून थांबायचे नाही, तर तपासणीत आढळलेल्या प्रत्येक आजारावर वेळेत उपचार होऊन आवश्यक शस्त्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हा परिषदेत झालेल्या आढावा बैठकीत आरोग्य, शिक्षण आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी विविध विभागांनी समन्वयाने काम करून प्रत्येक पात्र बालकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या. सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ५२ आरोग्य पथके कार्यरत आहेत. ही पथके अंगणवाडीतील ० ते ६ वर्षे तसेच शाळांमधील ७ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची नियमित आरोग्य तपासणी करत आहेत. तपासणीदरम्यान जन्मजात व्यंग, कुपोषण, शारीरिक व मानसिक विकासातील विलंब तसेच इतर गंभीर आजारांचे निदान करून संबंधित बालकांना तातडीने उपचारासाठी संदर्भित केले जात आहे.

बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जिल्हा शल्यचिकित्सक




> बालकांच्या आरोग्याची तपासणी ही केवळ औपचारिकता न राहता, प्रत्येक आजाराचे वेळेत निदान, उपचार आणि आवश्यक शस्त्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करावा. एकही बालक उपचारांपासून वंचित राहणार नाही, याची खात्री करणे हीच खरी जबाबदारी आहे.
>
> **- कुशल जैन,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.

डॉ. वर्षा डोईफोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अधीक्षक मयुर पाटील उपस्थित होते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या ३९ बालकांची ओळख पटली असून, त्यांच्या ११ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मोफत हृदयशस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

**७२ हजार ७७ विद्यार्थ्यांची तपासणी**

जून-जुलै २०२६ अखेरच्या आकडेवारीनुसार, अंगणवाडीतील २ लाख ६९ हजार ५१६ बालकांच्या उद्दिष्टापैकी १ लाख ९९ हजार ६४४ बालकांची आरोग्य तपासणी पूर्ण झाली आहे. एप्रिल २०२६ पासून आतापर्यंत शाळांमधील ७२ हजार ७७ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे.

## महत्वाचे...



## वळसंग जिल्हा परिषद शाळेला माजी विद्यार्थ्याकडून साऊंड सिस्टीम

**वळसंग, दि. ५ ऑगस्ट-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणात मदत व्हावी या उद्देशाने, शाळेचे माजी विद्यार्थी अ‍ॅड. बसवराज शिवलिंगप्पा कोडले आणि कोडले परिवारातर्फे शाळेला आधुनिक साऊंड सिस्टीम भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन वळसंग येथील कन्नड शाळेत केले होते. याप्रसंगी वळसंगचे माजी उपसरपंच स्वामीनाथ कोडले, उपसरपंच समीर कटरे, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, शालम आमलीचुंगे, सर्वांग कोडले, सिद्धाराम तिपरादी, बसवराज किणगी, आकाश बशेट्टी, मल्लिनाथ ढब्बे, कुंभार, सिद्धाराम वाघमारे, पत्रकार कल्लय्या स्वामी, वीरेश बागलकोटी, सिद्धाराम सुतार यांच्यासह मुख्याध्यापक संजीवकुमार सुतार, लिंगराज गणेश उपस्थित होते.

## महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाच्या वतीने महातपस्वी व योगमहर्षी परमपूज्य श्री कुमारस्वामीजी यांच्या ११७ व्या जयंती महोत्सवानिमित्त ८ ते १५ ऑगस्टदरम्यान विविध धार्मिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मोयनाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. जयंती महोत्सवानिमित्त ८ ते १३ ऑगस्ट या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत विविध मान्यवरांची व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तसेच रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार असून, यावेळी राजेंद्र मोयनाळ लिखित 'महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य' या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे निवृत्त प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे असतील. ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. सुहास पुजारी तसेच महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. मिलिंद थोबडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस नीलकंठप्पा कोनापुरे, बाबासाहेब कुलकर्णी, रमेश चौगुले, नागनाथ चौगुले उपस्थित होते.



## इथेनॉलला शेतकरी संघटनांची साथ

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

**केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासमवेत देशभरातील शेतकरी संघटनांची चर्चा**

इथेनॉल हा भारतीय शेतीसमोरील एक मोठा आर्थिक पर्याय असून त्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊ शकते. मात्र, इथेनॉल धोरणाचा खरा लाभ कंपन्या किंवा मध्यस्थांऐवजी थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, अशी ठाम भूमिका देशभरातील शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासमोर मांडली. ऑल इंडिया किसान कोऑर्डिनेशन कमिटी (एआयकेसीसी) च्या प्रतिनिधीमंडळाने मंगळवारी (४ ऑगस्ट) नवी दिल्लीतील कृषी भवनात केंद्रीय कृषिमंत्र्यांची भेट घेऊन इथेनॉल, शेतकऱ्यांचे उत्पन्न, किमान आधारभूत किंमत (एमएसपी), कृषी बाजारपेठा आणि राष्ट्रीय कृषी धोरण या विषयांवर चर्चा केली. या बैठकीत शेतकरी नेत्यांनी इथेनॉलला कोणताही विरोध केला नाही. उलट, इथेनॉलमुळे शेतीमालासाठी पारंपरिक बाजारपेठेबरोबरच ऊर्जा क्षेत्रातही नवी बाजारपेठ निर्माण होणार आहे. ऊस, मका, तांदूळ आणि इतर फीडस्टॉक पिकांपासून इथेनॉल निर्मिती वाढल्यास शेतकऱ्यांना अधिक खरेदीदार मिळतील, साठवणुकीच्या अडचणी कमी होतील आणि उत्पादनाला अधिक चांगला भाव मिळेल, असा विश्वास शेतकरी नेत्यांनी व्यक्त केला. बैठकीच्या शेवटी एआयकेसीसीच्या प्रतिनिधींनी इथेनॉलबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी गावागावांत जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी एआयकेसीसीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारतीय किसान युनियन (मान)चे माजी खासदार भूपिंदरसिंह मान, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा नॅशनल असोसिएशन फॉर फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेशन्सचे अध्यक्ष बिनोद आनंद, राष्ट्रीय उपाध्यक्ष गुरुसाहिबसिंह मान, शेतकरी संघटनेचे (शरद जोशी), गुणवंत पाटील, महाराष्ट्राचे उपाध्यक्ष ललित बहाळे पाटील, प्रवक्ते दिनेश शर्मा उपस्थित होते.



## पोचिराम कांबळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त वही वाटप

**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट-**

शहीद पोचिराम कांबळे त्यांच्या पवित्र स्मृतीस मानवंदना विनम्र अभिवादन करून सांगवी ग्रुप ग्रामपंचायत गोसावी वस्ती येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वही खाऊ पेन वाटप करण्यात आले. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय संत बौद्धिक मंच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विष्णु सकट, आनंद मोरे पत्रकार नंदकुमार जगदाळे भारतीय लहुजी सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे, शाळेचे मुख्याध्यापक अरविंद जाधव, बबन पवार उपस्थित होते.

# एसईएस पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

एस.ई.एस. पॉलिटेक्निक, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष डिप्लोमा अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी स्वागत व ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावर संस्थेचे प्राचार्य प्रा. एम. सी. पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे संस्थेत मनःपूर्वक स्वागत करून महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा, उपलब्ध सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, नियमित उपस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी शिक्षणातून उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्य, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन त्यांनी केले. उपप्राचार्य तथा प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. व्ही. एन. कोंगारी यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. व्ही. आर. पवार यांनी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देत पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी विजयकुमार उडता यांनी विद्यार्थ्यांना उत्तम वर्तन, चारित्र्य, शिस्त, संवादकौशल्य आणि सकारात्मक व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व उदाहरणांसह सांगितले. सूत्रसंचालन प्रा. व्ही. एस. बिराजदार यांनी केले, तर प्रा. एस. पी. जन्नू यांनी आभार मानले.



## नाझरे येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ ऑगस्ट-**

नाझरे (ता.सांगोला) येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची मिरवणूक उत्साहात संपन्न झाली.

याप्रसंगी प्रतिमेचे पूजन सोलापूर जि.प.चे शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते व सहा. पो.नि.सिकंदर वर्धन, रविराज शेटे, शामराव वाघमारे, अक्षय सरगर, बाळासो वाघमारे, सचिन वाघमारे, महेश वाघमारे, सागर वाघमारे, रोहन वाघमारे, अजय भोसले यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची गीते, भारुडे सादर करण्यात आली. शेवटी आभार नितीन रणदिवे यांनी मानले.

## मारहाण करून ढकलून दिल्याने आई व मुलगा जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

लाथाबुक्क्याने मारहाण करून ढकलून दिल्याने आई आणि मुलगा असे दोघे जण जखमी झाले.

ही घटना अशोक चौक परिसरातील लक्ष्मी बँकेसमोर मंगळवारी रात्रीच्या सुमारात घडली. उजेब चांदसो शेख (वय २०) आणि त्याची आई नसीमा चांदसो शेख (वय ३७ दोघे रा. बापूजी नगर सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल मंगळवारी रात्री त्यांना करण आणि इतर ४ ते ५ जणांनी मिळून अज्ञात कारणावरून मारहाण केली. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे. पोलिस तपास करीत आहेत.

## जरांगे-पाटील यांच्या सोलापूर जिल्ह्यात सभा ८ व ९ ऑगस्टला आयोजन

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी लढा देणारे मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे ८ व ९ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर येत असल्याची माहिती सकल मराठा समाजाचे सोलापूर जिल्हा निमंत्रक माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मराठा समाजातील कुणबी दाखले मिळण्याच्या प्रक्रियेत शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात तसेच हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट आणि मुंबई गॅझेटमधील नोंदीप्रमाणे दाखले देण्याच्या मागणीसाठी जरांगे पाटील यांनी यापूर्वी अनेक आंदोलने, उपोषणे आणि पाठपुरावे केले आहेत. मात्र शासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने येत्या २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणास बसण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. जरांगे-पाटील यांच्या या दौऱ्याची सुरुवात शनिवार, ८ ऑगस्ट रोजी उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथून सकाळी १० वाजता इशारा सभेने होणार आहे. त्यानंतरची त्यांची सभा माढा येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात दुपारी ४ वाजता सभा आयोजित करण्यात आली आहे. त्याच दिवशी संध्याकाळी पंढरपूर येथे त्यांचा मुक्काम राहणार आहे. रविवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे समाजबांधवांची बैठक होणार असून त्यानंतर सांगोला तालुक्यातील वाटंबरे येथे सायंकाळी ४ वाजता जरांगे पाटील यांची इशारा सभा आयोजित करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस राजन जाधव, शिवाजी चापले, सचिन तिखटे, सचिन गुंड, अमोल भोसले उपस्थित होते.



## ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.सी.ए. प्रथम वर्षाच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलचे संचालक प्रा. अनिकेत चनशेट्टी हे होते. प्रारंभी प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी संपादनावर न थांबता शिस्त, आत्मविश्वास, कौशल्य विकास, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्ये जोपासून स्वतःचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवावे, असे आवाहन केले. बदलत्या काळात ज्ञानाबरोबरच कौशल्य आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदुरचे प्राचार्य तथा ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद साधला. सूत्रसंचालन प्रा. दिपाली कसबे यांनी केले, तर प्रा. राहुल काळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. प्रदीप राठोड, प्रा. रोहिणी बिराजदार, प्रा. ज्योती लकडे, प्रा. गोपाळ चव्हाण, प्रा. भक्तराज जाधव, प्रा. पंढरीनाथ हरिदास, प्रा. रेश्मा हन्नूरे, श्री. महेश भासगी, सागर खंडाळकर उपस्थित होते.

## हॉटेल असोसिएशन बार्शीच्यावतीने आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

भगवंत नगरीचे सुपुत्र, लोकनेते आमदार राजेंद्र राऊत यांनी विधानपरिषद निवडणुकीत विजय संपादन करुन आमदार झाल्याबद्दल बार्शी शहर हॉटेल असोसिएशनच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती उद्योजक मधुशेठ चांडक, व्यावसायिक सुनील अग्रवाल, जिवाजी कदम, विनोद चोप्रा, अभिजित राऊत, अध्यक्ष इम्तियाज भाई तांबोळी, अमर शेट्टी, संताजी सावंत, योगेश अग्रवाल, अनिल माने, राजाभाऊ कदम, बप्पा होनाळे, किरण कोकाटे, जोती कदम, विजय लड्डा, बुडुख मालक, सौरभ बालवडे, सचिन राऊत, पंकज बारबोले, दादा जानराव, दिपक तलवाड, सुदिप पाटील, विष्णू बोराडे, सागर मस्के, सांगोळे, सागर लंकेश्वर, विशाल अग्रवाल, विजय माने, स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार राजेंद्र राऊत यांनी हॉटेल व्यावसायिक यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे अभिवचन दिले व बार्शी तालुक्याच्या अर्थकारणात नवीन उद्योग व्यवसाय यावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले व यातूनच नवीन उद्योजक तयार व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

## क्रांतिदिनी स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि त्यांच्या त्यागाची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने क्रांतिदिनानिमित्त विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

थोर स्वातंत्र्यसैनिक, सहकार महर्षी व माजी आमदार कै. वि. गु. शिवदारे (अण्णा) यांच्या जन्मशताब्दी समारोप वर्षानिमित्त १५ स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांसह १२ बलुतेदार व श्रमजीवी अशा विविध क्षेत्रातील एकूण १०० मान्यवरांचा शाल, मोत्याची माळ आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम रविवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, पार्क चौक येथे होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सन्मान सोहळ्यात कासार, बिगारी, कचरा संकलन करणारे कामगार, शिंपी, सुतार, लोहार, परिट, चांभार, रंगारी, काशीकपडे विक्रेते, रिक्षाचालक, मेकॅनिक, गवळी, पुरोहित, फेरीवाले तसेच महिला सबलीकरण व कुटिरोद्योग क्षेत्रात कार्यरत महिलांचा समावेश करण्यात आला आहे.या प्रेरणादायी कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी केले आहे.

## सोलापुरात ६ ते ८ ऑगस्टदरम्यान रंगसाधक प्रमोद खांडेकर तीन दिवसीय नाट्य महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

अस्तित्व मेकर्स फाऊंडेशनच्या वतीने ६ ते ८ ऑगस्टदरम्यान हुतात्मा स्मृती मंदिर येथे रंगसाधक प्रमोद खांडेकर तीन दिवसीय नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात नाटक, मुलाखत, राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धा व रंगसाधक पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती प्रमुख संयोजक अ‍ॅड. बसवराज सलगर व अध्यक्ष किरण लोंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

६ ऑगस्ट रोजी महोत्सवाचे उद्घाटन होऊन सायंकाळी ७ वाजता 'इश्क का परचा' हे दोन अंकी विनोदी नाटक सादर होणार आहे. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता कला रंगभूमी, महापौर बंगला येथे रंगसाधक पुरस्कार विजेत्या विद्याताई काळे यांच्या '५० वर्षांचा नाट्यप्रवास' या विषयावरील मुलाखत बळवंत जोशी घेणार आहेत.

८ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धा होणार असून पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, सांगली, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि सोलापूर येथील २५ हून अधिक संघ व ३०० पेक्षा अधिक कलाकार सहभागी होणार आहेत. सायंकाळी ६ वाजता राज्यस्तरीय रंगसाधक पुरस्कार व लघुनाटिका स्पर्धेच्या विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ होईल. यावेळी सिने-नाट्य कलावंत सिद्धेश्वर झाडबुके, मुकेश जाधव तसेच 'हास्य जत्रा' फेम कलाकार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच बक्षीस वितरण समारंभाला प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी शहा, चित्रा हॉटेलचे संचालक धीरज जवळकर, अ‍ॅड. मिलिंद थोबडे, मुख्य संयोजक अ‍ॅड. बसवराज सलगर, उद्योजक ज्योतिबा गुंड, संजय सावंत उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस विरेंद्र हिंगमिरे, संजय सावंत, सचिन जगताप, सोमनाथ लोखंडे आदी उपस्थित होते.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राजर्षी शाहू महाराज नॅशनल अवार्डने डॉ.आबासाहेब देशमुख सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑगस्ट-**

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूजचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांना भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) यांनी राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय पुरस्कार २०२६ चा पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले. पुणे येथे माजी उच्च शिक्षण संचालक डॉ.एस.एन. पठाण यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतकरी, कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ४५ वर्षापेक्षा अधिक काळ काम केल्याबद्दल तसेच सामाजिक समानता व न्याय राष्ट्र बांधणीत भरीव योगदान दिल्याबद्दल हा बहुमान त्यांना दिला आहे.



### महत्त्वाचे...




## लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**बार्शी दि. ५ ऑगस्ट-**

लायन्स क्लब बार्शी रॉयल यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन आज बुधवार दि. ५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. हे शिबीर शिल्पा मल्टीस्पेशलिटी डेंटल क्लिनिक, प्रियदर्शनी रेडीमेडच्या शेजारी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी या ठिकाणी आयोजित करण्यात येते. डॉ.तेजस लाड व डॉ.किरण लाड यांनी २० पेशंटची तपासणी केली. या शिबिराची वेळ ११ ते१ १ असते. मोफत डेंटल तपासणी, दातांबाबत तज्ञांचा सल्ला, तोंडाच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन व दातांच्या स्वच्छतेविषयी माहिती दिली जाते. या शिबिराचे प्रोजेक्ट चेअरमन डॉ. किरण लाड होत्या. हे शिबीर डॉ. किरण लाड व डॉ. तेजस लाड यांच्या सहकार्याने संपन्न झाले. त्यावेळी ला. कावेरी बागुल, दयानंद रेवडकर उपस्थित होते.



## 'कोळा विद्यामंदिर'च्या प्राचार्यपदी उत्तम सरगर यांची नियुक्ती

**सांगोला, दि. ५ ऑगस्ट-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथील पर्यवेक्षक उत्तम सरगर यांची कोळा विद्यामंदिर हायस्कुल व ज्यु.कॉलेजच्या प्राचार्यपदी पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते उत्तम सरगर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके विश्वेश झपके, प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदिप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासाहेब नरुटे, शुभांगी घोंगडे, मुख्य लिपिक हेमंत नलवडे यांनी नूतन प्राचार्यांचे अभिनंदन केले.



## बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यानात लक्ष्मीची थंडी उत्सव साजरा

**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील कै बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान येथे जागृत श्री लक्ष्मी मंदिर येथे आषाड थंडीचा उत्सव मोठया भक्तीभावाने मंगलमय वातावरणात झाला. माजी नगराध्यक्ष तथा वटवृक्ष देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे, पंचायत समिती अक्कलकोटचे माजी सदस्य सिध्देश्वर मठपती, युवा नेते प्रथमेश इंगळे, खैराट ग्रामपंचयत सरपंच सौभाग्यवती मठपती यांच्या हस्ते श्री जागृत लक्ष्मी देवीचे पूजन करण्यात आले. कै. बाळासाहेब इंगळे अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण श्रीमुख जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मेजर संदिप सलगरे, सुधाकर कशेट्टी, किशोर खरात, हिराकांत जामदा, बालाजी हादवे, मनोज जाधव, सागर इंगळे, महेश बंदीछोडे, विश्वनाथ सुतार, नंदकुमार जगदाळे, शिवकुमार लिंबीतोटे, बलभिम बिराजदार, गणेश दिवाणजी, देसाई गंगनाळी, शिवशरण मठपती, गणेश माळी, गधरे स्वामी, पी.पी.बिराजदार, संतोष तोळणूरे, रत्नाकर गुरव-पाटील, मेजर कोतवाल, गजानन मिरासे, विजय बाळाशकंर, पोतदार, मडीखांबे उपस्थित होते.

## बचेरी येथील सोने चोरणाऱ्या आरोपींना अटक; मुद्देमाल हस्तगत

**पिलीव दि ५ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील सोने चोरणाऱ्या आरोपींना माळशिरस पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून सत्तर हजार रुपयांचे दागिने असा ऐवज जप्त केला.बचेरी येथील जयंतकुमार पाटील यांच्या घरासमोर उभ्या होंडा सिटी या गाडीत दहा ग्रॅम सोन्याचे गंठण किंमत पन्नास हजार रुपये तसेच ४० ग्रॅम वजनाचे चांदीचे पैंजण, २० ग्रॅमची चांदीची जोडवी व १० ग्रॅम चांदीचे बिचवे अंदाजे किंमत २० हजार रुपये असे एकुण सत्तर हजार रुपयांचे दागिने ३ मे रोजी चारीस गेले होते. याबाबत १९ जुन रोजी माळशिरस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सांगोला तालुक्यातील अकोला येथील वंदना साळुंखे (वंदना रसाळे) व सांगली जिल्ह्यातील तासगाव येथील शंकर राक्षे या दोघांना पोलीसांनी ताब्यात घेतले. या दोघांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीचा सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल स्वरुप शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल मन्सूर नदाफ, पोलीस कॉन्स्टेबल जयश्री साळुंखे करीत आहेत.




**सोलापूर : भीमा नदीत सध्या मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. परिणामी भंडारकवठे ता. दक्षिण सोलापूरजवळील उमराणी बंधारा पूर्ण भरला आहे. बंधाऱ्यात साठलेले पाणी व गेल्या काही दिवसांतील पावसाने हिरवीगार झालेल्या शेतीचे विहंगम दृश्य.** (छायाचित्र : नागेश राशिनकर)

# केंगार यांची प्रकृती ढासळली

### उपजिल्हा रुग्णालय विस्तारीकरणासाठी मंजूर निधी तत्काळ देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑगस्ट-**

अकलूज उपजिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी १०० खाटांच्या रुग्णालयाच्या बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करावा, या मागणीसाठी माणकी (ता. माळशिरस) येथील २२ वर्षीय सिव्हिल इंजिनिअर जयवंत पांडुरंग केंगार यांनी १ ऑगस्टपासून अकलूज येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणामुळे केंगार यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

अकलूज उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटांवरून १०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास शासनाकडून मंजुरी दिली आहे. मात्र, मंजुरीनंतरही प्रत्यक्ष बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध झालेला नसल्याने बांधकाम रखडल्याचा मुद्दा केंगार यांनी उपस्थित केला आहे.



या पार्श्वभूमीवर केंगार यांनी आरोग्य विभागाकडे निवेदन देत आगामी पावसाळी अधिवेशनात रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक निधी मंजूर करून बांधकाम तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र, निधी मंजुरीबाबत ठोस निर्णय होत नसल्याने त्यांनी १ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. दरम्यान, आमरण उपोषणाचा कालावधी वाढत असल्याने केंगार यांची प्रकृती ढासळत चालली आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन शासन व आरोग्य विभागाने तातडीने या मागणीची दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. २२ वर्षीय सुशिक्षित सिव्हिल इंजिनिअर युवकाने अकलूजच्या आरोग्य सुविधांसाठी सुरू केलेल्या या आमरण उपोषणाची आरोग्यमंत्री आणि शासन कितपत गांभीर्याने दखल घेतात, तसेच १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी निधी कधी मंजूर होतो, याकडे आता माळशिरस तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**आरोग्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतरच माघार**

उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकाम ासाठी निधी मंजूर करण्यात येईल, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडून ठोस आश्वासन मिळाल्यानंतरच आपण उपोषण सोडणार आहे.

**- जयवंत केंगार,** आंदोलक तरुण

## 'टेंभू-म्हैसाळ'चे पाणी माण नदीत आणणारच



### चेतनसिंह केदार-सावंत; ग्रामपंचायतींनी ठराव सादर करावेत

**सांगोला, दि. ५ ऑगस्ट-**

महायुती सरकारच्या लोकाभिमुख धोरणामुळे टेंभू-म्हैसाळ धरणे आज पूर्ण क्षमतेने भरली आहेत. आता या योजनेचे पाणी माण नदीवरील सर्व बंधाऱ्यांमध्ये सोडून दुष्काळी भागाला दिलासा देण्यासाठी प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत आहे. यासाठी माण नदीकाठच्या सर्व ग्रामपंचायतींनी तातडीने ठराव मंजूर करून संबंधित जलसंपदा विभागाकडे सादर करावेत, असे आवाहन सोलापूर जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रयत्नांना पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सक्षम नेतृत्व लाभले आहे. त्यामुळे टेंभू-म्हैसाळ योजनेतून माण नदीत पाणी सोडण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच लवकरच पाणी प्रवाहित होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाला गती देण्यासाठी माण नदीकाठच्या सर्व ग्रामपंचायतींनी ठराव तातडीने मंजूर करून संबंधित विभागाकडे सादर करावा. जनहिताच्या या कामात प्रत्येक ग्रामपंचायतीने सकारात्मक भूमिका घेणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले आहे.

**महायुती सरकार कटिबध्द**

महायुती सरकारने दिलेला शब्द हा केवळ आश्वासन नसून कृतीतून सिद्ध होणारा विश्वास आहे. माण नदीतील बंधारे भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला संजीवनी मिळेल, भूजल पातळीत वाढ होईल, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल आणि संपूर्ण परिसराला मोठा दिलासा मिळेल.

**-चेतनसिंह केदार-सावंत,** सभापती,
सोलापूर जि.प.शिक्षण व आरोग्य समिती



## आषाढीत राबलेल्या पोलिसांची अन्नसेवा; श्री पांडुरंग अन्नछत्र मंडळाकडून महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

जन्माचे सार्थक करणारी आषाढी वारी नुकतीच पार पडली. मात्र या आषाढी वारीमध्ये रात्रं-दिवस कडक बंदोबस्त ठेवून भाविक आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिस राबवले. त्यांना तसेच पत्रकारांना श्रमपरिहार म्हणून महाप्रसाद देण्यात आला. श्री पांडुरंग अन्नछत्र मंडळातर्फे विजापूर गल्ली येथील श्री पांडुरंग भवन येथे ही मेजवानी दिली.

यावेळी श्री पांडुरंग भवनचे अनिरुद्ध पाटील, समाजसेवक श्रीकांत महाजन बडवे आणि अक्षय बडवे उपस्थित होते. यावेळी सर्व पोलिस, पत्रकार यांचा श्री विठ्ठलाचा फोटो, शाल, श्रीफळ, टॉवेल आदी देऊन सत्कार करण्यात आला. श्री पांडुरंग भवनचे अनिरुद्ध पाटील यांचे आदरातिथ्य पाहून सर्व पोलिस भारावून गेले. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम ते चालवित असून मिष्टान्न भोजनाचा सोहळा साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी साडे तीन हजार पोलीस बांधव यांनी या महाप्रसाद भोजनाचा लाभ घेतला.

## लग्नाचे निमंत्रण न दिल्याच्या कारणावरून मारहाण

**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

लग्नाचे निमंत्रण न दिल्याने झालेल्या वादातून एका तरुणाला दांडक्याने मारहाण करुन जखमी केले. ही घटना बार्शी शहरातील मल्लप्पा धनशेट्टी रोड परिसरातील वडर गल्ली येथे घडली. याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सुरज पवार यांच्या फिर्यादीवरुन निलेश मंगळवेढकर व शारदा मंगळवेढकर यांच्याविरोधात बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी सुरज पवार (वय ३२, रा. वडर गल्ली, बार्शी) यांच्या नातेवाईकांच्या मुलीचे लग्न दि. ३१ जुलै रोजी बार्शी येथील आदर्श मंगल कार्यालयात झाले होते. लग्नाचे निमंत्रण काही नातेवाईकांना दिले नसल्याच्या कारणावरुन वाद निर्माण झाला. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, २ ऑगस्ट रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास घरासमोर पोहोचल्यानंतर निलेश राजेंद्र मंगळवेढकर व शारदा राजेंद्र मंगळवेढकर (दोघे रा. वडर गल्ली, बार्शी) हे तेथे आले व त्यांनी शिवीगाळ करून मारहाण केली. अरुणा जाधव, संगीता जाधव व सोनाली जाधव यांनी भांडण सोडविल्याचे फिर्यादीने सांगितले आहे.

## मडकी वस्ती येथे झोपेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

मडकीवस्ती (गणेश नगर) येथील बालाजी अपार्टमेंट येथे राहणारे संतोष प्रल्हाद हजारे (वय ५१) हे झोपेत असताना मयत झाले. ही घटना आज बुधवारी सकाळच्या सुमारास उघकीस आली. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे यकृत प्रत्यारोपण; पत्नीच्या यकृतदानातून पतीला नवजीवन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट -**

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर केली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला. अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता. कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व



धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला. या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण झाले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै रोजी इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून रुग्णसेवेचा आनंद**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आनंद आहे.

**-रामेश्वर नाईक,** कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

# विकासाच्या राजमार्गावर धावते आहे बार्शी

## भाजपाच्या ताब्यात सर्व सत्ताकेंद्रे ! दोन आमदारांमुळे बार्शीच्या विकासाच्या अपेक्षा उंचावल्या







सोलापूर जिल्ह्यात एकाचवेळी विधानसभा व विधान परिषदेत बार्शी तालुक्याचे प्रतिनिधीत्व असल्यामुळे राज्यात बार्शी तालुका लक्षवेधी ठरला आहे. धार्मिक आणि पौराणिक वारसा लाभलेली बार्शी राज्यात आणि परराज्यात द्वादश क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. दक्षिणोत्तर राज्यांना जोडलेली व्यापार पेठ म्हणून बार्शीचा नावलौकिक आहे. सार्वजनिक आणि खाजगी तत्त्वावरील प्रतिथयश रुग्णालयांमुळे बार्शी मेडिकल हब म्हणून पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात नावारुपाला आलेली आहे.

सन १९३४ साली स्थापन झालेल्या कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळामुळे बार्शीचे शैक्षणिक महत्त्व आहे. अशा या विविध क्षेत्रात संपन्न वारसा लाभलेल्या बार्शी शहर व तालुक्याला विकासाच्या राज्यमार्गावर धावण्यासाठी आवश्यकते विकास निधीचे पाठबळ राज्यातल्या भाजपा शासनाकडून अपेक्षित आणि आवश्यक आहे.

बार्शी तालुक्यात नगरपालिका, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती या महत्त्वाच्या सत्ता केंद्रावर भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद प्रथमच बार्शी तालुक्याला मिळाले आहे. त्यातच सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून बार्शी तालुक्याचे माजी आमदार राजाभाऊ राऊत हे विधान परिषदेवर नुकतेच आमदार म्हणून निवडून गेले आहेत. नूतन आमदार राजभाऊ राऊत हे सन २०१७ सालापासून भाजपात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजाभाऊ राऊत यांना वरदहस्त लाभला आहे. तसेच बार्शी विधानसभा मतदारसंघाचे विधीमंडळात प्रतिनिधीत्त्व करणारे विद्यमान आमदार दिलीपराव सोपल हे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संसाधन साधून आहेत आणि ते शिंदे सेनेकडे झुकले आहेत, अशी चर्चा आहे. त्यामुळे सध्या बार्शीचे विधीमंडळात प्रतिनिधीत्व करणारे दोन्ही आमदार हे सत्तारुढ पक्षांचा घटक झाले आहेत.

त्यामुळे आगामी काळात बार्शी तालुक्याला विविध विकास प्रकल्पां बाबत विकास निधीचे पाठबळ मिळणार आणि बार्शीला शासन दरबारी झुकते माप मिळणार आहे, असा सूर उमटतो आहे.

सन २०२२ साली तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार राजाभाऊ राऊत यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे बार्शी तालुक्याला हजारो कोटींचे विकास निधीचे सहाय्य उपलब्ध करुन दिले होते. त्यामुळे बार्शी तालुक्याला उपसा सिंचन योजना, पाझर तलाव, साठवण तलाव, बंधारे निर्मिती तसेच ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, वीज उपकेंद्र, तालुक्यातील अंतर्गत व बाह्य रस्ते, विविध ग्रामीण पाणीपुरवठा योजना, न्यायालयीन इमारत, पोलीस उप-मुख्यालय या सारख्या महत्त्वकांक्षी योजनांना निधी मिळाला होता. तसेच बार्शी शहरासाठी महत्त्वाची असणारी समांत्तर जलवाहिनी योजना, भुयारी गटार योजना, भगवंत स्टेडियम, शहीद स्मारक, शिवसृष्टी, बसस्थानकाचे नुतनीकरण, नवीन उद्याने यासाठी मोठा निधी मंजूर झाला होता. यातील बहुतांश विकास प्रकल्प मार्गी लागले असून, उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याच्या प्रतिक्षेत बार्शीकर आहेत. समांत्तर जलवाहिन्या प्रकल्प पूर्णत्वाकडे जातो आहे.

नुकतेच नूतन आमदार राजाभाऊ राऊत यांनी टेंभुर्णी ते येडशी या महामार्गाच्या चौपदारीकरणासाठी केंद्रीय रस्ते विकासमंत्री ना. नितीन गडकरी यांना साकडे घातले आहे. बार्शी शहराच्या श्रद्धेचा विषय असलेल्या श्री भगवंत देवालय केंद्रबिंदू असलेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या मंजुरीची मागणी शासन दरबारी मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. तसेच बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागात वैराग, उपळाई ठोंगे, जामगांव येथे औद्योगिक वसाहतीच्या मंजुरीची मागणी आमदार राजाभाऊ राऊत यांनी केली आहे.



अरुण बळप
बार्शी प्रतिनिधी

अशा विविध विकास योजनांना गती मिळाली तर विकासाची मालिका कायम राहणार आहे. बार्शी तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. त्यामुळे आगामी काळात बार्शी तालुक्याचे विकासचित्र मोठे रमणीय असणार आहे. पायाभूत सुविधा शेती व शेतीवर आधारित उद्योग व रोजगार निर्मिती याबाबत बार्शी तालुक्यात भरीव फलनिष्पती होणार आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यात घडणारे हे नियोजित परिवर्तन युवा पिढीसाठी आशादायी आहे. आगामी काळात या दृष्टीने कोणती पावले पडतात याकडे बार्शीकरांचे लक्ष लागले आहे.

सोलापूरबरोबरच बार्शी शहर हे जिल्ह्यात गिरणगाव आणि उतारपेठ म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध होते. बार्शी शहरामध्ये असलेल्या लोकमान्य व राजन या सूत गिरण्या क्रमाक्रमाने बंद पडल्या. त्यानंतर करुणाकाळात जयशंकर ही पूर्वाश्रमीची सूत गिरणी बार्शी टेक्स्टाईल मिल या नावाने कार्यान्वित होती. ती बंद पडली असून त्यामुळे कायम व हंगामी कामगारांच्या उदरनिर्वाहाचा आणि पुर्नवसनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच बार्शी शहरात आज चार औद्योगिक वसाहती कार्यरत आहेत. परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरण (एमआयडीसी) ही पूर्णपणे कार्यान्वित झाली नाही. त्यामुळे नव्या कारखानदारीच्या उदयाला खीळ बसली आहे. सोलापूर व धाराशिव जिल्हा हे कार्यक्षेत्र असलेला पूर्वीचा भोगावती नंतर संतनाथ सहकारी साखर कारखान्यात रुपांतरीत झाला.

परंतु या कारखान्याचे भोग संपले नाहीत. नंतर हा कारखाना कर्जबाजारी होऊन लिलावात जाण्याची वेळ आली. नंतर हा कारखाना कर्जमुक्त होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कारकीर्दीमध्ये पावले पडली. मात्र हा कारखाना अद्यापही बंदच आहे. या कारखान्याचे पुर्नजीवन होण्याची गरज आहे. तसेच कुमुदा आर्यन हा खाजगी साखर कारखाना नंतर येडेश्वरी नावाने सुरु झाला. मात्र हा कारखानादेखील पूर्ण क्षमतेने सुरु झाला नाही. हा कारखाना देखील आज बंद आहे. तसेच उपळाई ठोंगे येथील इंद्रेश्वर साखर कारखाना देखील काही वर्षे कार्यरत राहून नंतर बंद झाला आहे.

बार्शी शहर व तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी सिंचन व कारखानदारी वाढणे गरजेचे आहे. बार्शी तालुक्याला सिंचनाचा अनुशेष भविष्यात भरुन निघेल अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

मात्र पूर्वापार ज्वारीचे कोठार व दाळ कारखानदारीमुळे राज्यात ओळख असणाऱ्या बार्शी तालुक्यात आज उसाचे क्षेत्र वाढले आहे. प्रयोगशील शेतकरी निर्माण झाले आहेत. तसेच सोयाबीन प्रक्रिया उद्योगासारखे मोठे उद्योग निर्माण झाले आहेत. बार्शी तालुक्यात मोठे अन्नप्रक्रिया उद्योग सुरु व्हावेत यासाठी बार्शीतील राज्यकर्ते प्रयत्नशील आहेत. अर्धशतकापेक्षा अधिक काळाच्या वाटचालीचा इतिहास असलेली उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती ही जिल्ह्यातील 'अ' वर्ग दर्जाची मोठी पणन संस्था आहे. नुकत्याच झालेल्या या बाजार समितीच्या पंचवार्षिक संचालक मंडळाच्या निवडणुकीत विद्यमान आमदार राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सर्व अठरा संचालक हे बहुमताने निवडून आले.




सलग दुसऱ्या वेळेस आमदार राऊत यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाला सत्तारुढ होण्याची संधी मिळाली. आमदार राऊत यांनी सन २०१८ ते २०२५ या कालावधीत केलेल्या कामाची पोहच पावती त्यांना मिळाली. आज बाजार समितीमध्ये वेअर हाऊस, कोल्ड स्टोअरेज, हमीभाव खरेदी केंद्र, शेतीमाल तारण कर्ज योजना, इनाम योजना कार्यान्वित आहेत. बाजार समितीमध्ये पायाभूत सुविधांपासून वनीकरणापर्यंत व इलेक्ट्रीक वजनकाट्या पर्यंत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. बाजार समिती ही आपला नावलौकिक वाढवत आहे. बार्शी तालुक्यात उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रुपाने शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळत आहे.

बार्शी तालुक्यात कर्मवीर मामासाहेब जगदाळे, लोहोकरे गुरुजी, गडशिंग गुरुजी, स्व. शांतीलाल गांधी, भाऊसाहेब झाडबुके यासारख्या देहवादी शिक्षण संस्था चालकांनी शैक्षणिक प्रगतीला पाठबळ दिले. तसेच कर्मवीरांबरोबरच डॉ. बी.एन. नेने, डॉ. ए.जी. हिरेमठ यांनी सार्वजनिक रुग्णसेवेच्या कार्याचा पाया घातला. त्यामुळे आज बार्शीमध्ये महानगरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या वैद्यकीय सेवासुविधा व तंत्रज्ञान आणि तज्ञ प्रशिक्षित डॉक्टर्स यांनी बार्शीला मेडिकल हब बनविले आहे. तसेच भगवंत तीर्थक्षेत्र आराखडा मंजूर होऊन पूर्णात्वास गेल्यानंतर बार्शीचे धार्मिक पर्यटन क्षेत्र म्हणून असलेले स्थान उंचावणार आहे. त्यामुळे बार्शीच्या सार्वगिण विकासासाठी मूलभूत व महत्त्व असलेल्या विकास प्रकल्पांना निधी मिळण्यासाठी दोन्ही लोक प्रतिनिधींनी पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



जय जिजाऊ

* शुभेच्छुक *

मराठा सेवा संघ
बार्शी शहर व तालुका

महात्मा फुले शाळा
सौंदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर
नर्सरी ते इ. १२ वी सेमी इंग्लिश
e-Learning with AI - Smart Panel
Robotics & Coding
Scholarship/ Manthan Navodaya / Sainiki
SOF Olympiads
Sci./Computer Lab
IIT / JEE / NEET Foundation
Abacus
Admission Limit Per Class only 30 Students
Hostel Facility Available
Boys 30 Seats Girls 20 Seats Only
* स्कूल बसची सोय. प्रवेशासाठी संपर्क : प्रा. गणेश गोटे (MCM, MBA, MCP, DECom) Mob. 9850554546

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
कर्मवीर लोहोकरे गुरुजी - द्रष्टे समाज सुधारक
छत्रपती शिवाजी महाराज - जाणता राजा
* कार्यकारी विश्वस्त मंडळ *
श्री. विनायकराव गणपतराव गरड - अध्यक्ष
श्री. बळवंतराव केशव पाटील - उपाध्यक्ष
श्री. मदनलाल गुलाबचंद खटोड-खजिनदार, श्री. पंडितराव जनार्धन लोहोकरे-सचिव, श्री. अरुण रामराव भड-सह सचिव, श्री. अनिल माणिकराव गरड-संचालक, श्री. जीवन रामदास लोहोकरे-संचालक, श्री. वसंत त्रिंबकर काकडे-संचालक, श्री. डॉ. संतोष इंद्रसेन भड-संचालक, श्री. अक्षय अशोक भड-संचालक, श्री. महेश दत्तात्रय पाटील-संचालक, श्री. मधुकांत विनायकराव गरड-संचालक, श्री. विलास गजेंद्र लोहोकरे-संचालक, श्री. चव्हाण अरविंद तुकाराम-संचालक, श्री. अनिल धनाजी पाटील-संचालक, श्री. डॉ. विवेकानंद पोपट पाटील-संचालक
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गौडगांव, ता. बार्शी.
सर्व संचालक, सर्व शाखाप्रमुख व कर्मचारी वृंद

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
मो. 9822057082 - ॲड. एस.जे. क्षीरसागर (B.Com.,LL.M)
मो. 9511758918 - ॲड. पी.एस. क्षीरसागर (B.A.LL.B)
मो. 7972788123 - ॲड. ए.एन. बिडबाग (B.A.LL.B)
अति.जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ऑफिस - सि.स.नं. ६८४, हांडे गल्ली, बार्शी, जि. सोलापूर
निवास - नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड, बार्शी.

दै. तरुण भारत वर्धापनदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा!
हॉटेल वैशाली
करण बारंगुळे Mo.9623200525 7068651212
फॅमिलीसाठी स्वतंत्र व्यवस्था
अद्ययावत आरामदायी व प्रशस्त बैठक व्यवस्था
अद्ययावत झोपडी (हट) प्रशस्त बैठक व्यवस्था
स्वतंत्र ए.सी. हॉल. प्रशस्त बैठक व्यवस्था
- नविन मॅनेजमेंट व्यवस्थेसह
- परमीट रुम, बिअर बार,
- व्हेज नॉनव्हेज जेवण,
- अद्ययावत साऊंड सिस्टीमसह प्रोजेक्टर,
- फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
बार्शी शहरापासून जवळच....
परमीट रुम & बिअर बार
बार्शी-कुर्डूवाडी रोडवर (बार्शी पासून ३ कि.मी.अंतरावर)

तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!
* शुभेच्छुक *
श्री. निखिल नंदकुमार बडवे
संस्कृत विभाग प्रमुख- हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर तथा संस्कृत भारती सोलापूर जिल्हा संयोजक

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
मो. 9545418888 - ॲड. जाधव पी. डी. M.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
बारबोले प्लॉट, शिवशक्ती मैदानाच्या पाठीमागे, बार्शी, जि. सोलापूर
मो. 7588215259, 9922019918 - ॲड. घोळवे आर. एन. (घोळवेवाडी) B.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
अलिपूर रोड, शंकर-पार्वतीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

दै. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!
* शुभेच्छुक *
ॲड. वासुदेव नरहरी ढगे
'मातोश्री कॉम्प्लेक्स', ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर

दै. तरुणभारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
तिरुपती ॲग्रो एजन्सीज
मंगेश बागूल 9822818524
शिवाजी खळदकर 9850502613
सचिन चव्हाण - 9970693011
नामांकित कंपनीचे भाजीपाला बियाणे, धना मेथी, पालक बियाणे तसेच, मल्चिंग पेपर, क्रॉपकवर, कोकोपिट, ट्रे आणि नामांकित कंपनीचे दर्जेदार औषधे इत्यादीसाठी बार्शीतील १२ वर्षापासुन शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले कृषी दालन
शाखा नं. १ : गाळा नं. २८, मार्केट यार्ड शॉपिंग सेंटर, तुळजापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर
शाखा नं. २ : एच. पी. पेट्रोल पंपा शेजारी, करमाळा रोड, परंडा, जि. धाराशिव

आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता प्रकल्प
दैनिक तरुण भारत वर्धापन दिन... हार्दिक शुभेच्छा
SkillBook
स्किल बुक - एक कोटी विद्यार्थ्यांना एक लाख कौशल्याशी जोडूया..
केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया योजनेअंतर्गत डिप प्रमाणित संस्था
स्मितकिरण प्रकाशन संस्था, बार्शी, जि. सोलापूर

# विकासाच्या नव्या पर्वाकडे झेपावणारे सोलापूर





**दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पंढरपूरसह संतभूमी, वस्त्रोद्योगाची परंपरा आणि समर्थांची नगरी अशी देशभरात ओळख असलेला सोलापूर जिल्हा आता विकासाच्या नव्या टप्प्यावर उभा आहे. अनेक वर्षे केवळ दुष्काळग्रस्त जिल्हा अशी ओळख असलेल्या सोलापूरने आता उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती- तंत्रज्ञान, वाहतूक, शिक्षण आणि पर्यटन या सर्व क्षेत्रांत नव्या संधी निर्माण करण्यास सुरुवात केली आहे.**

## विमानसेवा, प्रस्तावित आयटी पार्क, उड्डाणपूल, उद्योग, शेती आणि आधुनिक पायाभूत सुविधांमुळे बदलत आहे सोलापूरची विकासगाथा



यशवंत गुरव
भ्र. ८८८८६५०७५५

शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी, आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे सोलापूरचा चेहरामोहरा वेगाने बदलताना दिसत आहे. सोलापूरच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे सुरू झालेली विमानसेवा होय. विमानतळ कार्यान्वित झाल्यास सोलापूरची देशातील प्रमुख शहरांशी थेट हवाई संपर्काची दारे खुली होत आहेत. उद्योग, व्यापार, गुंतवणूक, पर्यटन आणि वैद्यकीय सेवांना त्याचा मोठा फायदा होईल. विशेषतः पंढरपूर, अक्कलकोट आणि तुळजापूर या धार्मिक स्थळांवर येणाऱ्या भाविकांसाठी विमानसेवा मोठी सुविधा ठरेल.

भविष्यातील आर्थिक विकासाच्यादृष्टीने प्रस्तावित आयटी पार्क हा सोलापूरसाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. पुणे, मुंबई किंवा हैदराबादकडे नोकरीसाठी जाणाऱ्या तरुणांना सोलापूरमध्येच माहिती– तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. आयटी कंपन्यांची गुंतवणूक वाढल्यास सेवा क्षेत्राचा विस्तार होईल, पूरक व्यवसाय निर्माण होतील आणि शहराची अर्थव्यवस्था अधिक गतिमान बनेल. शहरातील वाढत्या वाहतुकीची समस्या लक्षात घेऊन उड्डाणपूल प्रकल्पांनाही गती मिळत आहे. प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात येणारे उड्डाणपूल नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित करतील. शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण, सिमेंट काँक्रीट रस्ते, स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्था आणि नवीन जोडरस्ते यामुळे सोलापूर आधुनिक शहराच्या दिशेने वाटचाल करत आहे. औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात वस्त्रोद्योगासोबत अभियांत्रिकी, अन्नप्रक्रिया, ऊर्जा आणि लघुउद्योगांनाही चालना मिळत आहे. एमआयडीसी परिसरात नवीन उद्योग उभारण्याचे प्रयत्न सुरू असून त्यामुळे रोजगारनिर्मितीला गती मिळत आहे. सौरऊर्जा प्रकल्पांमुळे हरित ऊर्जेच्या क्षेत्रातही सोलापूर राज्यात महत्त्वाचे स्थान निर्माण करत आहे. शेती हा जिल्ह्याचा मुख्य आधारस्तंभ आहे. जलसंधारण, ठिबक सिंचन, शेततळी आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानामुळे उत्पादनात वाढ होत आहे. डाळिंब, द्राक्षे, ऊस, ज्वारी आणि इतर नगदी पिकांना प्रक्रिया उद्योगांची जोड मिळाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातही सकारात्मक बदल घडत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयानंतर आता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सोलापुरात येण्याने सोलापूरसह आसपासच्या खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना नवी शिक्षणाचे



दारे खुली होणार आहेत. उच्च शिक्षण संस्थांमुळे सोलापूर शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित होत आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल शिक्षण, स्मार्ट वर्गखोल्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला जात आहे. दुसरीकडे शासकीय रुग्णालयांचे आधुनिकीकरण, ग्रामीण आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण आणि आधुनिक वैद्यकीय सुविधा यामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहेत. धार्मिक पर्यटन हा सोलापूरच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. पंढरपूरची आषाढी वारी, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर, सिद्धेश्वर मंदिर आणि परिसरातील इतर धार्मिक स्थळांमुळे दरवर्षी लाखो भाविक सोलापूरला भेट देतात.

विमानसेवा, चांगले रस्ते आणि आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्यास पर्यटन क्षेत्राला आणखी मोठी चालना मिळेल. ग्रामीण भागात जलजीवन मिशन, ग्रामीण रस्ते, घरकुल योजना, स्वच्छता अभियान, महिला बचतगट, मनरेगा आणि विविध विकास योजनांमुळे





गावागावात मूलभूत सुविधांचा विस्तार होत आ पिण्याचे पाणी, वीज, डिजिटल सेवा आणि ग्रामी पायाभूत सुविधा मजबूत झाल्याने ग्रामीण जीवनमा उंचावत आहे. सोलापूरचा विकास हा केवळ इमार किंवा रस्त्यांपुरता मर्यादित नसून रोजगार, उद्यो शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणपूरक विकासा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे.

विमानसेवा, प्रस्तावित आयटी पार्क, उड्डाणपू आधुनिक पायाभूत सुविधा आणि वाढती औद्योगि गुंतवणूक यामुळे सोलापूर आता पारंपरि ओळखीपलीकडे जाऊन आधुनिक, सक्षम आ स्पर्धात्मक शहर म्हणून उदयास येत आहे. (लेख तरुण भारतचे उपसंपादक आहेत.)

> **सोलापूरचा विकास हा आता केवळ संकल्पना राहिलेला नाही, तर प्रत्यक्षात आकार घेत असलेला बदल आहे. विमानसेवा, आयटी पार्क, उड्डाणपूल, उद्योगवाढ, आधुनिक शेती, पर्यटन आणि सर्वांगीण पायाभूत सुविधांच्या बळावर सोलापूर महाराष्ट्रातील उदयोन्मुख विकासकेंद्र म्हणून आपली नवी ओळख निर्माण करत आहे. नियोजनबद्ध अंमलबजावणी आणि लोकसहभाग कायम राहिला, तर येत्या दशकात सोलापूर राज्यातील सर्वाधिक वेगाने प्रगती करणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक ठरण्याची क्षमता निश्चितच बाळगून आहे.**



# उद्योगपती स्व. जयकुमारजी पाटील



कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथे ११ फेब्रुवारी १९४२ रोजी जयकुमारजी यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने सोलापूरला आले. आणि सोलापूर शहराच्या सार्वजनिक जीवनाचे अभिन्न अंग बनले. बोलण्यात मृदुता, वागण्यात नम्रता आणि भारदस्त व्यक्तिमत्व असलेले जयकुमारजी अजातशत्रू होते. त्यामुळेच ते सोलापूरकरांसाठी केवळ यशस्वी उद्योजक नव्हते, तर पितृतुल्य मार्गदर्शक होते.



प्रा. संतोष मारकवाड
सोलापूर

जयकुमारजींनी सोलापूरच्या उद्योगविश्वातील अडचणी अत्यंत आत्मीयतेने समजून घेतल्या. त्या प्रश्नांना व्यापक विकासाच्या चौकटीत बसवले. होटगी आणि चिंचोळी औद्योगिक वसाहतींच्या उभारणीतील त्यांचे योगदान आजही शहरातील ज्येष्ठ उद्योगपती अभिमानाने स्मरतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे सोलापूरच्या उद्योगविश्वाला नवसंजीवनी मिळाली आणि अनेक नवउद्योजक उभे राहिले. उद्योग, रोजगार, पायाभूत सुविधा, औद्योगिक वसाहत याबाबतचे अनेक प्रश्न त्यांनी शासन दरबारी सातत्याने मांडून सोलापूरच्या विकासाचा मार्ग तयार केला.

लक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी केवळ उद्योग उभारले नाहीत, तर नागरिकांच्या जीवनाशी नाते जोडले. रोजगारनिर्मिती, दर्जेदार उत्पादन, विश्वासार्ह सेवा आणि सामाजिक बांधिलकी या चौकटीतून त्यांनी उद्योग व्यवसायाला नवे अधिष्ठान दिले. त्या औद्योगिक पायाभरणीमुळेच लक्ष्मी उद्योग समूह भरभराटीस आला आणि सोलापूरच्या औद्योगिक नकाशावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

उद्योगात यश मिळवूनही त्यांनी सामाजिक जबाबदारी कधी विसरली नाही. उपेक्षित, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत सामाजिक व शैक्षणिक सुविधा पोहोचाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी अनेकांना समाजकार्याचे मोलाचे धडे दिले. त्यांची कल्पकता आणि संवेदनशीलता यांचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. हेडगेवार रक्तपेढी. रुग्णांच्या तातडीच्या गरजा ओळखून त्यांनी ही संस्था उभारली.

## उद्योग, शिक्षण आणि समाजकार्याचा त्रिवेणी संगम

**काही व्यक्ती केवळ स्वतःचे आयुष्य यशस्वी करून थांबत नाहीत, तर त्या शहराच्या वाटचालीला दिशा देतात. स्वर्गीय जयकुमारजी पाटील हे असेच एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्र या तिन्ही आघाड्यांवर त्यांनी सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास साधला. त्यांनी केवळ कल्पना मांडल्या नाहीत; तर तन, मन आणि धन या तिन्हींच्या समर्पणातून त्या प्रत्यक्षात उतरवल्या. शहराच्या प्रगतीसाठी त्यांनी आयुष्यभर स्वतःला झोकून दिले.**

आजही अनेकांचे प्राण वाचवणारी ही रक्तपेढी त्यांच्य दूरदृष्टीची साक्ष देत उभी आहे. त्यामुळे त्यांचे कार्य केव स्मरणात राहणारे नव्हे, तर समाजासाठी आदर्शवत ठरणारे आहे

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य म्हणू त्यांनी शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. ग्रामीण भागा माध्यमिक व उच्च– माध्यमिक शिक्षणाचा प्रसार होऊन ते अधि गुणवत्तापूर्ण होण्यासाठी संस्थेमार्फत अनेक धोरणे अंमला आणण्यात त्यांची भूमिका मोलाची राहिली.

विशेषतः उपेक्षित व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी ते सदै आग्रही होते. त्यांच्याच संकल्पनेतून उभे राहिलेले लक्ष्मीबा भाऊराव पाटील महिला महाविद्यालय हे आज सोलापूर शह आणि परिसरातील दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण केंद्र म्हणू नावलौकिकास आले आहे.

जयकुमारजींच्या कार्याचे स्मारक म्हणून महाविद्यालया त्यांच्याच नावाने कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यात आले आहे या केंद्रात वन डिग्री, वन स्कील या तत्वानुसार शहर आणि परिसरातील विद्यार्थिनींना रोजगाराभिमुख आणि कौशल्याधारि शिक्षण व प्रशिक्षण दिले जात आहे.

२३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे अकाली निधन झाले मात्र त्यांचे स्वप्न थांबले नाही. पाटील कुटुंबीय त्यांच्या कार्याच वसा आणि वारसा तितक्याच जोमाने पुढे चालवीत आहेत जयकुमारजी पाटील हे सोलापूरचे केवळ यशस्वी उद्योजक नव्हते तर शहराच्या भविष्याचा विचार करणारे द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्य विचारांची मशाल आजही तेवत आहे. त्यांनी घालून दिलेल्य मूल्यांच्या वाटेवर चालणे आणि ती पुढे नेण्याची जबाबदा आता सोलापूरकरांची आहे. (लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिल महाविद्यालय, सोलापूर)

# सामाजिक बांधीलकी जपणारी बार्शीतील श्री भगवंत मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी




सुरुवातीला बार्शी येथील मुख्य शाखेपासून सुरू झालेला हा प्रवास पांगरी, वैराग आणि परांडा या चार शाखांपर्यंत विस्तारला. संचालक मंडळाच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि पारदर्शक कारभारामुळे संस्थेची प्रगती अल्पावधीतच स्पष्टपणे दिसू लागली. कर्जवाटपातील शिस्त आणि नियमित वसुलीमुळे एनपीएचे प्रमाण अत्यल्प राहिले.

याच उत्तम व्यवस्थापनाचा परिणाम म्हणजे सातत्याने 'अ' दर्जाचा लेखापरीक्षण अहवाल, ज्यामुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाला. विश्वास वाढत गेला तसे ठेवींचाही ओघ वाढू लागला. ठेवीदारांना आकर्षक परतावा देण्यासाठी सक्षम कर्जदारांची निवड आणि त्यांच्याकडून नियमित परतफेड करणे हे मोठे आव्हान होते.

मात्र, चेअरमन व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी कर्मचाऱ्यांनी हे आव्हान समर्थपणे पेलले. परिणामी, केवळ १२ वर्षांत १०७ कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा गाठणे शक्य झाले. ही संस्थेवरील वाढत्या विश्वासाची ठोस पावती आहे.

भगवंत मल्टीस्टेटने केवळ आर्थिक व्यवहारांपुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही, तर सामाजिक बांधिलकीही जपली आहे. बेरोजगार युवक, उद्योजक आणि गरजू व्यावसायिकांना कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देत त्यांना उभे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले आहे. पिग्मी सारख्यासुलभ परतफेडीच्या योजनांमुळे कर्जदारांना मोठा दिलासा मिळतो.

आधुनिक बँकिंग प्रणालीचा अवलंब केल्यामुळे व्यवहार जलद, सुरक्षित आणि सुलभ झाले आहेत. विविध ठेवी योजनांवर आकर्षक व्याजदर देत संस्था ग्राहकाभिमुख सेवा देत आहे. याशिवाय, कार्यविस्ताराच्या दृष्टीने मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, तुळजापूर आणि विजापूर येथे नवीन शाखा सुरू करण्यास मंजुरी मिळाल्याने संस्थेच्या प्रगतीला नवे आयाम मिळणार आहेत.

सामाजिक क्षेत्रातही भगवंत मल्टीस्टेटचा सक्रिय सहभाग आहे. मातृभूमी प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित 'भगवंत व्याख्यानमाला' हा संस्थेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या माध्यमातून राज्य व देशातील नामवंत विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते यांच्या व्याख्यानांचे आयोजन करून समाजात सकारात्मक विचारांची पेरणी केली जाते.

**- मिलिंद कांबळे**
सीईओ, भगवंत मल्टीस्टेट, बार्शी.

# सोलापूर जिल्ह्यातील शतकोत्तराकडे वाटचाल करणारी बार्शी एज्युकेशन सोसायटी

बार्शीतील बार्शी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. भगवंत पंढरीनाथ तथा काकासाहेब सुलाखे हे सोलापूर जिल्ह्यातील एक नामांकित कायदे पंडीत, यशस्वी उद्योगपती आणि बार्शी शहरातील प्रमुख नागरिक होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला आणि सामाजिक सेवेच्या जाणिवेतून त्यांनी भरीव असे ऐतिहासिक कार्य केले.

बार्शी एज्युकेशन सोसायटी ही संस्था आज महाराष्ट्रात एक अग्रगण्य संस्था आहे. १९१८ साली लोकमान्य टिळक बार्शीला आले होते. बार्शीच्या भगवंत मैदानावर 'राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता' या विषयावर त्यांचे त्यावेळी भाषणही झाले होते व त्यातून प्रेरणा घेऊन कै. काकासाहेबांनी बार्शीत शाळा काढण्याचे ठरविले. १९२४ च्या गुढीपाडव्याला हा संकल्प जाहीर झाला आणि २५ विद्यार्थी व २ शिक्षकांच्या भांडवलावर 'न्यू इंग्लिश स्कूल' या नावाने शाळा सुरु केली. त्यात कै. काकासाहेब सुलाखे यांच्या नेतृत्वामुळे व कार्यकुशलतेमुळे या लहानशा शाळेचे रुपांतर १९३७ साली 'सुलाखे हायस्कूल' या नावाने झाले. बार्शी एज्युकेशन सोसायटी बार्शी या संस्थेच्या आरंभापासून कै. काकासाहेब सुलाखे हे अध्यक्ष होते. आज सुलाखे हायस्कूलमध्ये जवळपास २,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



सन १९४० मध्ये मुलांसाठी 'नवीन मराठी शाळा' सुरु केली. शहरातील पहिली खाजगी प्राथमिक शाळा आहे. मुलींकरिता त्यांनी एक शाळा सुरु केली. सहशिक्षणाचे तत्त्व आल्यावर सन १९५० साली मुलींची शाळा मुलांच्या शाळेत विलीन झाली. आज ही शाळा 'नवीन मराठी शाळा' या नावाने सोलापूर जिल्ह्यात दबदबा निर्माण झालेली एक शाळा आहे. १ ऑगस्ट १९४६ मध्ये 'शिशुविहार केंद्र' सुरु करण्यात आले. या शाळेत आता जवळपास ३५० विद्यार्थी शिशु गटात शिक्षण घेत आहेत. कै. काकासाहेब सुलाखे यांच्या हयातीत 'सुलाखे हायस्कूल' बाळेश्वर नाक्यालगत असलेल्या स्वतःच्या जागेत स्थलांतरीत झाले. सध्या बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी या संस्थेमार्फत सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, बार्शी. नवीन मराठी शाळा, बार्शी. श्रीमती मंगलाताई सुलाखे शिशुविहार, बार्शी.

शब्दांकन
**अनंत गो. कवठाळे, सचिव**

सुलाखे इंग्लिश मिडियम स्कूल, बार्शी. सुलाखे प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल, बार्शी. सुलाखे कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बार्शी. सुलाखे कॉलेज ऑफ कॉम्प्युट, मॅनेजमेंट अँड रिसर्च, बार्शी यशस्वी वाटचाल करीत आहेत. या सुलाखे संकुलात सुमारे ४,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.कै. काकासाहेब सुलाखे यांनी शैक्षणिक क्षेत्रात नव्हे तर अनेक विविध क्षेत्रात स्वकर्तृत्वाने ठसा उमटविला. प्रामुख्याने बार्शीतील श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी, सार्वजनिक वाचनालय, महिला मंडळ, अनाथ विद्यार्थी गृह, समर्थ व्यायाम शाळा इ. बार्शीतील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉमर्स कॉलेजला भरघोस देणगी देऊन त्यांच्या निर्माणास हातभार लावला. कै. काकासाहेबांची जनकल्याणाची तळमळ वाखाणण्याजोगी निश्चितच आहे.

कै. काकासाहेबांनी परिश्रमाने, अभ्यासाने, उदारतेने, त्याग भावनेने प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटविला होता. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सध्याचे विश्वस्त वाटचाल करीत आहेत.


सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा '



* शुभेच्छुक *
श्री. शिवाजी दगडू गलांडे,
श्री. तानाजी शिवाजी गलांडे,
ॲड. संभाजी शिवाजी गलांडे
३८४७, भवानी पेठ, बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !



Mob. : 9767833939
9673753939
* शुभेच्छुक *
ॲड. अमोल एन. अलाट
M.A.,LL.B.
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ऑफिस : शिवतेज, शिवाजी नगर, माऊली चौक, देशमुख प्लॉट, अलिपूर रोड बार्शी - ४१३४११, जि. सोलापूर.

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



* शुभेच्छुक *
सौ. ज्योती व श्री. दयानंद श्रीरंग रेवडकर
* मुख्याध्यापक– वखारिया विद्यालय, उपळे दुमाला, ता. बार्शी, जि. सोलापूर
* सचिव– लायन्स क्लब बार्शी रॉयल व सदस्य, वृक्ष संवर्धन समिती बार्शी

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

अध्यक्ष — श्री. भगवान जाधव
सचिव — सौ. सविता जाधव
उपाध्यक्ष — श्री. गणेश रोडे

ज्योतिर्लिंग स्पोर्टस् क्लब
कराटे/बॉक्सींग/वुशू/स्केटिंग क्लासेस
८४५ क्रांतिसिंह नगर उपळाई रोड बार्शी.
मो. ८८३०७६५५००.,७९७२०६३०२२.

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी
पी.सी.आय.न्यु दिल्ली, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, एम.एस.बी.टी.ई. मुंबई व DBATU विद्यापीठ लोणेरे, रायगड संलग्नित
Choice Code : 650482310/650482311T



B. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण (PCB/PCM)
• MHT CET किंवा NEET आवश्यक
कालावधी ४ वर्ष

D. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण
• PCB/PCM
कालावधी २ वर्ष

बार्शी तालुक्यातील सर्वात पहिले औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक महाविद्यालय प्रवेश देणे चालु आहे.



शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये ५३ विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट

कॉलेजची वैशिष्ट्ये :
• सुसज्ज इमारत • सुसज्ज ग्रंथालय
• अत्याधुनिक लॅबोरेटरी व कॉम्प्युटर लॅब • वैयक्तिक लक्ष
• कॉलेज बस ची सुविधा • शासनाच्या ई.बी.सी./स्कॉलरशिपची सुविधा उपलब्ध
• स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन (M.Pharm DPEE) Workshop Seminar चे आयोजन
• खाजगी व्यावसायिक कंपन्यांकडून (CSR Fund) शिष्यवृत्तीची सोय.

व्यावसायिक संधी
▪ स्वत:चे मेडिकल शॉप
▪ मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह
▪ हॉस्पिटल फार्मासिस्ट
▪ क्लिनिकल फार्मासिस्ट
▪ औषध कंपन्यामध्ये जॉब
▪ पुढील शिक्षण थेट द्वितीय वर्ष बी फार्मसी/एम. फार्मसी

For more details, please visit : www.sojarcop.edu.in
E-mail ID : sojarcop@gmail.com
बार्शी–कुर्डूवाडी रोड, खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर

अधिक माहिती व प्रवेशासाठी पुढील QR Code Scan करुन ग्रुप जॉईन करा.
Admissions Helpline No.
02184-297000, 9923332316
8888178918, 9579868028

Sameer M Waykule
9850798249
Ashwini Sameer Waykule
9588694076
ashwavishwa@gmail.com



Ashwa Wishwa
Builders & Devlopers
CIN - U45203PN2022PTC215356 GST NO.: 27AAXCA7555JIZU
Uplai Road, 846 Saibal Nagar, Waykule Plot, Barshi, Dist. Solapur



Revered Prof (Dr.) Vishwanath D Karad
Founder & Chief Patron
MAEER'S MIT Group of Institutions, Pune

* शुभेच्छुक *
दै. तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !
MAEER'S
MIT COLLEGE OF RAILWAY ENGINEERING AND RESEARCH, BARSHI
ADMISSIONS OPEN 2026-27

B.Tech
• Artificial Intelligence & Data Science Eng.
• Civil Eng.
• Computer Science & Eng.
• Electronics & Computer Eng.
• Electronics & Telecommunication Eng.
• Mechanical and Rail Eng.

Diploma
• Civil Eng.
• Computer Science & Eng.
• Electronics and Telecom. Eng.
• Mechanical Eng.

DTE CODE: EN-06901
>> रेल्वे क्षेत्रातील उज्ज्वल करिअरसाठी उत्तम संधी
>> अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग
>> आधुनिक प्रयोगशाळा व उत्तम पायाभूत सुविधा
>> 100% प्लेसमेंटसाठी मार्गदर्शन व सहकार्य
ADMISSION HELPLINE: +91 8459967882
Website: www.mitcorer.edu.in

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



|| विना सहकारी नाही उध्दार ||
सहकार क्षेत्रातील ७७ वर्षातील विश्वसनीय वाटचाल
नोंदणी क्र. व स्थापना-सी.११६९ दि.८/३/१९४९
श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी.
२५४९१/१ड, जामगांव रोड, बार्शी, जि. सोलापूर फोन (०२१८४) २२२४६०

* ठळक वैशिष्ट्ये *
१) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., डिलरशीप १९६५ पासून
२) बार्शी पेट्रोल पंप स्थापना सन १९६७ (५८ वर्षाची विश्वसनीय परंपरा)
३) रास्तभाव धान्य दुकान स्थापना १९७० पासून
४) जामगांव पेट्रोल पंप स्थापना २००७ (१८ वर्षांची विश्वसनीय परंपरा)
५) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., (वाहतुक कॉन्ट्रॅक्टर सन २००७ पासून)
६) शासकीय व निमशासकीय योजना तालुक्यात विश्वासाने राबविणारी संस्था
७) कमर्शियल इंडेन गॅस विक्री केंद्र २०१८ पासून
८) नियोजित जामगांव पंप सी.एन.जी. व चार्जिंग स्टेशन

श्री. आनंद मो. कुलकर्णी – चेअरमन
श्री. उमेश शि. ठोंबरे – व्हा. चेअरमन
श्री. डॉ. बी. वाय. यादव – संचालक
श्री. नंदकिशोर ना. देशमुख – संचालक
श्री. रामचंद्र भ. गोरकर – संचालक
श्री. शब्बीर अ. तांबोळी – संचालक
श्री. देवेंद्र दत्तात्रय धेंडुळे – संचालक
श्री. अरुण त्र्यंबक देशमुख – संचालक
सौ. माधुरी सु. गोलकोंडा – संचालक
सौ. भावना भा. नाईकवाडी – संचालक
श्री. अनिल द. खजानदार – स्वीकृत संचालक
श्री. रविंद्र मा. माचवे – व्यवस्थापक
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद





# गडकरीसाहेब अन् देवाभाऊ; सोलापूरची भाग्यरेषा बदलणारे नेते!





**सोलापूर जिल्ह्यात आगामी ३ वर्षात १ लाख कोटींची विकासकामे करणार असल्याचा संकल्प केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी १४ मे २०२६ रोजी श्री स्वामी समर्थांच्या अक्कलकोट नगरीत सोडला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सोलापूरसाठी राज्याच्या तिजोरीतून विविध विकासकामांसाठी मुबलक निधी देण्याचा सपाटा लावल्याने केंद्रीय मंत्री गडकरी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा भविष्यकाळ उज्वल ठरणार आहे. यामुळेच या जोडगोळींस राजकीय गोटातून भाग्यरेषा बदलणारे नेते म्हणून संबोधले जाते.**

ना. गडकरींनी जिल्ह्यात विविध महामार्गाचे नेटवर्क उभारल्यानंतर शहरातील विमानतळाचा महत्वाचा विषय मुख्यमंत्री फडणवीस यांनीच मार्गी लावला आहे. सोलापुरात यामुळे रोजच विमानांची उड्डाणे सुरू झाली आहेत. गोवा- मुंबईनंतर आता पुणे, तिरूपती, हैदराबाद आदी ठिकाणीही विमानसेवा लवकरच चालू होणार आहे. यानंतर आयटी पार्कचा विषय अंतिम टप्प्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोलापूरकरांना प्रतीक्षा लागून राहिलेल्या या आयटी पार्कसाठी होटगी रोड येथील पाटबंधारे विभागाची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला विनामोबदला देण्याचे आदेश नुकतेच काढले आहेत. या आदेशामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्याने आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्यालाही मोठे यश आले

पाईपलाईनचा विषय असो अथवा अरण तीर्थक्षेत्र विकास अशी नाना प्रकारची विकासाची कामे मुख्यमंत्री देवाभाऊंमुळे सोलापुरात होत आहेत. यातील काही कामे चालू आहेत, काही पूर्ण झाली असून, काही विकासकामांचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी संकल्प सोडला आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही याच धर्तीवर सोलापूरसाठी विकासकामे झाली आहेत. २०१४ पर्यंत जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ५६५ किमी होती, ती आता १,७५० किमीपर्यंत वाढली आहे. ५२ हजार कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन झाले असून, त्यातील बहुतेक कामे पूर्ण झाली आहेत. आता नव्याने २७८४ कोटींच्या पाच कामांची घोषणा करण्यात आली आहे. तर एक लाख कोटी रुपयांची कामे पाच वर्षांत पूर्ण करण्याचा संकल्प आहे. जिल्ह्यात १२ हजार कोटींचा पालखी मार्ग ८०% पूर्ण झाला असून, मार्गावरील ४६ तलाव बांधले गेले आहेत. शेती व जलसंवर्धनाबाबत विचार केला तर सोलर पंप व ड्रिप सिंचनामुळे




दोन्ही नेते अगदी शब्दाचे पक्के आहेत; ते पोकळ आश्वासन देत नाहीत अन् त्यांच्या हातून एखादे काम होत नसेल तर पटकन हे काम होत नाही; असे स्पष्ट बोलतात. त्यांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे सोलापूर जिल्ह्याला आजतागायत अब्जावधींचा निधी मिळून शहराचा कायापालट होताना दिसून येत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अपेक्षेपेक्षा, मागणीपेक्षा जास्तीचा निधी या दोन बड्या नेत्यांमुळे सोलापुरात येत आहे. ना. गडकरींनी अक्कलकोट येथील जाहीर सभेत बोलताना स्पष्टपणे सांगितले होते की, येत्या तीन वर्षांत एक लाख कोटी रुपये खर्च करून सोलापूर जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे निर्माण केले जाईल. सुरत- चेन्नई महामार्गामुळे जिल्ह्याचे चित्रही आता बदलणार असून, जिल्हा देशाच्या मध्यभागी असल्याने तो आगामी काळात देशाचे लॉजिस्टिक हब म्हणून नावारूपास येईल.

जिल्ह्यात ३४ विकासकामे मंजूर असून, त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली आहेत, १९ कामे प्रगतीपथावर आहेत. नव्याने २ हजार ७८४ कोटींच्या पाच कामांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अक्कलकोट- मोहोळ- बसमतनगर मार्ग, रेल्वे उड्डाणपूल, बोरी नदीवरील पूल यांचा समावेश आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात आमागी ३ वर्षात अजून एक लाख कोटी रुपयांची विकासकामे पूर्ण करण्याचा त्यांची त्याचवेळी संकल्प सोडला आहे. येथील आमदार, खासदारांच्या अपेक्षेपेक्षा जास्त निधी देण्याचा माझा कायम प्रयत्न राहणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली होती. याच धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही सोलापूर जिल्ह्याच्या विकासकामासाठी निधी देण्यात मोठे योगदान आहे.



अविनाश गायकवाड
भ्र. ९४२१८७६३४०

आहे.

मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतल्यानेच पंढरी नगरीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी ३९९३.९० कोटीची शिखर समितीची अंतिम मान्यता मिळाली आहे. यामुळे पंढरपूरचे श्री विठ्ठल मंदिर धार्मिक पर्यटन म्हणून लवकरच विकसित होणार आहे. आषाढी यात्रेनंतर पंढरीत कॉरिडॉरचे कामही चालू होणार असल्याची माहिती मिळाली. उजनी जलपर्यटनाचा विषय जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्या अजेंड्यावर आहेच. या विषयालाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखविला असून, या जलपर्यटनाचे कामही लवकरच होण्याचे संकेत आहेत.

बोरामणी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विषयही मुख्यमंत्री फडणवीस यांनी चांगलाच मनावर घेतला आहे. येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये इंजिनिअरिंगसाठी मान्यता देण्यात आली आहे. उड्डाणपुलाच्या विषयाला गती दिल्याने येत्या काही दिवसात हाही विषय मार्गी लागत आहे. उजनी धरण ते सोलापूर अशी दुहेरी

शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते. पंढरपूर रिंग रोड, कोल्हापूर रिंग रोड, अक्कलकोट-दुधनी रस्ता यांसारख्या कामांना मंजुरी दिल्याचे त्यांनी नुकतेच जाहीर केले. दरम्यान, विकासकामांमध्ये राजकारण न करता सर्व समाजघटकांना समान लाभ मिळावा, हा या दोन्ही नेत्यांचा उद्देश असल्याचेही यावरून दिसून येते.

जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्ते विकास प्रकल्पांचे यावेळी भूमिपूजन झाले. एकूण २७८४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये हसापूर ते बद्धाड रस्त्यासाठी १५५२ कोटीचा निधी, वागदरी- अक्कलकोट- तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण, या रस्त्याची लांबी ४७.६६ कि.मी. असून प्रकल्प खर्च ३५३ कोटी रुपये आहे. मोहोळ- बसवनगर- वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण रस्त्याची लांबी ८२.०० कि.मी. असून प्रकल्प खर्च ७५६ कोटी रुपये आहे. दुधनी येथे रेल्वे उड्डाण पूल बांधकाम तसेच रा.म.क्र. १५० ई च्या उर्वरित ४.१२२ कि.मी. रस्त्याचे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करण्यात येणार असून प्रकल्प खर्च ९७ कोटी रुपये आहे. रा.म.क्र. १५० ई अंतर्गत बोरी उमरगे बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात येणार असून ०.७५ कि.मी. असून प्रकल्प खर्च २६ कोटी रुपये आहे. प्रकल्पांची एकूण लांबी १७१ कि.मी. असून एकूण प्रकल्प २७८४ कोटी रुपये आहे.

या विकासकामांमुळे सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व अधिक सक्षम होऊन नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची उपलब्ध होणार आहे. एकंदरीत, प्रस्तुत पॅकेज सुरत चेन्नई फील्ड कॉरिडॉरचा एक भाग आहे. यामुळे ३९० किलोमीटर सहा तासाच्या प्रवासाच्या वेळेचे बचत होणार आहे.

वन्यजीव संरक्षण उपाययोजनामुळे प्राण्यांच्या सुरक्षित प्र खात्री होईल आणि अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थक्षे पोहोचणे सुलभ होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ भाग सोलापूरसाठी अतिरिक्त रिंग रोड म्हणून काम करेल. कोंडी प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर कमी होईल. जिल्ह्यात कृषी पर्यटन उद्योग आणि रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

## ना. गडकरींच्या कामाची विरोधकांकडूनही तारीफ

खासदार प्रणिती शिंदे यांनी ना. गडकरींच्या विकासकामांची अक्कलकोट नगरीतील १४ मे २०२६ च्या जाहीर सभेतून मोठी तारीफ केली होती. त्या म्हणाल्या होत्या की, ना. गडकरी यांच्या कामाची पध्दत वेगळीच आहे. राजकीय मतभेद न ठेवता विकासाचे राजकारण करणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री गडकरी यांची वेगळी ओळख आहे. आम्ही कोणतेही काम घेवून गेलो तरी आम्हाला विरोधी पक्षाचे आहे असे म्हणून न पाहता आमचे काम गतीने आणि वेळेत पूर्ण करण्याची खासीयत ना. गडकरी यांची आहे. अशा नेत्यामुळेच आम्हालाही नवीन उर्जा आणि हिंमत मिळत असल्याचे विचार खासदार प्रणिती शिंदे यांनी मांडले होते. खा. शिंदे यांचे अनुभवाचे बोल ऐकता आगामी ३ वर्षांत १ लाख कोटींच कायतर सव्वालाख कोटींचाही निधी जिल्ह्याला मिळेल, अशी आशा सोलापूरच्या जनतेला सध्यातरी लागली आहे.

## भविष्यात सोलापूर लॉजिस्टिक हब

राज्यातील महत्त्वाच्या महामार्ग प्रकल्पांचे शि म्हणून ओळख असलेल्या ना. गडकरी यांच्या सोलापुरातील हजारो कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे भूमिपूजन झाल्याने जिल्ह्याला विकासाची दिशा मिळणार आहे. सुरत- चेन्नई महामार्ग हा स जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प ठरत असून, १५ हजार कोटी रुपयांच्या या महामार्गामुळे म गुजरात, कर्नाटक आणि दक्षिण भारतातील राज संपर्क अधिक गतिमान होणार आहे. मालवा औद्योगिक गुंतवणूक आणि व्यापारासाठी हा म गेमचेंजर मानला जात आहे. इतकेच नाहीतर चेन्नई महामार्गामुळे जिल्ह्याचे चित्रही आता ब असून, जिल्हा देशाच्या मध्यभागी असल्या आगामी काळात देशाचे लॉजिस्टिक हब नावारूपास येईल.



# स्कंद पुराणातील ग्रंथात महात्म्य वर्णिलेल्या माढ्याची विठ्ठल मूर्ती



सोलापूर जिल्ह्यातील माढ्याच्या ऐतिहासिक विठ्ठल मूर्तीचे महात्म्य मोठे असून ते स्कंद पुराणात वर्णिली आहे. विठ्ठल मूर्तीबाबतची स्कंदपुराणातील लक्षणे, विजयनगर साम्राज्यातील तेनालीराम लिखित पांडुरंग माहात्म्यातील विठ्ठल मूर्तीची वर्णने, माढ्याचे संत सावता माळी यांनी केलेले विठ्ठल वर्णन इत्यादी पारंपरिक लक्षणांशी, संकेतांशी हुबेहूब जुळणारी विठ्ठल मूर्ती माढ्यात अवस्थित असल्याने संशोधकांमध्ये खऱ्या विठ्ठल मूर्तीवरून गेल्या काही दशकांपासून संदर्भीय द्वंद्व चालू आहे, परंतु अद्याप तरी त्यावर ठोस असे निर्णायक भाष्य झालेले नाही. तो या लेखाचा मूळ मुद्दाही नव्हे. मात्र माढ्यातील विख्यात विठ्ठल मंदिराच्या निर्माणावर व त्याच्या इतिहासकालीन ख्यातीवर अनेक समकालीन संदर्भ उपलब्ध आहेत.



शेखर म्हेत्रे, माढा
भ्र.-८६६९०८९४०७

मध्ययुगीन कालपटात धार्मिकदृष्ट्या व स्थापत्यीयदृष्ट्या इ.स.१७१० ते इ.स.१८९० हा कालखंड माढ्यासाठी सुवर्ण कालखंड. माढ्यातील प्राचीन मध्यकालीन उत्तरेश्वर- परमेश्वर शिवालय, मध्ययुगीन जगदंबा माढेश्वरी मंदिर व तद्नंतर विठ्ठल मंदिराचे निर्माणकार्य संपन्न झाले, इतिहासात ते आजच्या इतकेच प्रसिद्ध होते. माढ्यातील भुईकोटाचा निर्माता राजा रावरंभाजी उर्फ पहिल्या रावरंभा निंबाळकराचे इ.स.१७३६मध्ये माढ्यात निधन झाल्यानंतर रंभाजीची समाधी माढ्यातच उभारून करमाळा परगण्याची सर्व धुरा रंभाजीचा ज्येष्ठ पुत्र माहाराव रावरंभा (द्वितीय) जानोजी जसवंतराव अर्जुनबहाद्दर याचेकडे आली तर माढा परगण्याची धुरा रंभाजीचा तृतीय पुत्र सुलतानजी व चौथा सर्वात लहान पुत्र माहादाजीकडे आली.

महादाजीने इ.स.१७३०- ५०च्या सुमारास माढ्यातील श्रीविठ्ठल मंदिराची उभारणी करून माढ्याच्या स्थापत्य परंपरेत भर टाकली. विठ्ठल मंदिराच्या व्यवस्थेसाठी व उत्पन्नासाठी महादजीने माढा परगण्यातील रणदिवेवाडी भागात जमीन दान दिली ती आजही विठ्ठल मंदिराच्या नावे आहे. मंदिराच्या गर्भगृहाजवळ महादजीचा शिलालेख असून त्यामध्ये देवनागरी- मोडीतून रावमाहादाजी निंबाळकर शेरणांगत पांडुरंग चरणी असा लेख कोरला आहे जो महादजी निस्सीम पांडुरंग भक्त असल्याचे स्पष्ट करतो. महादजीच्या काळातच माढेतील विठ्ठलाची चर्चा सर्वत्र होती, अगदीच छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती थोरले शाहू महाराजांच्या दरबारातील व छत्रपतींच्या प्रधानसेवकाकडील कारभारी मंडळींनी देवदर्शनासाठी माढ्यातील भुईकोटात मुक्काम केल्याच्या नोंदी आहेत. छत्रपती दरबार व हैद्राबादच्या असफजाही राज्यातील व्यवहारांचा आढावा देणाऱ्या एका समकालीन पत्रव्यवहारातील नोंदीनुसार १७ रमजान ११९५ हिजरी अर्थात सप्टेंबर १७८१च्या १ ल्या आठवड्यात गणेशोत्सवाच्या दरम्यान मराठेशाही फौजा मैसूरच्या सुलतानाच्या पाडावासाठी पंढरपूर- माढा- तुळजापूर मार्गे कर्नाटककडे निघाल्या होत्या. छत्रपतींच्या प्रधानसेवकाकडील उर्फ पेशव्याकडील कृष्णराव बल्लाळ व इतर काही सरदार हे पुणे व बारामतीवरून फौज घेऊन रवाना झाले होते, ते पंढरपूरमार्गे माढ्यात मुक्कामास आले. यावेळी या फौजेचा तळ तत्कालीन माढा या परगण्याच्या ठिकाणी पसरला होता. त्यावेळी माढ्याच्या भुईकोटात हे सरदार मुक्कामी थांबले.



माढा

युद्धात जाण्यापूर्वी कृष्णराव बल्लाळने येताना पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेतले व तसेच फौजेसह माढ्याकडे वळाला.कृष्णराव व इतर सरदार व फौजफाट्यास माढ्यातील माढेश्वरी मंदिर व पांडुरंग मंदिराचे दर्शन महादजी निंबाळकर व भगवंतराव निंबाळकराने घडवून दिले. महादजी हा हैद्राबादचा निजाम असफजहा, सातारकर छत्रपती व विशेषतः कोल्हापूर/करवीरचे छत्रपती व पेशवे यांच्याशी चांगले संबंध ठेवून होता.तत्कालीन राजकारणातही त्याने स्वत:चे महत्त्व अधोरेखित केले होते.पेशवे व ताराबाई यांतील वादात माहादाजीने सामोपचाराची महत्वाची भूमिका निभावली, तर मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरचे शिंदे व होळकर यांच्या कलहात महादजीने सामोपचार घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्याला यश आले नाही. इ.स.१७४४ मध्ये रावरंभा जानोजी व त्याचे पुत्र महाराव, धारराव हे हैद्राबादच्या निजामासह माढा व रोपळे येथील भुईकोटात मुक्कामी होते, या काळात महाराव याचा विवाह महादजी शिंद्यांच्या भगिनी आनंदीबाईसह झाला, आनंदीबाई ही अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची दिसते, माढेश्वरी मंदिराचा व विठ्ठल मंदिराचा काही भाग आनंदीबाईनेच जीर्णोद्धारीत केला आहे. वारीला संरक्षण देण्याची तजवीज आनंदीबाईनी केली होती, तिच परंपरा माढ्यात आजही दृग्गोचर होते.

इ.स.१७६१ मधील पानिपतच्या रक्तरंजित युद्धावेळी जानोजी निंबाळकराने आपलेकडील एक तुकडी सदाशिवभाऊकडे सहाय्यार्थ पाठवून दिली. पुढील काळात जानोजी माढ्यात राहून विठ्ठलाची सेवा करत होता. त्याच्यावर दाक्षिणात्य वैष्णव संप्रदायाचा प्रभाव असल्याने तो विठ्ठल भक्त असणे स्वभाविकच! तामिळनाडूच्या वैष्णवांशी निकटता असल्याने जानोजी विठ्ठलाकडे अधिक आकर्षित झालेला, त्याचा उल्लेख दाक्षिणात्य वैष्णवांच्या तामिळी व संस्कृत साहित्यात आदरपूर्वक केला असल्याचे आढळते. सीना नदीकाठच्या परिसरात परंपरागत चालत आलेल्या शैव, नाथ, शाक्त, वैष्णव व मध्ययुगीन सुफी संप्रदायांत ऐक्य साधण्याचा प्रयत्न त्याने या विविध सांप्रदायांतील लोकांना एका बैठकीत आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांतून दिसतो, शैव मंदिराच्या शेजारी वैष्णव मंदिर असणं त्याच्या शेजारी लागूनच सुफींचा रहिवास असणं व बहुसंख्य हिंदूंनी मुस्लिम उरसांमध्ये सहभागी असणं- अगदी आजही- हे त्याचेच द्योतक होय.शिवकालीन संत माणकोजी बोधले व त्यांचा समतावादी वारसा चालविणारे त्यांचे कुटुंबीय यांना जानोजी व आनंदीबाईने संरक्षण दिले होते. वाकाव (ता. माढा) येथे बोधले कुटुंबास निंबाळकरांनीच वसवले होते. पुढे इ.स.१७८५ दरम्यान कर्नाटकहून परतताना रघुनाथराव,सवाई माधवराव हे सोनारी धर्मस्थानास भेट देऊन परंडा,रिधोरे,पापनस,वडशिंगे येथे मुक्कामास थांबले यावेळी ते भगवंतराव निंबाळकराच्या आमंत्रणावरून माढ्यात आले यावेळी त्यांनी विख्यात माढेश्वरी व विठ्ठल मंदिरास भेट दिली असण्याची शक्यता वाटते.



पंढरपुर

विठ्ठल मंदिराच्या आवारातच एक भव्य समाधी आहे,समाधीच्या आतील शिलालेखावर श्री विठ्ठलचा आ र श.१८०९ ही अक्षरे कोरलेली आहेत, याचा अर्थ ही समाधी १८८७ मध्ये बांधलेली असून एका निस्सीम विठ्ठलभक्ताची असल्याचे निर्देशित होते व ती महादजी निंबाळकर याचीच असावी असे मला वाटते.महादजीला संतती नव्हती परंतु त्याने परांडा येथील आपल्या भाऊकीतून एक पुत्र दत्तक घेऊन त्याचे विठ्ठल असे नामकरण केले, महादजी इ.स.१७९५-१८१० दरम्यान मरण पावला, पुढे या विठ्ठल निंबाळकर वा सुलतानजीचा वारस रामराव याने विठ्ठल मंदिराच्या आवारात महादजीची ही समाधी उभारली जी आजही सुस्थितीत आहे.

**इतिहासकार व संशोधक डॉ. रा. चिं.ढेरे यांनी विठ्ठल मंदिरातील मूर्तीबद्दल महत्त्वपूर्ण संशोधनातू मांडलेले मुद्दे...**

**ऐतिहासिक महत्त्व :**

**१)** माढा येथील विठ्ठल मंदिरातील शिलालेख अत्यंत प्राचीन आहेत। संशोधकांच्या मते, ऐतिहासिक काळात आक्रमक किंवा इतर कारणांमुळे विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरवरून अनेकदा सुरक्षिततेसाठी स्थलांतरित करण्यात आली होती, त्यापैकीच एक माढा हे ठिकाण असू शकते.

**२) स्थानिक वारसा:** सध्याही माढा येथील विठ्ठल मंदिरात ही प्राचीन मूर्ती विराजमान असून, या ऐतिहासिक संदर्भामुळे माढ्याला वारकरी परंपरेत एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे.

**३)ऐतिहासिक नोंदी आणि बांधकाम- निंबाळकरांचे योगदान** : माढ्याचे जहागीरदार राजे रावरंभा निंबाळकर यांनी बांधल्याचे मानले जाते।

**४) शिलालेख पुरावा:** मंदिराच्या उंबरठ्यावरील पायरीवर राव महादाजी निंबाळकर शेरणागत पांडुरंग चरणी असा स्पष्ट ऐतिहासिक उल्लेख कोरलेला आढळतो. हे बांधकाम साधारणपणे सन १७३० ते १७६० च्या दरम्यान झाले असावे.

**५) शिखराचा अभाव:** या मंदिराचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे याला इतर हिंदू मंदिरांप्रमाणे पारंपारिक शिखर नाही.

मंदिराच्या चारही बाजूंना मशिदीच्या मिनारांसारखे वेगळे बांधकाम पाहायला मिळते, जे तत्कालीन लष्करी किंवा सुरक्षेच्या कारणास्तव केले असावे।

**६) परिसर:** या मंदिराच्या अगदी डाव्या बाजूला श्री मल्लिकार्जुन देवाचे प्राचीन मंदिर असून, तेथील शिलालेखही अतिशय जुने आहेत।

**७) कूट श्लोकाचा गूढ संदर्भ :** मूर्तीच्या हृदयावर एक श्लोक कोरलेला आहे। डॉ. ढेरे यांच्या संशोधनानुसार, हा श्लोक मस्कंद पुराणातील पांडुरंग माहात्म्यफ या ग्रंथातील एका कूट श्लोकाशी तंतोतंत जुळतो। हाच पुरावा ढेरे यांनी ही मूर्ती मूळ पंढरपूरची आद्य मूर्ती असल्याचे सिद्ध करण्यासाठी वापरला होता.

**९) सावता माळी यांच्या अभंगाचा संदर्भ:** संतश्रेष्ठ सावता माळी यांनी अभंगांमध्ये विठ्ठलाच्या ज्या रूपाचे वर्णन केले आहे, त्या वर्णनाशी आणि पद्मपुराणातील लक्षणांशी माढ्यातील मूर्तीचे रूप तंतोतंत साम्य दाखवते, अशीही एक स्थानिक आख्यायिका व श्रद्धा आहे.

---



# शिकरण... एक दुर्लक्षित पक्वान्न !

कृष्णकेशव

नेहमीप्रमाणे सकाळी मोबाईल घेऊन आज कोणत्या गृपवर कुणाला बड्डेच्या शुभेच्छा द्यायच्या हे सर्च करत बसलो होतो. इतक्यात किचनमधुन सौ. चा आवाज आला अहो... आत्ताच मितवाचा फोन आला होता (मितवा म्हणजे आमची लेक!) संध्याकाळी तिचे सासरे आपल्याकडे जेवायला येणार आहेत. मी काय म्हणते... घरात परवा आणलेली केळी तशीच पडलीत. त्याची एखादी नवीन डिश करूयात का? तेवढं जरा यु ट्यूबवर एखादी रेसिपी बघून मला फॉरवर्ड करा ना! मी जरा लक्ष्मी निवास सिरियल बघतेय...खूप इंटरेस्टिंग स्टेजला आहे.

माझ्यासाठी तिच लक्ष्मी निवास असल्यामुळे मला ही सुचना कम ऑर्डर मान्य करण्याशिवाय पर्यायच नव्हता. मी नाईलाजाने बड्डे सोडून मुकाट्याने केळ्याची एखादी नवी रेसिपी सर्च करायला लागलो. यु ट्यूबचं एक बर असत. एखादी रेसिपी सर्च करायला सुरवात केली की शंभर रेसिपी आपल्या अंगावर येऊन आदळतात. म्हणजे पुन्हा सर्च करणं आलच!

मी रेसिपीज बघायला सुरवात केली आणि एक एक रेसिपी बघता बघता बनाना मिल्क शेक या डिशच्या रेसिपीवर नजर गेली. छानपैकी येवला पैठणी नेसलेल्या आणि अंगावर ढीगभर दागिने घालून एक मॅडम उच्चभ्रू मॅडम ती प्रेझेंट करीत होत्या! प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये किंवा पातेल्यात पाव लिटर दूध घ्या. आवश्यक असेल तेवढी दोन किंवा तीन साधारण काळी पडलेली केळी घेऊन छोटा चॉपर किंवा सुरीने त्याच्या चकत्या करा आणि त्या चकत्या दुधाच्या भांड्यात टाकून त्या चमच्याने किंवा बोटाने फिरवून कुस्करा. त्यात आवश्यक वाटल्यास एक किंवा दोन चमचे साखर टाकून ते मिश्रण चमचाने पुन्हा दोन मिनिटे फिरवा.

दोन मिनिटात आपलं बनाना मिल्क शेक तयार होईल. मग एखाद्या छानशा बाऊलमधून तो सर्व करा! वरून बदाम आणि पिस्त्याची पेरणी झाल्या ते आणखी स्वादिष्ट होईल.

मी कपाळाला हात लावला. आपलं नेहमीच शिकरण ही बाई बनाना मिल्क शेक म्हणून यु ट्यूबवर प्रेझेंट करत होती आणि तिच्यासारख्याच मॉडर्न सुगरणी त्यावर लाईकचा ठसा उमटवत होत्या. मुळात शिकरणाचं बनाना शेक असं विंग्रजी बारस करणं हाच त्या शिकरणाचा घोर अपमान आहे. केळ्याच फक्त आणि फक्त शिकरणच होऊ शकत. शिकरण या नावात जी स्निग्धता आणि लडिवाळपणा आहे तो असा केळ्याला कुठलाही शेक देऊन चाखता येत नाही. त्यात केळ्याच्या चकत्या करून खाणं हाच केळ्याचा घोर अपमान आहे. केळी ही आधीच मऊ लुसलुशीत आणि शेलाट्या बांध्याची...तिच्या चकत्या करणं म्हणजे तिच्या या सौंदर्यवत्तेवर काळं फासण्यासारखं आहे.

शिकरणासाठी केळ त्याची संपूर्ण साल काढून पाचही बोटांनी (चमचाने नव्हे) त्याचा गर बोटांना चिटकेपर्यंत कुस्करायच असतं. एकदा या कुस्करण्याचा खालचा साफनीट लागला की शिकरणाची ही पुढची मैफल जमलीच म्हणून समजा... पण आमच्या लहानपणी या शिकरणाची पहिली ओळख मात्र जिभेनं न होता कानानं व्हायची!

लहानपणी मामाची बायको सुगरण...रोज रोज पोळी शिकरण हे गाणं ऐकल की, शिकरण खाण्यासाठी कधी एकदा मामाच्या गावाला असं वाटायचं आणि मग शाळेला उन्हाळ्याची सुट्टी लागली की या शिकरणासाठी आईबरोबर मामाचं गाव गाठायच. आजकाल मात्र मामा- मामी आपल्याच गावात असतात आणि भाच्यानं शिकरणाचा अगदीच हट्ट धरला तर ऑनलाईन ऑर्डर देऊन मोकळे होतात. (आजकालचे भाचेही शिकरणाचा हट्ट धरण्याची शक्यता तशी कमीच!) तसं शिकरण हे एकला चलो रे या बाण्याचं! एखादी चटणी किंवा लोणच्याची एखादी फोड यांची सोबत त्याला पुरेशी असते. कोशिंबीर, भजी पापड वरण भात किंवा दहीभात असला लवाजमा त्याला अजिबात चालत नाही. ज्याला हे असलं दरबारी जेवणं आवडत त्यानं शिकरणाच्या वाटेला जाऊ नये असं माझं स्पष्ट मत आहे! आणि शिकरणाचं शिळ्या पोळीशी जेवढं मेतकुट जमत ते गरम पोळीशी अजिबात जमत नाही.

एखाद्या नवऱ्याच दुसऱ्या बायकोवर (दुसऱ्याच्या नव्हे!)जसं जास्त प्रेम असतं तसा शिकरणाचही शिळ्या पोळीवर जास्त जीव असतो.

सकाळी नाष्टा केलेला नसावा..शिळ्या पोळ्या उरलेल्या असाव्यात आणि सायीच्या दुधात केलेलं शिकरणं असावं.

एखाद्या टळटळीत दुपारी हे शिकरण ओरपायला सुरू करून शिकरणानं भांड्याचा तळ गाठला की खाद्यानंदी टाळी लागणं म्हणजे काय याचा आपल्याला अनुभव यायला लागतो. काहीं काहीं पदार्थाच्या वेळा ठरलेल्या असतात. त्यावेळी त्या पदार्थाची जी चव लागते तिची सर इतरवेळी येत नाही!

वाफाळलेली इडलीचटणी जशी सकाळी... चमचमीत चाट जसं संध्याकाळी तसं शिकरण हे दुपारीच! इतरवेळी ते खाणं म्हणजे नुसतं उदरभरणं!!

ह्या शिकरण उत्सवाचं परमोच्च सुख मात्र दुपारच्या वामकुक्षीनंतर मिळतं. भांडभर शिकरण फस्त केल्यानंतर डोळ्यावर जी सुखद सुस्ती येते तिची सर विलायची जायफळ घातलेल्या कोणत्याही बासुंदी, श्रीखंडाला येत नाही. मग बेडपर्यंत जाण्याचही त्रास न घेता डोक्याखाली हात घेऊन जमिनीवरच ताणून दिली की, जी झोप लागते तिच्यापेक्षा स्वर्गसुख स्वर्गसुख म्हणून जे काहीं असतं ते वेगळं काहीं असेल असं वाटत नाही... तुम्हालाही तसचं वाटतय ना?

# औषधनिर्माण शास्त्रः ज्ञान, सेवा, संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी दिशा









प्रा. डॉ. सुजित करपे


आरोग्य सेवा क्षेत्रात फार्मसी हा आज केवळ औषध निर्मिती पुरता मर्यादित राहिलेला नाही. आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ, बायोटेक्नॉलॉजी, डेटा अनालिटिक्स आणि संशोधन यांच्या संगमामुळे फार्मासिक क्षेत्राला नवी ओळख मिळत आहे. भारत सरकारच्या विकसित भारत २०४७ या संकल्पनेला बळ देण्यासाठी सक्षम कौशल्यपूर्ण आणि संशोधनाभिमुख फार्मासिस्ट घडवण्याची जबाबदारी फार्मसी शिक्षणावर आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे महाविद्यालय आज गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि उत्कृष्ट प्लेसमेंट साठी ओळखले जाते.

*** २०२६ च्या नवीन फार्मसी अभ्यासक्रम - कौशल्यावर भर-**

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने (PCI) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी केंद्रित, (Outcome Based Education) अनुभवाधरित शिक्षण, (Experimental Learning) प्रकल्पाधारित अध्ययन, (Project Based Learning) संशोधन आणि कौशल्य विकासाला अधिक महत्त्व दिले आहे.

नवीन अभ्यासक्रमात आरटीफिशियल इंटेलिजन्स (AI) मशीन लर्निंगचा औषध निर्मितीतील वापर, डिजिटल हेल्थ, इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड, फार्मकोविजिलन्स, ड्रग सेफ्टी मॉनिटरिंग, क्लीनिकल रिसर्च, क्लिनिकल डाटा मॅनेजमेंट, क्वालिटी अश्शुरन्स, रेग्युलेटरी अफेयर्स, मेडिकल रायटिंग, इंटेलेट्युअल प्रॉपर्टी राइट्स, इनोव्हेशन, इंटर प्रिनॉरशिप, स्टार्टअप कल्चर, इंडस्ट्री इंटरशिप, स्किल डेव्हलपमेंट आणि एम्प्लॉयबिलिटी एन्हान्समेंट या विषयांवर विशेष भर देण्यात आला आहे.

*** AI मुळे बदलणारे फार्मसी क्षेत्र-**

आज एआयच्या मदतीने नवीन औषधाचा शोध, औषधाचे डिझाईन, रोगांचे निदान, वैयक्तिक औषधोपचार, औषधांच्या दुष्परिणामाचे विश्लेषण आणि संशोधनाची गती अनेक पटीने वाढली आहे.

भविष्यात फार्मासिस्ट केवळ औषध विक्रेता नसून ए आय आधारित आरोग्य सल्लागार, संशोधक, डेटा विश्लेषक आणि हेल्थकेअर इन्व्हेटर म्हणून कार्यरत असतील.

*** रोजगाराच्या अमर्याद संधी -**

फार्मसी पदवीधरासाठी भविष्यात फार्मासिटिकल इंडस्ट्री, क्वालिटी अश्युरन्स (QA), कॉलिटी कंट्रोल (QC), प्रोडक्शन, रिसर्च अँड डेव्हलपमेंट (RD), रेगुलेटरी अफेयर्स, थॉमकोविजनस, क्लीनिकल रिसर्च, मेडिकल कोडींग, मेडिकल राइटिंग, हॉस्पिटल फार्मासिस्ट, कम्युनिटी फार्मासिस्ट, गव्हर्मेंट ड्रग इन्स्पेक्टर, गव्हर्मेंट फार्मासिस्ट, फूड अँड ड्रग ऍडमिनिस्ट्रेशन (FDA), फार्माको इकॉनॉमिक्स, बायोटेक्नॉलॉजी, डिजिटल हेल्थ कंपनी, एआय आधारित हेल्थ टेक कंपन्या तसेच स्वतःचा औषध व्यवसाय व स्टार्टअप इत्यादी क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत.

*** सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचे वैशिष्ट्ये -**

महाविद्यालयामध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संशोधन सुविधा, अनुभवी प्राध्यापक, व्यक्तिमत्व विकास, सॉफ्ट स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, प्लेसमेंट सेल, उद्योग भेटी, गेस्ट लेक्चर, करिअर गाईडन्स आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अध्यापन दिले जाते.

विद्यार्थ्यांना एआय टूल्स, डिजिटल फार्मसी, रिसर्च मेथडोलॉजी, सायंटिफिक राइटिंग, इंटरप्रिनरशिप, आणि इंडस्ट्री रेडी स्किल्स याचेही प्रशिक्षण दिले जाते. ज्यामुळे ते जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम बनतात.

ज्ञान, सेवा आणि नवोपक्रमाची परंपरा

संस्थापक अध्यक्ष माननीय श्री अरुण दादा बारबोले यांच्या दूरदृष्टीतून स्थापन झालेले सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षणाचे विश्वासार्ह केंद्र बनले आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांच्या मार्गदर्शनातून यशस्वीपणे विविध शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. महाविद्यालयाचे ध्येय केवळ पदवी प्रदान करणे नसून समाजाभिमुख, संशोधनक्षम, तंत्रज्ञान स्नेही, आणि नैतिक मूल्य जपणारे उत्कृष्ट फार्मासिस्ट घडविणे हे आहे. आजच्या एआय आणि डिजिटल आरोग्याच्या युगात ज्ञान, सेवा, संशोधन आणि नवोपक्रम या चार स्तंभावर उभे असलेले सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे महाविद्यालय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी करिअर घडवण्यास सक्षम करत आहे.

# सहकारातील शतकोत्तराकडे वाटचाल करणारी बार्शीतील श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. या संस्थेची यशोगाथा







शब्दांकन
अरुण बळप, बार्शी


श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी या संस्थेची स्थापना बार्शीतील नामवंत वकील व उद्योगपती कै. भगवंत उर्फ काकासाहेब सुलाखे यांनी ८ मार्च १९४९ रोजी केली. आजपावेतो संस्था ७८ व्या वर्षात दमदार पावलाने वाटचाल करीत आहे. याच संस्थेचे आधारस्तंभ म्हणून ज्यांचे नाव आजही आदराने घेते जाते असे आपल्या सर्वांचे पितृतुल्य नेतृत्व म्हणजे सहकार तपस्वी कै. ल.ग. तथा तात्यासाहेब देशमुख. यांचा जन्म बार्शीतील सराफी व्यावसायिक देशमुख घराण्यात दि. १४ सप्टेंबर १९२९ रोजी झाला व त्यांनी बार्शी शहरात जुन्या मॅट्रीक हे शिक्षण पूर्ण करुन वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी त्यांनी श्री भगवंत सहकारी या संस्थेत कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानीवडेकर यांचे मार्गदर्शनाखाली कामास सुरुवात केली.

लहान वयातच प.पू. गोळवलकर गुरुजी, स्वामी विवेकानंद, रमण महर्षी इ. सत्पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक साधा लहान स्वयंसेवक म्हणून व भगवंत सहकारीची नोकरी सांभाळून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सतत चालू ठेवले. भगवंत सहकारी संस्था ही आपले कुटुंबच आहे असे समजून संघाची अंगात असलेली शिस्त व कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानीवडेकर यांचे व्यवसाय चातुर्याच्या मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी या संस्थेचे सर्व सूत्रे सन १९६० साली एकहाती घेवून संस्थेचा कारभार यशस्वीपणे सुरु केला.

संस्थेच्या माध्यमातून विविध उद्योग व्यवसाय व प्रयोगशील उपक्रम राबवून संस्था हाच माझा प्रपंच अंगीकारुन ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले. त्यांचे बोलण्यातील स्पष्टपणा व व्यवसाय चातुर्य या बळावर त्यांनी संस्थेचे नांव सहकार क्षेत्रात पूर्ण महाराष्ट्र राज्यात परिचित करुन दिले. श्री भगवंत सहकारी या संस्थेचे सन १९६७ साली ग्राहक सहकारी संस्थेत रुपांतर करुन इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांची डिझेल, पेट्रोल व केरोसीनची डिलरशीप मिळवून सोलापूर, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यात व्यवसाय सुरु केला. तसेच किराणा भुसार, वह्या वितरण, सिमेंट, रासायनिक खते, प्रिटींग प्रेस, आईल मिल, दाळ कारखाना, यंत्रमाग व्यवसाय, दूध डेअरी, पतसंस्था, भगवंत बझार, शासनामार्फत बार्शी तालुक्यात कडबा तगाई, मोफत गहू वाटप केंद्र, प्रौढ शिक्षण केंद्र इत्यादी अनेक व्यवसाय ना नफा ना तोटा या भावनेतून सामाजिक बांधिलकी म्हणून चालू ठेवले होते.

सहकाराच्या माध्यमातून सामाजिक ऋण फेडता येत नाही म्हणून भारतीय संस्कार केंद्र या न्यासाची १९७४ साली स्थापना करुन अनेक सामाजिक शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविले व जनसामान्यपर्यंत संस्थेची ओळख निर्माण करुन दिली. संस्थेची वार्षिक उलाढाल २५ ते ३० कोटीपर्यंत नेवून संस्था कायम नफ्यात ठेवून व ऑडीट वर्ग 'अ' ठेवून संस्थेच्या सभासद व ग्राहक व हितचिंतकांसाठी अनेक उपक्रम राबवून त्यांचा फायदाच करुन दिलेला आहे. त्यामुळे आजही महाराष्ट्रात सहकार क्षेत्र किंवा धार्मिक क्षेत्र असो त्यामध्ये आजही कै. तात्यासाहेबांचे नावाचा उल्लेख आदराने केला जातो.

कै. तात्यासाहेब यांचे निधन २२ जून २०११ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वार्धक्यामुळे झाले व संस्था आधारहीन झाली. कै. तात्यासाहेब यांचे अंगी असलेल्या नेतृत्व गुणामुळे आज भगवंत सहकारी संस्थेची ७५ व्या वर्षाकडे वाटचाल सुरु आहे. कै. तात्यासाहेब यांचे नेतृत्वाखाली झालेली संस्थेची ६२ वर्षांच्या कामाची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने २०१२ साली संस्थेस 'आदर्श संस्था' हा पुरस्कार प्रदान केलेला आहे.

कै. तात्यासाहेब यांचे निधनानंतर संस्थेवर सन २०१३ साली आलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे संस्थेच्या बाबतीत राज्यभर अफवा, गैरसमज व संस्थेच्या कामकाजात अनेक हितचिंतकांनी निर्माण केलेले अडथळे यावर संस्थेच्या आजी, माजी संचालकांनी व सेवक वर्गाने एकत्रित बसून कै. तात्यासाहेब यांनी एवढ्या कष्टाने उभारलेली संस्था बंद पडू नये म्हणून प्रयत्न करुन एकविचाराने सन २०१४-१५ मध्ये संस्थेचे सर्व व्यवहार सुरळीत चालू केले असून संस्थेची सन २०२५-२६ अखेर उलाढाल १८ ते २० कोटींची असून संस्था सध्या 'ब' वर्गात आहे. तसेच संस्था सभासदांना याही वर्षी लाभांश वाटप करणार आहे.

तसेच संस्थेच्या जामगांव येथील पेट्रोल पंपाच्या जागेत नियोजित सीएनजी पंप व चार्जिंग स्टेशन तसेच बार्शी पेट्रोल पंपावरील सोयी-सुधारणा व चार्जिंग स्टेशन उभारणीचा मानस आहे. महाराष्ट्रामध्ये सहकाराची चळव सर्व सामान्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करणारी सहकार भारती या संस्थेने महाराष्ट्र राज्यभर सहकार चळवळी निस्वार्थ बुद्धीने केलेल्या कामाची पावती म्हणून सहकार महर्षी य पुरस्काराची सहकार तपस्वी कै. तात्यासाहेब देशमुख यांच्या कार्याची दाखल घेन सहकार महर्षी या ग्रंथात स्थान दिल्यामुळे पुढील पिढीस संस्थेस निस्वार्थी बुद्धीने काम केलेची आठवण कायम राहील.

संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री. आनंद कुलकर्णी (आंबेजवळगेकर), व्हा. चेअरमन उमेश ठोंबरे व सर्व संचालक तसेच व्यवस्थापक रवींद्र माचवे हे संस्थेचे कामकाज कसे वाढेल आणि कोणते व्यवसाय सुरु करावेत याचा विचार करत असून त्याला सर्व संचालकाचे सहकार्य मिळत आहे.


दै. सोलापूर तरुण भारत च्या ४२ व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
आनंद मेकॅनिकल वर्क्स
आमच्याकडे सर्व प्रकारच्या पंपाची दुरुस्ती करुन मिळेल.
तेलगिरणी चौक, बार्शी, जि. सोलापूर

DiiT Since 1996
DiiT COMPUTERS CENTER, SINCE 1996
DNYANESHWARI INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, BARSHI
आपल्या बार्शी शहरात
AI शिका आता FREE मध्ये!
ते पण MKCL चे CERTIFICATE
आजच REGISTRATION करा!
नोंदणी करण्याची सोपी पद्धत
1 www.mscit.ai ला भेट द्या
2 Full Name, Address भरा
3 Mobile Number टाका
4 Enter OTP
5 View Video
6 Select Center Dnyaneshwary Institute of Technology (43210026) Barshi
AI Master Class पूर्णपणे मोफत!
Course पूर्ण केल्यानंतर MKCL चे अधिकृत Certificate मिळवा!
✓ AI तज्ञांकडून मार्गदर्शन
✓ सोप्या भाषेत शिकवणी
✓ करिअरसाठी उपयुक्त
✓ 100% मोफत आणि प्रमाणित
पत्ता : भगवंत मंदिराच्या पाठीमागे, कसबा पेठ, बार्शी.
अधिक माहितीसाठी संपर्क करा 9834943872
विश्वास, गुणवत्ता आणि 30 वर्षांचा अनुभव!
DiiT – तुमच्या उज्ज्वल भविष्याचा विश्वासू साथीदार! | ज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगतीची हमी!

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
भारत सरकार नोटरी
मो. 9850277944
9423327580
ॲड. श्री. आर. यू. वैद्य
(उपळाईकर) B.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ॲड. श्री. के.पी. राऊत, ॲड. एस.पी. शहा
ऑफिस : ''श्री विठ्ठल निवास'' आदित्य कृष्णानगर उपळाई रोड, दोन लिंबा जवळ, बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
सुविधा मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल, बार्शी
कॅन्सर विभाग सुरू
कॅन्सर सर्जरी | जनरल सर्जरी | किमोथेरपी
महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध
मातोश्री कॉम्प्लेक्स, बँक ऑफ इंडियाच्यावर, ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी 413411
+91 (9146523000) | Off : (02184-223600), Off : (8007161010)
24/7 Emergency Service

मा. सभापती शिक्षण मंडळ, बार्शी.
दै. तरुण भारत वर्धापनदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा!
रजि. नं. MAH/4402/2007
ॲड. महेश अशोक जगताप
B.Sc., LL.B.
मा. नगरसेवक, बार्शी नगरपालिका
मा. ॲड. महेश जगताप मित्रमंडळ, बार्शी.

दै. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!
प्रोप्रा. बाबासाहेब कापसे मो. ९४२२०२७३२३
भाऊ कापसे मो. ९५५२२२९९१८
महेश कापसे मो. ९४२२०२७३१८
मे. सद्गुरु
* बोअरवेल्स, * ट्रान्सफॉर्मर्स
* इलेक्ट्रिकल्स * अर्थमुव्हर्स
* सिमेंट प्रॉडक्ट
आमच्याकडे जमिनीवर ४॥, ६॥ व ७ इंची, विहिरीत उभे व आडवे बोअर करुन मिळेल.
प्लेटा, बँच, बाथरुम, पाण्याच्या टाक्या, जनावरांची गव्हाण, तुळशी वृंदावन, गरीबाच्या स्वप्नातील घर
ट्रान्सफार्मर दुरुस्त करून मिळेल.
३९०३, भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी-४१३४०१

दै. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!
ॲड. राहुल अरुण देशमुख
बी.ए. (ऑ.) एल.एल.बी.
सल्लागार, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-बार्शी
सल्लागार, सोलापूर जनता सहकारी बँक लि., शाखा-बार्शी
सल्लागार, दि पंढरपूर अर्बन को.ऑप बँक लि., शाखा-बार्शी
फर्म :
श्री रेणुका उद्योग, बार्शी.
श्री रेणुका कॉम्प्लेक्स
श्री रेणुका ॲग्री फर्म
मो. ९४२२३९६१११,८८३०५९९८३१
अलिपूर रोड, बार्शी, जि. सोलापूर

# सोलापूरी चादर: कलाकुसरीचा व विणकामाचा उत्तम नमुना



डॉ. शिवाजी शिंदे
भ्र. ९३७०६२१४७५

भारतात मजबूत आणि टिकाऊ अशा कापसाच्या सुतापासून बनविलेले सोलापूर चादर प्रसिद्ध आहे. ही चादर बनवण्यासाठी प्रत्येक विणकर आपले कौशल्य पणाला लावून त्यामध्ये नाविन्यता कशी आणता येईल याचा विचार करून त्यामध्ये आपले स्वतःचे सर्वस्व योगदान देतो. एका अर्थाने विणकर हा वस्त्रोद्योग, चादर आणि टॉवेल यातून आपल्या जीवनाचा धागाच विणत असतो असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. विणकराच्या, कामगाराच्या जीवनामध्ये सोलापूर चादरीमुळे विणकरांच्या हाताला काम मिळून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम, त्यांना आर्थिक पाठबळ मिळवून देण्याचे काम या वस्त्रोद्योगामुळे होत आहे.

**सोलापूरी चादरीची ठळक वैशिष्टये**

**१) चादरीवर सुंदर रंगसंगती :-**

सोलापूर चादरीवर विविध प्रकारच्या रंगछटा साकारल्या आहेत. या विविध प्रकारच्या रंगसंगतीमुळे चादरीला विशिष्ठ सौंदर्य प्राप्त होते. त्यामुळे ग्राहकवर्ग आपोआपच या चादरीकडे आकर्षिला जात आहे. हे सोलापूरी चादरीचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

**२) आकर्षक नक्षीकामाने नटलेल्या चादरी :-**

सोलापूरी चादरीवर आवश्यक त्या ठिकाणी आकर्षक नक्षीकाम केलेले दिसून येते. या नक्षीकामाने या चादरीची मोहकता आणखीनच वाढते. त्यामुळे आपोआपच या सोलापूरी चादरी खरेदी करण्यासाठी ग्राहक वर्ग आकर्षिला जातो.

**३) सोलापूर वस्त्रोद्योगाचे क्लस्टर :-**

केंद्रशासनाकडूनही सोलापूरच्या वस्त्रोद्योगाचा विकास व्हावा, वस्त्रोद्योगाला चालना मिळावी सोलापूरी चादर व आणि टॉवेल उत्पादनाच्या सर्व प्रक्रियाबरोबरच महत्वाची मार्केटिंगची सुविधा एकाच ठिकाणी निर्माण करण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. क्लस्टर पद्धतीने यंत्रमागधारक व विणकर यांच्या सहायाने सोलापूरातील वस्त्रोद्योगाची भरभराट व्हावी, या हेतूने सोलापूर हे वस्त्रोद्योग क्लस्टर होण्याकरिता प्रयत्न सुरू आहेत.

**४) शुद्ध कापसाच्या धाग्याचा वापर :-**

सोलापूरी चादरी, टॉवेल बणवण्याकरिता शुद्ध कापसाच्या गाठीचा वापर केला जातो. त्यामुळे त्याचा वापर करताना सुखद अनुभव येतो, उबदारपणा जाणवतो.

**५) चादरीचा उत्तम टिकाऊपणा :-**

शुद्ध कापसाच्या गाठीपासून या चादरी बनवल्या बनवल्या जात असल्यामुळे या चादरी अत्यंत टिकाऊ असतात. त्यामुळे वारंवार खर्च करावा लागत नाही पर्यायाने आर्थिक बचत होते. त्यामुळेसुद्धा या चादरी परवडणाऱ्या असल्याने त्या खरेदी करण्याकडे ग्राहकांचा ओढा जास्त असतो.

**६) चादरीचा सर्व ऋतूमध्ये वापर :-**

सोलापूरी चादरीचा वापर हिवाळा, पावसाळा व उन्हाळा या तिन्ही ऋतूमध्ये करता येतो. बाराही महिने या चादरी वापरण्याजोग्या असतात. हिवाळ्यात या चादरी उबदार अनुभव देतात तर उन्हाळ्यामध्ये थंडावा अनुभव देतात. त्यामुळे वर्षभर या चादरीचा वापर होत असल्याने सोलापूरी चादरीचे ग्राहकाला सर्वात जास्त आकर्षण आहे.



> सोलापूर ही गिरणी कामगारांची, विणकरांची नगरी म्हणून ओळखली जाते. भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली असे श्री मल्लिनाथ धनशेट्टी, श्री. किसन सारडा, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री. कुर्बान हुसेन अशा हुतात्म्यांची सोलापूर ही नगरी आहे. शाहीर आण्णाभाऊ साठे एका ठिकाणी म्हणतात, पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे हे सोलापूरच्या बाबतीत तंतोतंत खरं आहे, कारण येथे कामगार वर्ग मोठया प्रमाणात वास्तव्य करतो. सोलापूर हे शहर बहिंभाषिक, बहुधर्मीय व औदयोगिक शहर म्हणूनही ओळखले जाते, येथील वस्त्रोद्योग जगप्रसिद्ध आहे. विणकामामध्ये तेलगू भाषिक समाजाचा वाटा मोठा आहे. बहुसंख्य तेलगू भाषिकांचा उदरनिर्वाह विणकामावर चालतो. येथे तयार होणाऱ्या चादरी, टॉवेल्स यांना मोठी मागणी आहे.

**७) सोलापूरी चादरीची विदेशात निर्यात :-**

सोलापूरी चादर भारतात संपूर्ण राज्यात तर प्रसिद्ध आहेच परंतु आज मोठ्या प्रमाणात विदेशातही सोलापूरी चादरीची निर्यात केले जाते. ही सोलापूरकरवासियांसाठी आनंदाची बाब आहे. यामुळे नक्कीच सोलापूरची प्रसिद्धी होऊन सोलापूर हे वस्त्रोद्योगाचे माहेरघर म्हणून ओळखले जाईल.



सोलापूरी चादर अमेरिका, आफ्रिका, इंडोनेशिया, कुवेत, दुबई, मलेशिया, सौदी अरेबिया इत्यादी देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते त्यामुळे आपोआपच आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होण्यासाठी सोलापूरी चादरीची मदतच होत आहे.

**८) चादरी विक्रीसाठी भव्य शोरूमची निर्मिती:-**

सोलापूरी चादरीच्या व टॉवेल्सच्या मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी भव्य शोरूम उपलब्ध आहेत यामध्ये पुलगम टेक्सटाईल्स, चिल्का टेक्सटाईल्स, मेंगजी टेक्सटाईल्स, गांगजी टेक्सटाईल्स इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो. या संपूर्ण शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी बघायला मिळते सोलापूरला पर्यटनासाठी व देवदर्शनासाठी आलेल्या सर्व नागरिकांचा ओढा या शोरूमला भेट देण्याचा असतो आणि त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात चादरीची व टॉवेल्सची खरेदी केली जाते. ही सोलापूरी चादरीची खासियतच आहे.



**९) चादरीचे किफायतशीर दर :-**

सोलापूरच्या चादरी या सर्वसामान्य ग्राहकांना परवडणाऱ्या किंमतीमध्ये मिळतात त्यामुळे ग्राहकही मोठ्या उत्साहाने त्याची खरेदी करतात. चादरीची किंमत साधारणतः १००, २००, ३०० रुपयापासून पुढे हजार रुपयापर्यंत व त्यापेक्षाही जास्त किंमतीच्या आहेत. ज्याला ग्राहकाला जी चादर परवडते ती चादर घेण्याचा ग्राहक प्रयत्न करतात. यातून चादर बनविताना सर्व प्रकारच्या ग्राहकांचा विचार केलेला दिसून येतो. त्यामुळे चादरीचा खपही मोठ्या प्रमाणात होतो. चादरीचे दर किफायतशीर आणि सर्वांना परवडणारे असल्याने सोलापूरी चादरीने प्रसिद्धीचे शिखर गाठले आहे.

**१०) चादरीला विणकरांच्या घामाचा सुगंध:-**

सोलापूरी चादरी याविणकरांच्या, कष्टकऱ्यांच्या व कामगारांच्या कष्टातून तयार होतात. आपले कौशल्यपणाला लावून त्यांच्याकडून या चादरीची निर्मिती केली जाते. एक प्रकारे या चादरीला विणकरांच्या, कामगारांच्या घामाचा सुगंध लाभलेला असतो असं म्हटलं तरी वावगं होणार नाही.म्हणून ही सोलापूरी चादर ग्राहकाच्या पसंतीचा विषय बनली आहे.

**११) नॅपकीन बुकेचा सत्कारासाठी उपयोग :-**

सोलापूरी चादरी बरोबरच विणकरांच्या कलाकुसरीचा उत्तम नमुना म्हणजे नॅपकिन बुके. हे बुके वापरण्यास व हाताळण्यास सोपे व इतरांना उपयुक्त असे बनविले जातात. हे बुके अनेक नॅपकीन एकत्रित करून आकर्षक पद्धतीने तयार केले जातात.

आपल्याकडे आलेल्या अतिथींचे स्वागत व त्यांचा सत्कार करण्यासाठी या बुकेचा मोठया प्रमाणावर वापर होतो. अनेक सत्कार मूर्तींना व अतिथींना हे सोलापूरचे वेगळं आदरातिथ्य भावतं यातून सोलापूरच्या विणकरांच्या संस्कृतीचा परिचय त्यांना होतो.

**१२) चादरी निर्मितीमुळे रोजगाराची संधी :-**

सोलापुरी चादरीमुळे अनेकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

उदरनिर्वाहाचे साधन मिळाले आहे. त्यामुळे अनेक कुटुंब त्यावर गुजरान करताना दिसतात. म्हणून या सोलापूरी चादरीचे कारखाने अनेकांच्या कुटुंबाचा आधार बनलेले आहेत असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.

**१३) समारंभात भेट देण्यासाठी चादरीचा उपयोग :-**

आज मोठ्या प्रमाणात लग्नसमारंभात नातेवाईकांना व आप्तेष्ठाना भेटवस्तू आहेर करण्याची प्रथा प्रचलित आहे. आपापल्या क्षमतेप्रमाणे नातेवाईक हा आहेर व भेट दिली जाते. आता साडीऐवजी सोलापूरी चादर अथवा टॉवेल भेट म्हणून देण्याची प्रवृत्ती वाढीस लागत आहे. यामुळे नक्कीच चादरीचा योग्य असा उपयोग होताना दिसतो आहे. चादरीची पॅकिंगही आकर्षक पद्धतीने केली जाते.

वरील सर्व बाबींचा विचार केला तरी तरी आज यंत्रमागधारक आणि विणकर यांना ज्या प्रमाणात त्यांच्या विणकामाचा मोबदला मिळावा पाहिजे त्या प्रमाणात तो मिळताना दिसत नाही. अनेक वेळेला त्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो. काहीवेळेला तुटपुंज्या मानधनात काम त्यांना काम करावे लागते. म्हणून वस्त्रोद्योग विकासासाठी शासनस्तरावरून काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

यंत्रमागधारकांची, विणकरांची संस्कृती टिकून ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नाची आवश्यकता आहे. तरच विणकरांची आणि यंत्रमागधारकांची संस्कृती टिकून राहील असे मला वाटते. याचा विचार सर्वांनीच करावयास हवा असे मनोमन वाटते.

**(सदस्य, सोलापूर जिल्हा मराठी भाषा समिती, अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा उत्तर सोलापूर, सदस्य, अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई शाखा सोलापूर, सहायक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी, सचिव, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ. लेखक या पदावर कार्यरत आहेत. )**

# जागतिक दर्जाचे उपचार सुविधा असलेले बार्शीचे नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल



सन १९८२ साली अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अॅण्ड रिलीफ सोसायटीची स्थापना करण्यात आली. बार्शीतील दानशूर कथले दांमपत्याच्या उदार देणगीतुन स्थापन झालेल्या कथले ट्रस्टच्या सहकार्याने कर्करोगावरील उपचार व संशोधनासाठी संस्थापक चेअरमन कै. डॉ. बी. एम. नेने यांनी मुहूर्तमेढ रोवली. १९८२ साली आश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च व रिलिफ सोसायटी अंतर्गत नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पीटलची स्थापना केली. १९८२ सालात कर्करोगासारख्या असाध्य व्याधीवर उपचार केंद्र ग्रामीण भागात सुरु करणे हे अत्यंत धाडसाचे कार्य होते. कर्करोगाविषयाची भीती असल्यामुळे ग्रामीण भागात जनजागृती करुन त्यांच्या दारात जाऊन सेवा देण्याचे कार्य उस्फुर्त पणे सुरु झाले.

कै. डॉ. बी.एम. नेने यांनी १९८२ पासून ३००० रोग निदान शिबीरामध्ये सहभाग नोंदवला. २०१२ साली महाराष्ट्र शासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या प्रारंभा पासुन संस्थेमध्ये गरीब व गरजु रुग्णांना विना मोबदला उपचाराची सोय झाली. १२ वर्षाच्या कालावधीत सुमारे १ लक्ष रुग्णांनी याचा लाभ घेतला. या व्यतीरिक्त निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना सुमारे १० कोटी रुपयांचे अर्थसहाय्याचा लाभ मिळाला.

संस्थेच्या कार्याची उचीत दखल घेऊन फिरोदीया ट्रस्ट पुणे, टाटा ट्रस्ट मुंबई, SBI Foundation Mumbai यांनी CSR फंडातुन अत्याधुनिक उपचाराच्या सोयीसाठी भरीव आर्थिक मदत केली. याबद्दल संस्था सदैव ऋणी आहे. संस्था उभारणीत समाजातील सर्व स्तरातील बार्शीकरांनी आर्थिक मदत केल्याने संस्था ही समस्त बार्शीकरांच्या अस्मितेचे प्रतिक बनले आहे.

संस्थेच्या संचालक मंडळाने नियोजनबध्दपणे अत्यंत काटकसरीने पारदर्शकतेने संस्थेचा सर्वांगीण विकास केला संस्थेने WHO/ IARC, टाटा स्मारक केंद्र, मुंबई यांच्या समवेत विविध संशोधन प्रकल्प यशस्वीपणे राबविले या संशोधनास जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाल्याने संस्थेची किर्ती जगभरात झाली आहे. याचा आम्हास व समस्त बार्शीकरांना सार्थ अभिमान वाटतो. भगवंताची बार्शी म्हणुन असलेली ओळख नव्याने कॅन्सर हॉस्पिटलची बार्शी म्हणुन अधोरेखित झाली आहे.

संस्थेमध्ये कर्करोगावरील परिक्षण व उपचाराच्या सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने २०० किमी परिघातील गरजु कॅन्सर रुग्णांची शाश्वत उपचाराचे ठिकाण म्हणून पसंती आहे. २०२४-२५ आर्थिक वर्षात संस्थेने स्वनिधीतुन अत्याधुनिक रेडिएशन मशीन रुग्णसेवेत दाखल केल्याने 3DCRT/IMRT/VMAT या महानगरात उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा लाभ ग्रामीण भागातून येणाऱ्या गरजु व गरीब रुग्णांना झाला आहे.

संस्थेत नव्याने उपलब्ध झालेल्या पेट सीटी स्कॅन सुविधेमुळे रुग्णांना कर्करोग, हृदय विकार आणि मेंदुचे विकार यांचे परिक्षण व उपचारांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यासाठी याची मोलाची मदत होत आहे.

संस्थेचे आधारस्तंभ व विद्यमान कार्याध्यक्ष आमदार अॅड. दिलीपरावजी सोपल, अध्यक्षा श्रीमती. प्रभावती झाडबुके, चेअरमन श्री. नंदकिशोर सोमाणी, सेक्रेटरी श्री. सत्यनारायण झंवर, खजिनदार श्री. बन्सीधर शुक्ला व समस्त संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कार्य प्रगतीपथावर आहे. भविष्यात संस्थेमध्ये कॅन्सर उपचार व संशोधनाच्या महानगरात उपलब्ध होणाऱ्या सर्व सुविधा अत्यंत माफक दरात प्रदान करण्याचा सस्थेचा मानस आहे.

**-किशोर परांजपे**
प्रशासकीय अधिकारी


दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल...!



सभासद व ग्राहकांच्या विश्वासाला जपणारी पतसंस्था

श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, बार्शी.

२६३२, रुई ओळ, बार्शी, जि. सोलापूर

ठेवीचे व्याज दर

| | |
|---|---|
| * ४६ दिवस ते ९० दिवस | ४% |
| * ९१ दिवस ते ३६४ दिवस | ६% |
| * १ वर्ष ते २ वर्षाचे आत | ९% |
| * २ वर्षे ते ५ वर्षे | ९.५% |
| * (ज्येष्ठ नागरिक १ वर्षाचे पुढे अर्धा टक्का जादा) | |
| * मासिक मुदत ठेव किमान ३ वर्षे | |
| * बचत रोखा (दामदुप्पट) ८४ महिने | |

कर्जाचे दर

| | |
|---|---|
| * सोनेतारण कर्जे | १४% |
| * इतर कर्जे | १५% |
| * ठेव तारण कर्जे तारण ठेव व्याजदरापेक्षा २% जादा | |

* वैशिष्ट्ये :-

* विविध प्रकारच्या कर्ज योजना.
* लॉकरची सोय.
* सोने तारण / वेअरहाऊस तारण त्वरीत उपलब्ध.
* संपूर्ण संगणकीकृत कामकाज.
* विनम्र व तत्पर सेवा.

* संचालक मंडळ *

डॉ. श्री. बी. वाय. यादव (अध्यक्ष)
अॅड. श्री. अ.अ. तांबोळी (उपाध्यक्ष)
श्री. भा. वि. बडवे (संचालक)
श्री. स. पां. राऊत (संचालक)
श्री. नं. ना. देशमुख (संचालक)
श्री. भा.द. नाईकवाडी (संचालक)
श्री.डॉ. कृ.द. मस्तुद (संचालक)
श्री. सु. बा. खाडे (संचालक)
श्रीमती वै.वि. टिळक (संचालिका)
श्री. अ. रा. बनसोडे (सरव्यवस्थापक)

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद





दै. सोलापूर तरुण भारतच्या ४२ व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



* शुभेच्छुक *
एक हितचिंतक


# हृदयरुग्णांचा आधार - डॉ. क्रांती कोळी यांचे माधवबाग, बार्शी

**'भिषगद्रव्यानुपस्थाता रोगी पादचतुष्टयम'**

आरोग्य व्यवस्थेचे चार प्रमुख घटक असलेल्या डॉक्टर, औषध, परिचारक व रुग्ण यापैकी डॉक्टरांच्या सन्मानार्थ १ जुलै रोजी डॉक्टर्स डे साजरा केला जातो. जे डॉक्टर्स आपल्या रुग्णाला कमीत कमी औषधे देऊन व्याधीमुक्त करतात त्यांना शास्त्रामध्ये मानाचे स्थान आहे. माधवबागमध्ये रूग्णांच्या जीवनशैलीवर प्रामुख्यांने काम केले जाते. त्यामुळे रुग्णाला जास्त शारिरीक, आर्थिक व मानसिक ताण पडत नाही आणि आजारदेखील समूळ बरा होऊ शकतो. मागील २५-३० वर्षात आपल्या जीवनशैली मध्ये प्रचंड बदल झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून आज जवळपास प्रत्येक घरात हार्ट अॅटक, ब्लॉकेजेस. डायबेटीस बी.पी. लठ्ठपणा PCOD, कोलेस्ट्रॉल जसे त्रास असलेले सदस्य आढळून येतात. पूर्वी वयाच्या ५० नंतर येणारे आजार सध्या तरुणाईसाठी जीवघेणे ठरु पाहत आहेत. हृदयरोगावर विनाशस्त्रक्रिया आयुर्वेदिक उपचार करणारी माधवबाग ही जगातली एक अग्रगण्य हार्ट केअर इंस्टिट्यूट आहे. संपूर्ण भारतात ३५० पेक्षा जास्त शाखांमधून १० लाखापेक्षा अधिक रुग्णांनी आजवर उपचार घेतलेले आहेत.

डॉ. क्रांती यांचे २००८ साली वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बार्शीतील जगदाळे मामा व कॅन्सर हॉस्पिटल सोबतच पुण्यातील नामांकित हॉस्पिटलमध्ये त्यांनी सेवा दिली. रुबी हॉल येथून इमर्जन्सी मेडिसिनमधील पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केले. २०१२-१३ साली पुण्यातील स्वत:च्या मल्टी स्पेशालिटी क्लिनिकमध्ये व्यस्त असतानाच माधवबाग पुणे येथे असंख्य हृदयरुग्णावर डॉ. कोळी दांपत्याने उपचार केले.

माधव

बागच्या हृदयरोगावरील अत्यंत प्रभावी व पारदर्शक उपचारांची आपल्या भागातील गरज ओळखून डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांनी २०१४ साली बार्शी शाखेचा शुभारंभ केला. उत्तम सेवा आणि रुग्णांना मिळणारा पटकन आराम यामुळे अल्पावधीत, भूम, परंडा, वाशी, कळंब, कुर्डूवाडी, माढा, वैराग, तुळजापूर, धाराशिव, बीड येथून रूग्णांचा मोठा ओघ सूरू झाला. रूग्णसेवेला नेहमी प्राधान्य देऊन सर्व निकषांवर पात्र ठरल्यामुळे माधवबागमधी 'बेस्ट क्लिनिक' सह अनेक पुरस्कारांनी क्लिनिकचा सन्मान झाला आहे. धाराशिव परिसरातील रुग्णांच्या सोयीसाठी डॉ. पवन कोळी यांनी २०१८ साली माणिक चौक येथे नवीन शाखा सुरु केली. २०२४ पर्यंत प्रामाणिक सेवा देऊन परिसरात प्रचंड नावलौकिक निर्माण केला. मात्र सध्या ते बार्शीत स्वत:च्या प्रशस्त इमारतीमध्ये डॉ. क्रांती यांच्या समवेत प्रचंड वाढलेल्या रुग्णांना सेवा देण्यासाठी सज्ञ झालेले आहेत.

हृदयविकार म्हणजे केवळ हार्ट अॅटॅक नसून हृदयाच्या स्नायूंना रक्तपुरवठा होणे. स्नांयूची ताकद कमी होणे, कोरनरी आर्टरीजची लवचिकता कमी होणे. त्यात घाण म्हणजे अतिरिक्त चरबी जमा होणे, EF म्हणजे पंपींग कमी होणे हे सर्व हृदयविकारांचे विविध टप्पे आहेत. हृदविकार विकसित होण्यासाठी डायबेटिस, हाय ब्लडप्रेशर, लठ्ठपणा, तणावपूर्ण जीवनशैली इ. विविध रिस्क फॅक्टर्स कारणीभूत असतात. म्हणून माधवबाग मध्ये हृदयरोगासोबतच या रिस्क फॅक्टर्सवर देखील सर्वोत्तम उपचार उपलब्ध आहेत. शास्त्रोक्त उपचारांना रिसर्च आणि



इव्हीडन्स बेस्ड उपचारांची जोड देऊन माधवबागने युनिक उपचार पद्धती तयार केली आहे. ही उपचारपद्धती जगभरातील हृदयरोग तज्ञांच्या संघटनांनी स्वीकारली आहे.

माधवबागमध्ये सध्या ६५० पेक्षा जास्त डॉक्टर्स कार्यरत आहेत. सर्वात जुन्या डॉक्टरांपैकी असणाऱ्या डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांचे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय विकार याविषयीचे रिसर्च पेपर्स भारतासह, युरोप, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या ठिकाणी नामांकित हेल्थ जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. डायबेटिस असणाऱ्या रूग्णांना हार्टचा आणि हाय बी.पी. असणाऱ्यांना स्ट्रोक म्हणजे पॅरालिससचा धोका सभंवतो मात्र यामागे मूळ कारण असते रक्त वाहिन्यांची आतील भिंत म्हणजेच एन्डोथेलिअम खराब होणे माधवबागच्या संशोधनसिद्ध उपचारामुळे एन्डोथेलिअमचे आरोग्य सुधारते व हृदयविकारांचा धोका कमी होतो. एन्डोथेलिअम सुस्थितीत असेल तर बऱ्याच रूग्णांना अँजिओग्राफी मध्ये ब्लॉकेज असून सुद्धा हार्ट अॅटॅक येत नाही. आणि एन्डोथेलिअम खराब असणाऱ्या व्यक्तीला ब्लॉकेज नसतानादेखील हार्ट अॅटॅक येऊ शकतो. माधवबागच्या जगतमान्य पंचकर्म व विविध आजारानुसारचे डायट बॉक्सेस हे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास नक्कीच मदत करतात. त्यामुळेच बार्शी शाखेच्या असंख्य रुग्णांचे आजवर अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास अशा खर्चिक शस्त्रक्रिया टाळल्या गेल्या. तसेच कित्येक रुग्णांच्या डायबेटिस, हायब्लड प्रेशरच्या औषधांचे प्रमाण कमी करून देखील आजार आटोक्यात आहेत. हृदय रुग्णांनी तसेच चाळीशी पूर्ण केलेल्या सर्वांनी दर सहा महिन्यांला स्ट्रेस टेस्ट म्हणजे TMT डायबेटिस असणाऱ्यांनी तर दर तीन महिन्यांनी HB A1 C आणि हाय बी.पी. असणाऱ्यांनी वेळोवेळी अॅम्ब्युलेटरी ब्लडप्रेशर मॉनिटरिंग (ABPM) तपासणी करून घ्यावी.

डॉ. क्रांती यांचे आई वडील प्रा. हेमंत शिंदे व माधुरी शिंदे तसेच डॉ पवन कोळी यांचे आईवडील मोहनराव कोळी व मीना इटेवाड-कोळी हे शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे आपणही समाजाचे कांहीतरी देणं लागतो ही भावना दोघांच्याही मनात लहानपणा पासूनच रुजलेली आहे. म्हणूनच करिअरच्या सुरुवाती पासूनच या दोघांनी आजवर असंख्य मोफत तपासणी शिबीरे, आरोग्य जनजागृतीविषयी व्याख्याने घेतली आहेत. अनेक सेवाभावी संस्थांना व गरजू रुग्णांना शक्य त्या प्रकारे मदत केली आहे. हजारो रूग्णांच्या शुभेच्छा आणि आशीवार्दाच्या पाठबळामुळे बार्शी शाखा लवकरच स्वत:च्या सुसज्ञ इमारती मध्ये सेवा देण्यासाठी सज्ञ झाली आहे. डॉ. क्रांती व पवन कोळी यांचा माधवबागच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रूग्णांची सेवा करण्याचा ध्यास खरोखरच कौतुकास्पद आहे.

*** महत्वाचे ***

* २०१४ पासून बार्शी येथे अखंड सेवा.
* हृदयरोग, डायबेटिस, हायब्लड-प्रेशर, लठ्ठपणा इ. आजारावर यशस्वी उपचार घेतलेल्या हजारो जणांचा परिवार.
* सुसज्ञ व आधुनिक पंचकर्म विभाग.
* प्रशिक्षित व कुशल पंचकर्म थेरपिस्ट
* स्ट्रेस टेस्ट (TMT) (ABPM), रक्ताच्या सर्व तपासण्या उपलब्ध.
* रिसर्च व इव्हीडन्स बेस्ड पंचकर्म थेरपिज आणि डायट बॉक्सेस
* लवकरच NABH मानांकन पूर्ण होणार आहे.



डॉ.क्रांती कोळी यांचे
माधवबाग
मल्टीडिसिप्लिनरी कार्डियाक केअर क्लिनिक्स् अॅण्ड हॉस्पिटल्स्


डॉ.क्रांती कोळी यांचे
माधवबाग बार्शी
मल्टीडिसिप्लिनरी कार्डियाक केअर क्लिनिक्स् अॅण्ड हॉस्पिटल्स्
बार्शी २०१४ पासून आपल्या सेवेत..

३० च्या पुढे वय, चालताना दम/धाप, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब (बी.पी.), वाढलेले वजन किंवा कोलेस्टेरॉल, पायांवर सूज, अशी लक्षणे असतील किंवा यापूर्वी हार्ट अटॅक येऊन गेला असेल, अँजिओग्राफी-अँजिओप्लास्टी-बायपास झाली असेल अथवा करुन घेण्याचा सल्ला मिळाला असेल, स्ट्रेस टेस्ट (TMT) पॉझिटिव्ह आली असेल तर आजच बार्शी क्लिनिकला तपासणी करुन घ्या व योग्य मार्गदर्शनानंतर तणावमुक्त आयुष्य जगा.

व्याधीनुसार आहाराचे डायट बॉक्सेस




माधवबागच्या संपूर्ण हृदय शुद्धीकरण थेरपीज®
SHS
आम्ही फक्त हृदयविकाराचा उपचार करत नाही, तर त्याला परतवून लावतो.



ठळक वैशिष्ट्ये

* २०१४ पासून बार्शी येथे अखंड सेवा.
* पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र पंचकर्म विभाग आणि प्रशिक्षित थेरपीस्ट.
* आजारानुसार रिसर्च व इविडन्स बेस्ड डायट बॉक्सेस व पंचकर्म थेरपीज.
* हृदयाचा रक्तपुरवठा व VO2Max दर्शवणारी कम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट.
* डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांचे रिसर्च पेपर्स देश विदेशातील नामांकित हेल्थ जर्नल्स मध्ये प्रकाशित.
* पेशंट इम्प्रुव्हमेंटसाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित क्लिनिक्स.





FOLLOW US:

छत्रपती कॉलनी, बाळेश्वर नाका, कुर्डूवाडी रोड, बार्शी 7276519111 / 8605191110